भगिनी निवेदिता सहकारी बँकेची सुवर्ण महोत्सवी वाटचाल

सुवर्ण भरारी

50

सुवर्ण महोत्सवी वर्ष

2023-24

सुस्थिर • सुरक्षित • समावेशक

भगिनी निवेदिता
सहकारी बँक मर्यादित, पुणे
स्वप्न अर्थपूर्ण करणारी बँक

सुवर्ण महोत्सवी वर्ष

2023-24

सुस्थिर • सुरक्षित • समावेशक

भगिनी निवेदिता
सहकारी बँक मर्यादित, पुणे

स्वप्न अर्थपूर्ण करणारी बँक

भगिनी निवेदिता - स्वामी विवेकानंदांच्या शिष्या

(मार्गारिट एलिझाबेथ नोबल - मूळ आयरीश नागरिक)

जन्म : २८ ऑक्टोबर १८६७ (आयर्लण्ड)

मृत्यू : १३ ऑक्टोबर १९११ (सिलिगुडी, पश्चिम बंगाल)

बँकेचे संस्थापक

कै. विवेक गणेश दाढे (चार्टर्ड अकौंटंट)

बँकेच्या संस्थापिका

कै. मीनाक्षी विवेक दाढे

Suvarnabharari
सुवर्णभरारी

© **भगिनी निवेदिता सहकारी बँक लि.**

सुवर्ण महोत्सव समिती :
सीए डॉ. रेवती पैठणकर
दीपा दाढे
सुनंदा करमरकर
विद्या रानडे
जयश्री काळे
ॲड. जयश्री कुरुंदवाडकर
स्मिता देशपांडे
जयश्री चित्रे
वर्षा बुधकर

शब्दांकन :
मंगला गोडबोले, पुणे
मो. : ९८२२४९८२२८

स्मरणिका निर्मिती :
भालचंद्र कुलकर्णी,
एकविरा पब्लिसिटी, पुणे
मो. : ९८२२८८२५०९

प्रकाशन :
गुढीपाडवा
चैत्र शु. प्रतिपदा, शके १९४५
२२ मार्च २०२३

(फक्त खासगी वितरणासाठी)

राष्ट्रपति
भारत गणतंत्र
PRESIDENT
REPUBLIC OF INDIA

MESSAGE

I am happy to know that the Bhagini Nivedita Sahakari Bank Ltd, Pune (BNSB) is celebrating commencement of its Golden Jubilee Year on March 22, 2023. The Organisation is publishing a book on this occasion.

Banks are the catalysts of economic development of the nation. Bhagini Nivedita Sahakari Bank Ltd is a co-operative bank being run and managed by women. BNSB employees through their hard work, dedication, competence and integrity have created an inspiring public image of the bank over the years.

I hope that the BNSB and its employees will stay committed to work ethics and values of professionalism.

I extend my warm greetings and best wishes to all those associated with the Bhagini Nivedita Sahakari Bank Ltd. I also wish the Golden Jubilee celebrations every success.

(Droupadi Murmu)

New Delhi
February 09, 2023

अमित शाह

गृह मंत्री एवं सहकारिता मंत्री
भारत सरकार

संदेश

मुझे यह जानकर प्रसन्नता हो रही है कि **भगिनी निवेदिता सहकारी बैंक लि: पुणे** द्वारा अपनी स्थापना के 50 वर्ष पूर्ण होने के उपलक्ष्य में स्वर्ण जयंती समारोह मना रहा है, इस अवसर पर एक स्मारिका का प्रकाशन भी किया जा रहा है।

सहकारिता भारतीय जीवन व्यवस्था का प्रमुख एवं केन्द्रीय तत्व रहा है। माननीय प्रधानमंत्री श्री नरेन्द्र मोदी जी ने हमेशा आत्मनिर्भर भारत बनाने की आवश्यकता पर जोर दिया है और सहकारिता के आत्मनिर्भर मॉडल की अवधारणा में उनकी गहरी आस्था के कारण ही **'सहकार से समृद्धि'** के स्वप्न को साकार करने के लिए 'सहकारिता **मंत्रालय**' का गठन किया है। सहकारिता मंत्रालय के गठन के बाद सरकार द्वारा सहकारी आंदोलन को और मजबूत करने के लिए कई कदम उठाए गए हैं।

मैं, भगिनी निवेदिता सहकारी बैंक लि; पुणे के सभी पदाधिकारियों एवं कर्मचारियों को अपनी शुभकामनाएं प्रेषित करते हुए स्वर्ण जयंती समारोह के सफल आयोजन एवं स्मारिका के सफल प्रकाशन की कामना करता हूँ।

(अमित शाह)

डॉ. रेवती पैठंकर,
अध्यक्ष, भगिनी निवेदिता सहकारी बैंक लि; पुणे

नितीन गडकरी
NITIN GADKARI

मंत्री
सड़क परिवहन एवं राजमार्ग
भारत सरकार
Minister
Road Transport and Highways
Government of India

Do No. ..../VIP/MRT&H/2023
Date :- ....
D. O. No. 9678
DATE 1 2 MAR 2023

MESSAGE

I am delighted to learn that Bhagini Nivedita Sahakari Bank Ltd., Pune is entering 50th year of its existence on 22nd March 2023, the auspicious day of Gudi Padwa.

Cooperative banking movement has contributed immensely to the welfare of numerous persons and institutions. This movement is now recognized as backbone of rural economy and proved to be the mainstay of economic transformation. Bhagini Nivedita Sahakari Bank is one of the such institutions which has proved its mettle during the course of fifty years. The bank has to its credit many accolades for its outstanding performance.

I congratulate everyone in the bank for the journey so far and wish all the best for all further endeavors.

Yours,

(Nitin Gadkari)

Room No. 501, Transport Bhawan, 1, Sansad Marg, New Delhi – 110 001, Tel.: 011-23710121, 23711252 (O), 23719023 (F)
E-mail: nitin.gadkari@nic.in; website-www.morth.nic.in
Camp Office Nagpur : Plot No. 25, Opp. Orange City Hospital, Beside Jupiter School, Khamla Chowk, Nagpur-440015(MS)
Tel.: 0712-2239918/20/22/23/24 Email : office@nitingadkari.net

उप मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य

दि. ०१ मार्च, २०२३

शुभेच्छा

'भगिनी निवेदिता सहकारी बँक मर्यादित, पुणे' आपले सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करत असल्याचे समजले. ही महिलांनी महिलांसाठी नव्हे, तर महिलांनी सर्वांसाठी चालवलेली बँक असल्याने आणि बँकिंग क्षेत्रात ५० वर्षांपासून घट्ट पाय रोवून उभी असलेल्या या बँकेच्या व्यवस्थापनाचे मला विशेष कौतुक वाटते. त्यामुळे सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त बँकेच्या संचालक मंडळाचे हार्दिक अभिनंदन! त्याचबरोबर यानिमित्त प्रकाशित होत असलेल्या विशेष स्मरणिकेसाठी मनापासून शुभेच्छा.

१९७४ मध्ये लावलेल्या 'भगिनी निवेदिता सहकारी बँक' या रोपट्याचे आता वटवृक्षात रुपांतर झाले आहे. एका शाखेने सुरू झालेला प्रवास आज १८ शाखांपर्यंत विस्तारला आणि आज आणखी विस्तारत आहे हे नक्कीच कौतुकास्पद आहे. पुणे आणि सातारा जिल्ह्यातील ग्राहकांच्या वित्तीय गरजा पूर्ण करण्यासोबतच बँक राबवत असलेले विविध सामाजिक उपक्रमदेखील उल्लेखनीय आहेत. सदस्य आणि कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी विविध योजना, कोविड काळात सर्वसामान्यांना तसेच कोविडमुळे प्रभावित झालेल्या ग्राहकांना वैद्यकीय मदत, पीएम रिलीफ फंड आणि सीएम रिलीफ फंडमधील योगदान, महिला उद्योजकांना 'निवेदिता पुरस्कार' देऊन महिलांना आर्थिक सक्षमीकरणासाठी प्रोत्साहित करणे, ग्राहकांसाठी आर्थिक साक्षरता प्रशिक्षण, सायबर सुरक्षा जागरूकता मोहिमा आदी उपक्रमांच्या माध्यमातून बँक आपली सामाजिक जबाबदारीही पार पाडण्याचा प्रयत्न करत आहे, हे देखील कौतुकास्पद आहे. उत्कृष्ट कामगिरीबद्दल राज्य शासनाकडून मिळालेले सहकारभूषण, सहकारनिष्ठ पुरस्कार, बँकेच्या विस्तारत जाणाऱ्या शाखा बँकेची यशस्वी वाटचाल दर्शवते.

सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त प्रकाशित होत असलेल्या स्मरणिकेत बँकेची यशस्वी वाटचाल दिसेलच, त्यासोबतच ५० वर्षांच्या वाटचालीतील यशाच्या, कर्तृत्वाच्या, त्यागाच्या पाऊलखुणा देखील यात उमटतील व त्या भावी पिढीला प्रेरणा देतील, असा विश्वास आहे.

सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त विशेष स्मरणिकेसाठी शुभेच्छा तसेच 'भगिनी निवेदिता सहकारी बँक मर्यादित, पुणे' चे संचालक मंडळ, भागधारक आणि सभासदांचे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!

(देवेंद्र फडणवीस)

मंत्री
सहकार, इतर मागास बहुजन कल्याण
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक 15 MAR 2023

शुभसंदेश

भगिनी निवेदिता सहकारी बँक सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे, याचा आनंद आहे. महिलांनी सर्वांसाठी चालवलेली ही सहकारी बँक सहकार चळवळीतील एक आदर्श बँक म्हणून ओळखली जाते. सहकार चळवळीत महिलांच्या सक्रीय सहभागाने अत्यंत चांगले काम उभे राहू शकते, याचे हे सर्वोत्कृष्ट उदाहरण आहे. नागरी सहकारी बँकांच्या माध्यमातून सर्वसामान्यांची पत उंचावण्याचे आणि आर्थिकदृष्ट्या त्यांना सक्षम करण्याचे मोठे काम आज देशभरात होतांना दिसते आहे. भगिनी निवेदिता सहकारी बँकेने गेल्या ५० वर्षात केलेली कामगिरी निश्चितच कौतुकास्पद आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये सहकाराची बिजे दिसून येतात. सहकार हा आपल्या संस्कृतीचा स्थायीभाव आहे. महाराष्ट्रातील सहकार चळवळ देशभरात अग्रेसर आहेच, त्यासाठी सहकाराचे जाळे अधिक विस्तृत आणि सक्षम करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांवर आहे. आज ग्रामीण भागात विकास सोसायट्यांद्वारे आणि ग्रामीण व शहरी पतसंस्था, नागरी बँका यांच्याद्वारे शेतकरी, दुर्बल घटक, महिला यांची आर्थिक प्रगती साधली जात आहे. सहकारातून समृध्दी साधता येऊ शकते, हे अनेक उदाहरणांवरून दिसून येते. त्यातीलच एक म्हणजे भगिनी निवेदिता सहकारी बँक होय.

या बँकेचे संस्थापक कै. विवेक दाढे व कै. मीनाक्षी दाढे यांच्या द्रष्टेपणामुळेच आज ही बँक प्रगतीपथावर आहे. या बँकेच्या सुवर्णमहोत्सवानिमित्ताने बँकेचे आजी-माजी संचालक, सभासद व सर्व कर्मचारी यांचे विशेष अभिनंदन करतो आणि बँकेला भावी वाटचालीस मनापासून शुभेच्छा देतो.

जय सहकार ! जय महाराष्ट्र !

(अतुल सावे)

अनिल कवडे
भा.प्र.से.
सहकार आयुक्त

सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे - ४११००१
कार्यालय : ०२०-२६१२२७००, २६१२२८४९
Email : ccrcs.pune@coop.maharashtra.gov.in

दिनांक : ९-२-२०२३

शुभसंदेश

भगिनी निवेदिता सहकारी बँक या संस्थेच्या वाटचालीस ५० वर्ष पूर्ण होत आहे आणि ही बँक यशस्वीरित्या कार्यरत आहे. सहकार क्षेत्रामधील बँकांनी सहकार तत्वावर काम करताना व्यवसायिकताही जपणे अत्यंत महत्वाचे आहे. त्या दृष्टीकोनातून बँकेचा NPA कमी असणे व बँकेचे कामकाज बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये योग्य रित्या पार पाडणे ही या क्षेत्राची गरज आहे. बँक आर्थिक साक्षरता व सायबर सुरक्षा बाबतही जागृकता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करत आहे ही बाबही अतिशय आनंदाची आहे.

या बँकेच्या माध्यमातून सर्व सभासदांना उत्तम व पारदर्शक पध्दतीने सेवा देणे ही काळाची गरज आहे व या दृष्टीकोणातून बँक प्रयत्नशील आहे याबाबी आनंद वाटतो. बँकेच्या सर्व सभासदांना या बँकेच्या माध्यमातून ठेवी व कर्ज याबाबतही अचुक, पारदर्शक व वेगवान सेवा मिळत राहव्यात व बँकेची उत्तरोत्तर प्रगती व्हावी ही सदिच्छा. "सहकारातून समृध्दीकडे" आणि "एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ" या मुल मंत्राचाही आपल्या बँकेच्या माध्यमातून प्रचार, प्रसार व अंमलबजावणी व्हावी अशी अपेक्षा व्यक्त करतो व बँकेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा व सुयश चिंतितो, जय सहकार।

(अनिल कवडे)

सतीश मराठे
संचालक, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया,
संस्थापक सदस्य, सहकार भारती
ईमेल : satishmarathe1@gmail.com

दि. १० मार्च २०२३

शुभेच्छा संदेश !

सहकार चळवळीतील एक अग्रणी बँक असलेल्या भगिनी निवेदिता सहकारी बँकेचे सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण होत आहे, याचा विशेष आनंद आहे. १९७३ मध्ये कै. विवेक दाढे आणि कै. मीनाक्षीताई दाढे यांच्या पुढाकाराने सुरु झालेली ही बँक आजही खऱ्या अर्थाने सर्वसामान्यांची बँक आहे. सुरुवातीपासूनच या बँकेच्या नेतृत्वाने सर्वसामान्य महिलांना एकत्र करुन, त्यांच्यातील नेतृत्वगुण हेरुन बँकेचे व्यवस्थापन त्यांच्यामार्फत उत्कृष्टरित्या चालवले आहे. महिलांनी सर्वांसाठी चालवलेली बँक म्हणून एक आदर्श या बँकेने प्रस्थापित केलेला आहे. महाराष्ट्र राज्य सरकारने देखील सहकार भूषण, सहकार निष्ठ पुरस्कार देवून गौरविले आहे, याचेच हे द्योतक आहे.

महिला बचतगटांच्या माध्यमातून तळागाळातील महिलांना आर्थिक सक्षम करण्याचे मोठे काम ही बँक करीत आहे. सहकार चळवळीला अपेक्षित असलेले कार्य या बँकेच्या हातून घडते आहे. सहकार चळवळीत सुशिक्षित आणि सुसंस्कारीत कार्यकर्ते असायला हवेत, ज्यामुळे आर्थिक शिस्त अधिक काटेकोरपणे पाळली जाते. भगिनी निवेदिता सहकारी बँक हे याचे एक उत्तम उदाहरण म्हटले पाहिजे.

महिलांमध्ये उद्यमशीलता वाढावी यासाठी बँक नेहमीच प्रयत्नशील असते. अत्याधुनिक तंत्रज्ञानाबरोबरच सायबर सुरक्षेचे भान या बँकेने काळजीपूर्वक जपले आहे. बँकिंगमधील येणाऱ्या नवनवीन आव्हानांना प्रभावीपणे सामोरे जाण्याची स्ट्रॅटेजि या बँकेच्या व्यवस्थापनाने जोपासली आहे, हे विशेषत्वाने नमूद करावेसे वाटते.

बँकिंग क्षेत्रात सहकारी बँकांनी सक्षमपणे उभे राहत सर्वसामान्यांना अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात आणले तरच सहकारातून समृध्दी होऊ शकेल. या प्रयत्नांमध्ये ही बँक निश्चितच आपला ठसा उमटवेल असा मला विश्वास वाटतो. सुवर्णमहोत्सावानिमित्ताने प्रकाशित होत असलेल्या सुवर्णभरारी या ग्रंथास तसेच बँकेचे पदाधिकारी, सर्व संचालक सदस्य व कर्मचारी वर्गास हार्दिक शुभेच्छा !

सतीश मराठे

विद्याधर अनासकर
प्रशासक

दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक लि.
(दि विदर्भ को-ऑप. बँक लि. समाविष्ट)

शुभसंदेश

खाजगी क्षेत्र आणि सरकारी क्षेत्र यांचा सुवर्णमध्य म्हणून उदयास आलेल्या सहकार क्षेत्राची तत्वे पाळत मार्गक्रमण करणाऱ्या सहकारी संस्थांमध्ये भगिनी निवेदिता बँकेचे नाव अग्रक्रमाने घेते. सध्याच्या वातावरणात संपूर्ण नागरी सहकारी बँकींग क्षेत्राला अभिमान वाटावे असेच बँकेचे कामकाज आहे. माझ्या प्रत्येक भाषणात मी आपल्या बँकेचा उल्लेख एक 'आदर्श सहकारी संस्था' असाच करीत असतो.

आपण सन २०२३-२४ या वर्षात आपला सुवर्ण महोत्सव साजरा करीत आहात. आपली बँक महिलांनी सर्वांसाठी चालवलेली बँक म्हणून यशस्वीरित्या कार्यरत आहे. बँकेने उत्कृष्ठ आर्थिक नियोजन, पारदर्शक व्यवहार, विनम्र, तत्पर, अत्याधुनिक व दर्जेदार ग्राहकसेवा देत पुणे आणि सातारा जिल्ह्यात सहकारी बँकींग क्षेत्रात नावलौकिक मिळविला आहे याचा परिपूर्ण अभिमान राज्यातील संपूर्ण नागरी सहकारी बँकींग क्षेत्राला आहे.

बँकेने सहकार क्षेत्रात उत्कृष्ठ कामकाज केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाकडून "सहकारनिष्ठ" व "सहकार भूषण" या नामांकित पुरस्काराने बँकेला सम्मानित केले आहे, ही बाब गौरवास्पद आहे. बँकेच्या निरंतर प्रगतीमध्ये बँकेचे संचालक मंडळ व कर्मचारी वर्ग यांचे मोलाचे योगदान आहे. सर्वांच्या एकत्रित कार्याच्या स्वरुप आज भगिनी निवेदिता सहकारी बँक ही एक अग्रणी बँक म्हणून नावारुपाला आली आहे. ही बाब संपूर्ण क्षेत्राला भूषणावह आहे.

आपल्या संचालक मंडळातील सर्व सदस्य व आपल्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह आपला सर्व सेवक वर्ग आपल्या ध्येयाप्रती जागरूक आहात. आपणा सर्वांचे वागणे हे 'सहकारात असावा सहकार' या सहकारातील प्रमुख तत्व पालनाचे उत्तम उदाहरण आहे.

बँकेची उत्तरोत्तर अशीच प्रगती व भरभराट होत राहो ही अपेक्षा व्यक्त करतो व बँकेला नावलौकिक प्राप्त करुन देण्यासाठी सहकार्य लाभलेले बँकेचे संचालक मंडळ व कर्मचारी वर्ग यांचे अभिनंदन व सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त तसेच बँकेच्या भावी काळातील प्रगतीसाठी माझ्या हार्दिक शुभेच्छा !!!

आपला हितचिंतक,

विद्याधर अनासकर

९, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स लेन, फोर्ट, मुंबई -४०० ००१
दूरध्वनी : २२८५ १५२० / २२८० ०५०० • फॅक्स : ०२२-२२८३ ०८२९
मोबाईल : ९८५०९७४०७५ ई-मेल : v_anaskar@yahoo.com / vidya.hsr@vsnl.net

JYOTINDRA MEHTA
PRESIDENT

NAFCUB

75 Azadi Ka Amrit Mahotsav

NF / P-1 / 2022-23/ 1448

Date: 09th February 2023

Respected Dr. Rewati ji,

Namaste,

I am glad to learn the news of Bhagini Nivedita Sahakari Bank Ltd. entering the golden jubilee year of its existence. It makes me happier to know that your Bank is being managed by WOMEN only. It is praise worthy to know, the power of Mahila Shakti has been strengthening BNSB and has a network of 18 branches in all. Total business of the Bank, 0% NPA level (that too for one and half decades) has been a matter of pride for Urban Cooperative Banking Sector. It's also soothing to learn that your Bank is second to none in the area of financial assistance of 30 lakh to the COVID affected customers during COVID Pandemic. This is the real DNA of co-operative culture. Like democracy, the co- operative movement is of the people, for the people, by the people. You have been living true to the core definition. I admire the same.

I congratulate you, your team of Board of Directors and dedicated staff members of your bank on your entering Golden Jubilee celebration. My best wishes to you for the non-stop growth of the Bank

Your's Truly

(Jyotindra Mehta)

CA (Dr.) Rewati Paithankar,
Chairperson,
Bhagini Nivedita Sahakari Bank Ltd.,
Head Office, Nivedita Bhavan,
CTS No.34/7, Final Plot No.35/7B,
Prabhat Road, Lane No.8, Erandwana,
Pune - 411004, Maharashtra

NATIONAL FEDERATION OF URBAN COOPERATIVE BANKS AND CREDIT SOCIETIES LTD.
B-14, 3rd Floor, A-Block Shopping Complex, Naraina Vihar, New Delhi-110028, India
Telephone : 011 25771170, 25770108, Mob. : +91 9427613701 E-mail : nafcub.jyotindramehta@gmail.com, coop@nafcub.org

बँकेचे विद्यमान संचालक मंडळ


सीए डॉ. रेवती पैठणकर
अध्यक्षा

दीपा दाढे
उपाध्यक्षा

सुनंदा करमरकर
संचालिका

जयश्री काळे
संचालिका


ॲड. जयश्री कुरुंदवाडकर
संचालिका

जयश्री लष्करे
संचालिका

ॲड. सुनीता रानडे
संचालिका

सीएमए डॉ. नेत्रा आपटे
संचालिका

मीना गायकवाड
संचालिका

ॲड. सुप्रिया जोशी
संचालिका

स्वाती काळे
संचालिका


जयश्री रावळ
संचालिका

स्नेहा फडके
स्वीकृत संचालिका

स्मिता देशपांडे
मुख्य कार्यकारी अधिकारी

ॲड. राजश्री करे

डॉ. मंगल कुलकर्णी
व्यवस्थापन मंडळ सदस्य

सीएमए डॉ. सोनाली धर्माधिकारी

सविता थत्ते
सेवक प्रतिनिधी

प्रस्तावना

गुढीपाडवा, २२ मार्च २०२३, या दिवशी भगिनी निवेदिता सहकारी बँक मर्यादित, पुणे सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे. या निमित्ताने बँकेच्या स्थापनेपासूनच्या वाटचालीची माहिती देणारी स्मरणिका आपल्या सर्वांसमोर अतिशय आनंदाने सादर करीत आहोत.

कोणत्याही प्रवासाची सुरुवात पहिल्या पावलाने होते. बँक स्थापनेच्या वेळी फक्त महिला चालविणार असलेली बँक प्रत्यक्षात उभी राहील का, उभी राहिल्यास किती काळ चालेल, याबाबत जनमानसात साशंकता आणि अविश्वास होता. फक्त महिलांनी चालवलेल्या बँकेचं एकही उदाहरण डोळ्यांसमोर नव्हतं. त्यामुळे भाग भांडवलासाठी रु १०० काढून द्यायला सुद्धा लोक बिचकत असत. एकूणच, महिलांनी बँक सुरु करण्याच्या दृष्टीने सामाजिक परिस्थिती फारशी अनुकूल नसण्याचा हा काळ होता. अशा परिस्थितीत बँक सुरू करण्याचं, चालविण्याचं कोणतंही औपचारिक शिक्षण किंवा अनुभव नसताना, केवळ आंतरिक तळमळ आणि जिद्द यांच्या जोरावर बँकेच्या संस्थापकांनी पाहिलं पाउल टाकण्याचं धाडस केलं, भरारी घेतली. ५० वर्षांची यशस्वी वाटचाल झाल्याने आता ही भरारी 'सुवर्णभरारी' ठरली आहे.

आज महिलांनी सर्वांसाठी चालविलेली. आपल्या असंख्य ग्राहकांना अद्ययावत सेवा देणारी सातत्याने कमाल लाभांश देणारी आणि कमीत कमी अनुत्पादित कर्जे राखणारी 'भगिनी निवेदिता सहकारी बँक मर्यादित' अनेकांना सुपरिचित आहे. महिलांनी चालविलेली बँक हे सगळं कसं साध्य करू शकली, याविषयी अनेकांना कुतूहलही आहे. बँकेच्या असंख्य भागधारक, खातेदार आणि हितचिंतकांना ही बँक कोणत्या उद्देशाने स्थापन झाली, महिलांनी सर्वांसाठी चालवलेली बँक असे का, भगिनी निवेदिता यांचच नाव बँकेसाठी का निवडण्यात आलं, या प्रश्नांची उत्तरे या 'सुवर्णभरारी' स्मरणिकेत मिळतील.

१९७४ साली बँकेच्या स्थापनेच्या वेळेस असणारे सामाजिक आणि आर्थिक वातावरण, बँक उभी करण्यासाठी आणि सक्षमपणे चालविण्यासाठी संस्थापक, संचालक आणि सेवकांनी घेतलेले कष्ट, त्यासाठी गेल्या ५० वर्षापासून जोपासलेली मूल्यं हे सर्व बँकेची धुरा पुढे नेणाऱ्यांना भागधारक, खातेदार आणि हितचिंतकांना माहिती व्हावं यासाठी ही स्मरणिका तयार करणं आवश्यक वाटलं. बँकेच्या कार्यपद्धतीत सातत्य राखण्यास आणि बँकेने गेल्या ५० वर्षात जोपासलेली मूल्य आणि कार्यसंस्कृती टिकवून पुढे नेण्यास ह्या स्मरणिकेचा हातभार लागेल अशी खात्री वाटते.

बँकेच्या सुरुवातीच्या काळात बँक उभी करण्यासाठी संस्थापकांच्या बरोबरीने काम

सुवर्णभरारी

केलेल्या जेष्ठ माजी संचालिका श्रीमती प्रमिलाताई गरूड यांनी स्मरणिकेसाठी काही आठवणी लिहाव्यात, अशी संचालक मंडळाने त्यांना विनंती केली. त्यांनी लिहिलेल्या आठवणी तसेच बँकेची स्थापना ५० वर्षांची वाटचाल आणि भविष्यातील योजनांविषयी माहिती संकलित करून त्याचे शब्दांकन करण्याची जबाबदारी सर्वानुमते सुप्रसिद्ध लेखिका मंगलाताई गोडबोले यांचे वर सोपविण्यात आली. स्मरणिकेसाठी योग्य माहिती मिळविण्यात संस्थापकांबरोबर प्रत्यक्ष काम केलेल्या ज्येष्ठ माजी संचालिका श्रीमती सरलाताई रेगे आणि श्रीमती सुमित्राताई गोवईकर तसेच अनेक माजी आणि विद्यमान सेवकांचे मोलाचे सहकार्य मिळाले. बँकेची कार्यपद्धती, बँकेच्या इतिहासातील महत्त्वाचे टप्पे वेळोवेळी बँकची भूमिका यांची माहिती बँकेची सद्यस्थिती, ध्येयधोरणे, विविध स्तरांवर बँकेच्या कामाची घेतली जाणारी दखल, ५० व्या वर्षातील बँकेच्या योजना आणि भविष्याचा वेध याची माहिती बँकेच्या संचालक मंडळाच्या वतीने अध्यक्षांच्या बरोबरीने उपाध्यक्षा दीपा दाढे, विद्यमान संचालिका सुनंदा करमरकर, जयश्री काळे आणि जयश्री कुरुंदवाडकर यांनी दिली. बँकेच्या ज्येष्ठ संचालिका विद्याताई रानडे याही या कामकाजात सक्रीय सहभागी होत्या परंतु स्मरणिका पूर्ण होण्यापूर्वी त्या कालवश झाल्या. त्या मुळे पूर्णत्वाला गेलेली स्मरणिका त्या पाहू शकल्या नाहीत. या सर्वांच्या सहभागातून साकारलेली आणि मंगला ताईंच्या सिद्धहस्त लेखणीतून शब्दांकित झालेली 'सुवर्णभरारी (भगिनी निवेदिता सहकारी बँकेची सुवर्ण महोत्सवी वाटचाल)' ही स्मरणिका बँकेच्या ५० वर्षांच्या वाटचालीचा दस्तऐवज म्हणून आज आपल्या समोर आहे.

बँकेची विद्यमान अध्यक्ष म्हणून मी यासाठी सर्वांची आभारी आहे.

सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या या टप्प्यावर बँक इथवर कशी पोचली ह्याचं स्मरण करून भविष्याला सामोरे जाण्यास बँकेचे संचालक आणि सेवक सज्ज आहेत. 'अनुशासन, जबाबदार प्रशासन आणि योग्य जोखीम व्यवस्थापन' या बँकेने निवडलेल्या मार्गावरून भगिनी निवेदिता सहकारी बँक यापुढेही वाटचाल करीत राहील याची आम्हाला खात्री आहे.

ह्या सुवर्ण महोत्सवी वाटचालीत सदैव आमच्या बरोबर असणाऱ्या, आमच्या वर विश्वास ठेवणाऱ्या आमच्या प्रत्येक योजनेला भरभरून प्रतिसाद देणाऱ्या आणि सर्व अर्थाने आमचे बलस्थान असणाऱ्या आमच्या असंख्य भागधारक सभासद खातेदार आणि हितचिंतकांचे मनापासून आभार! बँकेशी असणारे आपले नाते भविष्यात अधिकाधिक दृढ व्हावे हीच सदिच्छा!

सीए डॉ. रेवती पैठणकर
अध्यक्षा,
भगिनी निवेदिता सहकारी बँक मर्या., पुणे

अनुक्रम

लोकाभिमुख बँकेचे स्वप्न!............................... ३

पायाभरणी आणि नामकरण ९

शुभारंभ ते रौप्य महोत्सव................................ १९

शाखा विस्तार आणि 'निवेदिता भवन' ४७

बँकेची कार्यसंस्कृती ५३

वेध भविष्याचा... ७१

विशेष आभार

भगिनी निवेदिता सहकारी बँकेची ही सुवर्णमहोत्सवी वाटचाल वाचकांपुढे ठेवण्यासाठी बँकेचे विद्यमान संचालक मंडळ, पदाधिकारी व कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. त्याचबरोबर या बँकेच्या आजवरच्या वाटचालीचा भाग असणारे माजी संचालक, पदाधिकारी, कर्मचारी, खातेदार आणि हितचिंतक यांनी दिलेली माहितीही मोलाची ठरली. या वाटचालीचे शब्दचित्रण पुढील व्यक्तींच्या मुलाखतींमधून आम्ही करू शकलो :

सुमित्रा गोवईकर	**सीए सदानंद घैसास**
सरला रेगे	**वसंत लष्करे**
रेखा भट	**गुणेश साने**
श्रद्धा नातू	**जयराम देसाई**
दीपा हुरकडली	**अनिल गायकवाड**
अंजली तेरेदेसाई	**प्रवीण दरेकर**
नीला भोपटकर	**नामदेव चव्हाण**
यास्मीन ममदानी	**शशांक कुलकर्णी**
अंजली खर्शीकर	**प्रभाकर मारणे**
सुशीलाबाई परदेशी	**गिरीष खत्री**
	विलास टापरे

विशेष सहकार्य

प्रमिला गरूड　　**शुभदा नातू**　　**शैला जोशी**

स्मरणिका समन्वयक

आरती फडके

लोकाभिमुख बँकेचे स्वप्न!

वर्ष १९७३
स्थळ - पुण्यातील चतु:शृंगी मंदिर परिसर.
काळ - नवरात्री निमित्तच्या जत्रेचा.
वातावरण - उत्सवी आणि उत्साही.

साहजिकच सगळा परिसर माणसांनी फुललेला होता. माणसांची गजबज, पिपाण्यांचे-मेरी गो राउंडचे आवाज, फुग्यांचे, खेळण्यांचे, चहा-कॉफीचे, खाद्यपदार्थांचे स्टॉल्स ह्यामुळे एकच झुंबड उडाली होती. पण तिच्यातही एक स्टॉल अनेकांचे लक्ष वेधून घेत होता.

तो फार भव्यदिव्य होता म्हणून नव्हे, तर तिथून ऐकू येणाऱ्या घोषणा वेगळ्या होत्या म्हणून. स्टॉलवर मागे पोस्टर्स होती, पुढे हॅण्डबिलं ठेवली होती आणि स्टॉलवर तीनचार महिला आपल्या मुलांसोबत उभ्या राहून घोषणा देत होत्या.

'आजच सभासद व्हा. आपलं भविष्य सुरक्षित करा.'

'फक्त १ रुपया भरून खातं उघडता येईल.'

'महिलांनी सर्वांसाठी चालवलेली पुण्यातली पहिली सहकारी बँक. लवकरच सुरू होतेय. भागधारक व्हा. खाती उघडा. सर्व प्रकारच्या, खात्रीच्या बँकिंग सेवा मिळवा!'

अशा जत्रेमध्ये अशा घोषणा ऐकायला मिळणं हे लोकांना दचकवणारं ठरावं असा तो काळ होता. बायकाबायका मिळून बँक सुरू करणार? असं कधी झालंय का? ह्या प्रकल्पाचं तरी पुढे काय होणार आहे? नाना शंका-प्रश्न लोकांच्या चेहऱ्यावर दिसत होते. स्टॉलवर उभ्या असलेल्या महिला सर्व प्रश्नांना चोख उत्तरं देऊन लोकांचं शंका-निरसन करत होत्या. त्यांच्या मनात आणि त्यामुळे बोलण्यातही जराही संदेह नव्हता. त्या ठामपणे सांगत होत्या, ''होय, लवकरच आम्ही एक सहकारी बँक सुरू करणार आहोत. एक आगळीवेगळी सहकारी बँक.

जी आम्ही महिला चालवू. पण जी फक्त स्त्रियांपुरती मर्यादित नसेल. कुटुंबातल्या, उद्योगातल्या छोट्यामोठ्या आर्थिक गरजा कमीतकमी वेळात आणि चांगल्यात चांगल्या प्रकारे पूर्ण करणं हे आमचं उद्दिष्ट असेल. आता लोकांनी विश्वासाने हात पुढे करावा. पुढे आयुष्यभर आम्ही सदैव साथ देऊ.''

ज्या काळात सर्वसाधारणपणे महिला अर्थकारणापासून दूर होत्या, किंवा पुरूषांकडून दूर ठेवल्या जात होत्या, ज्या काळात कौटुंबिक आर्थिक व्यवहाराबद्दलही त्यांना अंधारात ठेवलं जात होतं, ज्या काळात शिक्षण-अर्थार्जन स्वतंत्र अस्तित्व अशा विकासाच्या वाटांवर महिलांची पावलं तुरळकपणे पडत होती, त्या काळात महिलांनी एकत्र येऊन बँक सुरू करण्याची कल्पनाही पचायला जड जाणारी होती. प्रत्यक्ष कार्यवाही तर दूरच. असं असूनही अशा धाडसी निर्णयाप्रत ह्या महिला येऊ शकल्या, हे विशेष!

पुण्याच्या सदाशिव पेठेत राहणारं एक धडपडणारं तरुण दांपत्य. दाढे दांपत्य! आजही भगिनी निवेदिता सहकारी बँकेचा उल्लेख झाला की अनेकांच्या तोंडून अभावितपणे त्यांचंच नाव येतं.

अशी एखादी बँक सुरू करण्याच्या कल्पनेपासून ते तिला लोकमान्यता मिळवण्याचं उद्दिष्ट गाठेपर्यंतचे पहिले, आद्य मार्गदर्शक होते ते श्री. विवेक गणेश दाढे. जन्माने आणि मनाने पुणेकर असणारे श्री. दाढे हे व्यवसायाने चार्टर्ड अकाउंटंट होते. त्यांच्या सदाशिव पेठेतल्या राहात्या घरातच त्यांनी स्वत:ची 'व्ही. जी. दाढे आणि कंपनी' ही चार्टर्ड अकाउंटन्सी फर्म सुरू केली होती. तिच्यात ते व्यग्रही होते. पण ज्ञानाची, शिक्षणाची ओढ त्यांना तेवढ्यावर थांबू देत नव्हती. म्हणून ते कॉमर्सच्या विषयांचे व्याख्याते म्हणून अहमदनगर कॉलेजमध्ये आठवड्यातले ठरावीक दिवस जात असत. नगर भागात ते अकाउंटन्सीची कामंही करून देत. त्यामुळे तो परिसर त्यांच्या परिचयाचा झालेला होता. १९७०-७१ मध्ये अहमदनगर बरंचसं ग्रामीण स्वरूपाचं होतं. तिथे फारशा बँका नव्हत्या. ज्या होत्या त्यात महिलांचा वावरही फारसा नव्हता. उलट आर्थिक टंचाई, आर्थिक व्यवहारांमधली अनभिज्ञता, पैशाची तोंडमिळवणी करताना होणारी फरपट हेच चौफेर घेरून राहिलेलं दिसत होतं. इथल्या मध्यमवर्गीय कुटुंबांना, महिलांना आर्थिक नेतृत्व देणारी, त्यांचे प्रश्न समजून घेऊन आर्थिक विषयात मार्गदर्शन करणारी एखादी सहकारी बँक सुरू व्हायला हवी असं त्यांना तीव्रपणे वाटत होतं. त्यातूनच तिथल्या महिला वर्गाला एकत्र आणून, अर्थसाक्षरतेचे धडे देऊन, त्यांच्यासाठी १९७१मध्ये 'अहमदनगर शहर सहकारी बँक' त्यांनी सुरू केली होती. आरंभापासूनच ह्या बँकेत एक स्वतंत्र महिला विभाग ठेवण्याचा प्रयोग केला होता. बँकेच्या कामकाजात आपल्याच महाविद्यालयातल्या विद्यार्थिनींना, आसपासच्या इच्छुक गृहिणींना रीतसर प्रशिक्षण देऊन तयार केलं होतं.

हळूहळू ह्या बँकेचा जम बसत होता. थोडक्यात म्हणजे त्यांचा अर्थक्षेत्राचा चांगला अभ्यास होता. भरपूर पूर्वानुभव होता. एखादी बँक सुरू करणं, चालवणं, वाढवणं ह्यासंबंधात अनुभव त्यांच्या गाठीशी होते.

तरीही पुण्यात बँक सुरू करण्याच्या विचारांपर्यंत यायला विशेष कारण झाल्या त्या त्यांच्या पत्नीच.

त्यांच्या पत्नी मीनाक्षी दाढे ह्या 'दाढेवहिनी' म्हणून परिसरात प्रसिद्ध होत्या. पूर्वाश्रमीच्या मीनाक्षी कृष्णराव पाठक ह्यांचा जन्म पुण्यातला, शालेय शिक्षण हुजूरपागेतलं आणि पदवी पुण्याच्या एस.पी. कॉलेजमधली होती. १९५७ साली त्या नव्या सूनबाईंच्या रूपात दाढे कुटुंबात सामावल्या गेल्या. हे दाढे कुटुंब उच्च शिक्षित आणि पुरोगामी विचारांचं होतं. कुटुंबाचा व्याप मोठा असला तरी त्यातून दाढेवहिनींवर जाचक बंधनं पडावीत अशी काही परिस्थिती नव्हती.

बोलका स्वभाव आणि सर्वांना सोबत घेऊन जाण्याची वृत्ती ह्यामुळे दाढेवहिनींनी सदाशिव पेठेत भरपूर माणसं गोळा केली होती. सासू-सासरे ह्यांची सेवा करण्याबरोबरच घरी येणारे दूधवाले, पेपरवाले, बोहारणी, भाजीवाले, आसपासचे दुकानदार, घराजवळचे रस्ते झाडणारे पुणे नगरपालिकेचे सफाई कामगार अशा सगळ्यांशी त्यांनी जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित केले होते. गुरांचे डॉक्टर असणाऱ्या सासऱ्यांकडे आपली गुरं-जनावरं घेऊन येणारे कामकरी असोत किंवा मोठ्या कुटुंबाचा गाडा हाकण्यासाठी येणारे नोकरचाकर असोत. दाढेवहिनी अशा सर्वांशी मोकळेपणाने संवाद साधू शकत. अशी निम्नवर्गातली माणसं, विशेषत: महिला, पैशांसाठी किती प्रकारची लाचारी पत्करतात, धोके झेलतात आणि पैशाअभावी त्यांचा जीवनसंघर्ष किती कडवा होऊ शकतो हे त्यांना रोजच दिसत होतं. ह्यातल्या अनेक गरजूंना त्या वेळोवेळी आर्थिक मदत करतही. पण ही छोटी हातउसनी कर्जं फेडणंही त्यातल्या अनेकांना जमत नसे. एकाचं कर्ज फेडायला दुसऱ्याकडून उचल घेण्याच्या चक्रात अडकलेली ही माणसं आपल्या आर्थिक समस्या कधीच सोडवू शकत नसत.

ह्यातून अनेकदा दाढेवहिनींना वाटे, ह्या सर्व मंडळींना, त्यातही विशेषत्वाने महिलांना, चांगल्या हितकारी बँकेचं पाठबळ मिळणं गरजेचं आहे. ते कोणीतरी द्यावं. पण कोणीतरी देण्याची वाट बघण्यापेक्षा आपणच सहकाराचा हात पुढे केला तर?

दाढेवहिनी बुद्धिमान होत्या. आत्मनिर्भर होत्या. नवीन विषयाचा परिचय करून घेणं असो, वाहन चालवणं असो, अनोळखी ठिकाणी जाणं असो, अनोळखी माणसांशी आत्मविश्वासाने बोलणं असो, दाढेवहिनी ह्या कशातही कमी पडत नव्हत्या. पतीचं बँकिंगचं ज्ञान आणि पत्नीची कोणतंही काम करण्याची तयारी ह्यांचा संगम साधून नव्याने बँकिंग क्षेत्रामध्ये शिरणं दाढे दांपत्याला काही अशक्य नव्हतं.

श्री. विवेक दाढेंना ह्या शक्यता दिसत

होत्याच. मात्र त्यासाठी आपल्या पत्नीने पहिल्यांदा समविचारी महिलांचा एक संच तयार करावा आणि त्यांनी दररोज, नियमितपणे भेटून, चर्चा करून, विनामूल्यच नव्हे, तर प्रसंगी पदरमोड करूनही, काम करण्याची तयारी दाखवावी. असे भरवशाचे साथीदार गोळा करता आले तर एक आदर्श बँक सुरू करणं शक्य आहे हे त्यांनी पत्नीच्या लक्षात आणून दिलं. दाढे साहेबांचा व्यासंग आणि दाढेवहिनींची कार्यक्षमता ह्यांची सांगड घालून नवी लोकाभिमुख बँक सुरू करण्याचं स्वप्नं आकार घेऊ लागलं. चर्चांमध्ये एकेक मुद्दे पुढे येऊ लागले. बँक सुरू करायची तर भांडवलं उभारावं लागणार.

त्या काळात हे भांडवल किमान १ लक्ष रुपयाचं असावं लागे. त्याचे प्रत्येकी २५ रुपयांचे ४००० शेअर्स होणार.

एवढे पैसे कोणाकडून गोळा करावेत? तर परिचयातल्या, नात्यातल्या, विश्वासातल्या माणसांकडून. जे आपल्या शब्दाखातर पैसे गुंतवण्यासाठी देतील त्यांच्याकडून.

अशा प्रकारे लोकांना पैसे गुंतवण्यासाठी उद्युक्त कसं करता येईल? तर, १०० रुपयांचा शेअर घेणाऱ्याला बँक सुरू होताच १००० रुपये कर्ज मिळू शकेल असा आकर्षक प्रस्ताव मांडून.

बँकेचं सभासदत्व घेण्यासाठी काही प्रवेश शुल्क तर ठरवणं गरजेचं होतं. ते प्रत्येकी २ रुपये ठेवावं, सामान्यातल्या सामान्य माणसाला परवडणारं असावं, असं ठरलं.

आपल्याला फक्त महिलांसाठी बँक काढायची आहे का? तर नाही. गरजूंसाठी, आर्थिक मर्यादांमध्ये जगणाऱ्यांसाठी

दाढे दाम्पत्य भागभांडवल गोळा करण्यासाठी मार्गदर्शन करताना. (उभ्या) मीनाक्षी दाढे

बँक काढायची आहे. छोटी कर्जे घेऊन, छोटामोठा उद्योग करून, हातावर पोट भरणाऱ्यांसाठी आर्थिक पाठबळ द्यायचं आहे. आपल्या परिघात ह्या गटातल्या महिला जास्त असल्याने त्या बँक योजनांचे लाभ जास्त घेतील, हे शक्य आहे. पण बँक त्यांच्यापुरती सीमित असणार नाही.

बाकी लाभधारक महिला असोत किंवा पुरुष, बँक ही संपूर्ण सहकारी तत्त्वावर चालेल. सर्वांच्या सहकार्यातून, सर्वांसाठी चालवली जाणारी आदर्श सहकारी बँक!

ती चालवणाऱ्या महिला असतील. तिच्यात कामं करणाऱ्या बहुतांश महिला असतील. तिच्यातून सर्वांना नुसतं अर्थसाहाय्य नव्हे, तर अर्थसाक्षरताही दिली जाईल. सर्वांनाच पैसा वापरायला-वाचवायला-वाढवायला शिकवलं जाईल.

ह्या कामात पुढाकार घेणाऱ्या महिला कशा असाव्यात? सुरुवातीला तरी सुस्थितीतल्या घरातल्या, मध्यम वयीन गृहिणी असाव्यात. ज्यांची मुलं थोडी मोठी झालीयेत, ज्यांना घरातून दुपारचे तीन-चार तास मोकळीक काढता येईल. ज्यांच्यावर स्वत:चे पैसे कमावण्याचा दबाव नसेल अशा समाजहितेच्छु महिला असाव्यात.

थोडक्यात म्हणजे दाढेवहिनींसारख्या सांस्कृतिक-सामाजिक पार्श्वभूमी असणाऱ्या महिला सोबत असाव्यात हे धोरण ठरलं.

दाढेवहिनी आपल्या शेजारणी-मैत्रिणी ह्यांना ह्या संदर्भात चाचपू लागल्या. एक वेळ त्यांना बँकिंग संबंधातली माहिती देता येईल. पण गरजूंसाठी निरपेक्षपणे जीव ओतून काम करण्याची मनोवृत्ती मात्र मूलत:च असायलाच हवी होती. नवं काही शिकण्याची,करून बघण्याची जिद्द असायला हवी होती.

दाढेंच्या घरी दररोज दुपारी अशा समविचारी महिला जमू लागल्या. घरामध्ये दाढे साहेबांचं V.G.Dadhe & Co. ह्या सी.ए. फर्मचं ऑफिस होतं. त्यामुळे घराच्या व्हरांड्यातच ह्या महिला रोज दुपारी १२ ते ४ ह्या वेळात जमून चर्चा करू लागल्या. बँक चालवायची म्हणजे कोणती कोणती कामं करावी लागतील, आपल्यापैकी कोणाला कोणती कामं जमतील, कोणती नव्याने शिकून घ्यावी लागतील ह्याचा आढावा घेऊ

सहकार संस्कार

सहकारी चळवळीचा परिणाम जगाच्या उन्नतीवर झाला आहे. अशा सर्वोपयोगी तत्त्वाचे अवलंबन करून त्याची वाढ केली पाहिजे. म्हणजे आपल्याला आपले हक्क मिळण्यास सामर्थ्य येईल.

– राजर्षी छत्रपती शाहू महाराज

लागल्या. सुनीती देऊळगावकर, निर्मला चांदोरकर, सरोजिनी बाबर, कुमुदिनी पवार, या महिलांना शेख मोहिउद्दिन अहमद, कृष्णराव बाबर, रामचंद्र सातपुते अशा मंडळींची साथ मिळाली आणि एक ‘कोअर ग्रुप’ तयार झाला. त्यांनी पदरचे १०२ रुपये भरून सभासदत्व घेतलं आणि तेवढ्या आधारावर पुण्यामध्ये भागधारक मिळवण्याचे प्रयत्न सुरू केले. त्या काळात १०० रुपये ही मोठी रक्कम वाटायची. १०० रुपयांमध्ये अनेक कुटुंबांचा मासिक खर्चही भागत असे. एवढी मोठी रक्कम सहजपणे द्यायला तयार होणारे १००० सभासद मिळवता आले तर १ लक्ष रुपयांचं भागभांडवल तयार होणार. तेवढं भागभांडवल जमा केल्याशिवाय बँक सुरू करता येणार नव्हती. आणि तेवढं भागभांडवल त्या काळात जमवणं ही साधी गोष्ट नव्हती. काय काय करावं लागेल बरं? घरोघरी जावं? नातेवाइकांकडे जावं? वाड्यावस्त्यांवर जावं? लोकांच्या सभा घ्याव्यात? भाषणं करावीत? घरातल्या पुरूषांना पटवून द्यावं? घरातल्या बायकांना उद्युक्त करावं? बँकेचे भागधारक होण्याचे फायदे समजावून सांगावे? अनेक कल्पना चाचपून पाहायला सुरूवात झाली. नजीकच्या काळात त्या वर्षीचा दसरा येऊ घातला होता. त्याचा शुभंकर मुहूर्त बघून म्हणजे ६ ऑक्टोबर १९७३ रोजी भांडवल संकलनाची मोहीम सुरू करायचं ठरवलं गेलं. त्याची वातावरण निर्मिती करायला चतु:शृंगी यात्रेचा वापर करून घ्यावासा वाटला.

ह्या कल्पनेचं दृश्य रूप म्हणजेच त्या भावी बँकेचा हा स्टॉल होता. तो अपेक्षित तेवढीच नव्हे, तर त्याहूनही खूप वातावरणनिर्मिती करण्यात यशस्वी झाला होता. गावभर चर्चा होऊ लागली होती. बायका बँक सुरू करताहेत? कधी? कुठे? कशी? बघायलाच हवं!

❖❖❖

१६२७, सदाशिव पेठ येथे बँकेची मुहूर्तमेढ!

पायाभरणी आणि नामकरण

‘१६२७, सदाशिव पेठ’ ह्या दाढे साहेबांच्या घरातल्या तिसऱ्या मजल्यावरच्या व्हरांड्यात ह्या स्वयंसेवकांच्या सभा भरायला सुरूवात झाली. दाढे सर प्रत्येक बारीकसारीक गोष्टी समजावून सांगत. शेअर विकायला कुठे जायचं? कसं जायचं? आपला मुद्दा कसा पटवून द्यायचा? पैसे गोळा केल्यास पावत्या कशा द्यायच्या? १०० रुपये एकरकमी देणं शक्य नसेल त्यांच्याकडून हप्त्याहप्त्याने पैसे कसे स्वीकारायचे? हप्त्यांच्या कच्च्या पावत्या कशा द्यायच्या? आपल्या व्यवहारात पारदर्शकता कशी आणायची? वगैरे-वगैरे-वगैरे. आठवड्यातून दोनदा घरातच दुपारी १ वाजता सभा होऊ लागल्या. सोबत चहा दाढेंच्या घरचा असे. तसंच प्रत्येक सभेला हजर असणाऱ्या स्वयंसेविकांना मानधन म्हणून प्रत्येकी १० रुपये दिले जात. बाकी जाण्यायेण्याचा वाहनखर्च जिचा तिने करावा. घरी पोहोचायला अनेकींना संध्याकाळचे ५-६ होत. कारण बस, रिक्षा ह्यांवर पैसे खर्च करण्याऐवजी पायी जाणंच अनेक जणी पत्करत. पण हसतबोलत त्या वाटा लवकर संपत. मुळात पैसे मागणे अवघड. त्यात इथेतर एका संभाव्य प्रकल्पासाठी पैसे मागण्याचे प्रसंग. कोणी शांतपणे, सहृदयतेने सारं निवेदन नीट ऐकून घेतलं तरी जिंकल्यासारखं वाटे. तोंडावर नकारार्थी दार आपटणारे भेटत.

हे सगळं काम त्या काळाच्या पार्श्वभूमीवर फारच विलक्षण होतं. काही वर्षांपूर्वी चिट फंडात पैसे गमावण्याची वेळ आल्याने माणसं पैशाबाबत सावध झालेली होती. ५०-१०० रुपये ह्या रकमा भल्या मोठ्या वाटाव्यात इतपत पैशाला किंमत होती. एकूण आर्थिक घडामोडींमध्ये बायकांचा फारसा सहभाग होऊ दिला जात नसे. बायका स्वत:हून मोठ्या प्रमाणावर पैसे मिळवून देणाऱ्या नोकऱ्या-व्यवसाय कमी प्रमाणात

करत असत. अनेक कुटुंबांमध्ये एखादा माणूस कमावता असून इतर सदस्य त्याच्यावर अवलंबून असत. त्यामुळे पैशाचा कोणताही व्यवहार करताना ‘नवऱ्याला विचारून सांगते’ हा मंत्र बायका उच्चारत. उलट अनेक पतिदेव आर्थिक व्यवहाराबद्दल बायकांना काहीही विचारत- सांगत नसत. अशा परिस्थितीत घरोघर जाऊन भागभांडवलासाठी पैसे मिळवणं हे आव्हान होतं. काही कुटुंबांमध्ये घरच्या माणसांना हे खटकणारंही होत. तरी कष्ट करून, पदरमोड करून हा प्रवास चालू राहिला. काहींच्या कुटुंबीयांनी सक्रिय मदत केली.

१९७४ साली भगिनी निवेदिता बँक सुरू झाली त्या काळात पुण्यामधल्या बँकांची

२४ मार्च १९७४ उद्घाटनाचा दिवस

एकूण परिस्थिती कशी होती, हेही इथे बघण्याजोगे आहे. नुकतंच १९६९ साली बँकांचं राष्ट्रीयीकरण झालेलं होतं. पण बँकांच्या गावोगावच्या शाखा अजून फार कमी होत्या, बँकांचे व्यवहार बरेचदा इंग्रजी भाषेत होत. काही महत्त्वाच्या सेवा, ड्राफ्ट काढणे इ. ह्या बँकेच्या मुख्य शाखेमधूनच केल्या जात. महिलांचा बँकिंगमध्ये फारसा वाटा नसे. अनेकींची स्वत:च्या नावाची बँक खातीही नसत. असली तरी खात्याचे व्यवहार महिला स्वयंप्रेरणेने करत नसे. पती सांगेल त्या जागी सही करून मोकळं होणं, एवढीच ‘गुंतवणूक’ अनेक जणी दाखवत.

तोवर बँक व्यवहार बहुतांशी हाती केले जात. साधा टेलिफोनही उपलब्ध नसे. व्याजाच्या आकारणीसाठी ‘रेडी रेकनर’चा उपयोग केला जाई. कॅल्क्युलेटर, अन्य साधनं दुर्लभ असत. त्यामुळे आजच्यासारख्या जलद बँकसेवा उपलब्ध नसत. आर्थिक उलाढाली संथ गतीने होत. बँकेचे काम म्हणजे वेळखाऊ काम हे गृहीत धरले जाई.

एकीकडे मोठ्या, मान्यताप्राप्त राष्ट्रीयीकृत बँका असत. तशीच दुसरीकडे सावकारीही मोठ्या प्रमाणावर चाले. बँकांमधली कागदपत्रांची पूर्तता कठीण असते, वेळखाऊ वाटते. अडचणीची वाटते आणि तत्काळ पैसे उभे करण्याच्या दृष्टीने कुचकामी ठरते असं वाटणारे अनेक गरजू लोक तातडीच्या आर्थिक गरजेला सावकारांकडेच धाव घेत. सावकार अवास्तव तारण ठेवून आणि मनमानी व्याजदर आकारून पैसे मात्र

लगोलग पुरवत. कागदपत्रांच्या व्यापात न अडकवता कर्ज देऊन ते मोकळे होत आणि अशी कर्ज घेणारे लोक मात्र कायमचे अडकत. ‘सावकारी पाश’ हा सिनेमा-नाटकांचा, कथा-कादंबऱ्यांचा विषय झाला असला तरी नडलेली माणसं स्वत:च्या पायाने त्यांच्यापर्यंत जात. त्यामुळे सावकारी नियमबद्ध करण्याचे, तिला बंदी घालण्याचे कितीही प्रयत्न शासनाकडून झाले तरी छुपेपणाने ती सुरूच राही.

अर्थव्यवहाराच्या एका टोकाला राष्ट्रीयीकृत बँका, तर दुसऱ्या टोकाला स्वच्छंद सावकारी ह्यात हेलकावणाऱ्या सर्वसामान्य माणसासाठी सहकारी बँका सुरू झालेल्या होत्या. छोटे उद्योजक, व्यापारी, असंघटित आस्थापनांमधले कर्मचारी, शेतकरी, कामगार ह्यांसारख्या लोकांनी छोटे, दैनंदिन आर्थिक व्यवहार त्यातून करावेत, नुसते पैसेच नव्हेत तर आर्थिक सल्ला, मार्गदर्शनही जरूर तेव्हा त्यातून घ्यावं अशी कल्पना होती. छोटीछोटी कर्जं घेऊन, तात्कालिक गरजा भागवत पुढे जाणारे अनेक लोक नंतर ह्या सहकारी बँकांचे महत्त्व मान्यही करत होते.

पुण्यामध्ये १९७४च्या सुमारास काही सहकारी बँका कार्यरत होत्या. पण ह्यापैकी एकही सहकारी बँक महिलांनी सुरू केलेली नव्हती किंवा फक्त महिलांना नोकऱ्या देण्याचा विचार करत नव्हती. खरं म्हणजे महिलांची सोयीची वेळ, जागा, व्यवहाराची सुलभता ह्यांची कोणीही फारशी कदर केलेली नव्हती. कारण बँकांसाठी बायका हा महत्त्वाचा ग्राहकवर्ग नव्हता. (अर्थातच स्वत:चे नोकरीतले/ उद्योगातले घसघशीत उत्पन्न मिळवणाऱ्या बायकाही कमीच होत्या.)

महिलांची ही गरज दाढे दांपत्याने ओळखली. बहुतेक कुटुंबाचा आर्थिक व्यवहार बायका हाताळतात पण त्यांची त्यावर कोणतीही सत्ता नसते. त्यांना बँकेची जाणकारी तर सोडाच, पण प्राथमिक माहितीही खूप वेळा नसते. घरातल्या पुरुषाची आर्थिक क्षमता-बौद्धिक कुवत जशी असेल त्यानुसार तो अर्थनियमन करतो आणि त्याची किंमत मात्र बाईला मोजावी लागते, अशी दृश्यं दाढे पती-पत्नी आसपास बघत होते. ह्यावर छोटा, तात्कालिक उपाय म्हणून पतपेढी, क्रेडिट सोसायटी सुरू करणंही शक्य होतं. पण दाढे साहेबांना बँक सुरू करण्याचं स्वप्नच खुणावत होतं.

पैसा गोळा करण्यासाठी घराबाहेर पडणाऱ्या बायकांना नाना प्रकारचे अनुभव येत. कोणी चेष्टा करे. ‘‘महिला आणि सहकार? कसे शक्य आहे ही सांगड जुळणं?’’ कोणी उपदेश करे. ‘‘बायकाबायकांनी मिळून बँक सुरू करणं म्हणजे काय चैत्राचं हळदीकुंकू करणं आहे का?’’ कोणी हमी मागे. ‘‘बँक बुडणार नाही याची काय खात्री?’’

एक वर्ग तर ह्या बायकांना धमकावेही. तो असे तेव्हाच्या सावकारांचा, दलालांचा. किंवा वस्त्यांमधल्या स्थानिक गुंडांचा.

इथले कष्टकरी रहिवासी त्यांच्या मदतीने सावरकारांकडून अवास्तव व्याजदराने कर्ज घेत. पुढे त्या कर्जांपायी घरदार गमावणं, गाव सोडून जाणं असे प्रसंगही ह्यातल्या अनेकांवर येत. पण सकाळी कर्ज काढून भांडवल उभारायचं. त्यातून माल खरेदी करून दिवसभरात तो विकायचा आणि संध्याकाळी जवळजवळ दररोजच १०ते ४० टक्के व्याज मोजून बहुतेक नफा त्यातच गमावायचा अशी अनेकांची जीवनव्यथा झालेली असे. अशा वस्त्यांमध्ये ह्या सुशिक्षित बायकांनी सभा घेतल्या, सावकारीमधले अन्याय-अत्याचार उघड केले तर सावकारी धोक्यात येईल, असं वाटल्याने या बायका येताना दिसल्या की काही वेळा गुंड त्यांच्या अंगावर धावून येत. अशा ठिकाणी चार-पाच वेळा थेट पोलिसांच्या संरक्षणात प्रचारसभा घ्याव्या लागल्या. पण ह्यामुळे कोणीही माघार घेतली नाही.

अशा प्रकारे शेअर्स विकून म्हणजेच नवनवे भागधारक मिळवून ह्या बायका जे काही पैसे गोळा करत ते रोज तात्पुरत्या ऑफिसमध्ये जमा करत आणि ते मिळाल्याची नोंद, चिठ्ठ्या ऑफिसमधल्या एका बैठ्या लाकडी डेस्कमध्ये टाकून ठेवत. त्यांची नोंद करणं, हिशोब ठेवणं, अशा कामांसाठी दोन गरजू महिलांना इथे नोकरीवर ठेवलेलं होतं. त्या रोज दुपारी इथे येऊन, खाली बसून त्या डेस्कच्या तिरप्या लाकडी झाकणावर ह्या चिठ्ठ्यांची व्यवस्था लावत. त्यांनी करून दिलेल्या पक्क्या पावत्या पुढे त्या त्या

खातेदारांना मार्गदर्शन करताना सेवकवर्ग

भागधारकाकडे पोहोचवल्या जात.

ह्या व्यवस्थेमध्ये दाढे सरांच्या मार्गदर्शनाचा मोठा वाटा असे. ते हाडाचे शिक्षक होते. पैसे गोळा करताना, वापरताना, वाढवताना संयम आणि धीर धरणं ह्याचं किती महत्त्व आहे हे ते वारंवार सांगत. खुद्द त्यांच्याच पत्नी मोठ्या धाडसी होत्या. पण दाढे साहेब त्यांचंही समुपदेशन करत. अधूनमधून बैठका घेऊन, कुठे चुकतं? काय कमी पडतंय? ह्याची जाणीव करून देत. पुढे ह्या बाबतीत त्यांनी आपल्याच अहमदनगर शहर सहकारी बँकेतल्या वसंत गुंदेचा ह्यांची मदत घ्यायला सुरूवात केली. गुंदेचांना बँकेच्या कामकाजाचं चांगलं ज्ञान आणि अनुभव होता. ते अहमदनगरहून अधूनमधून पुण्याला येऊन मार्गदर्शन करत. पुढे भगिनी निवेदिता बँक सुरू झाल्यावर सुरुवातीच्या काळात तर ते पूर्ण वेळ मॅनेजर पदावर रुजू झाले.

कितीही झालं तरी मौखिक प्रचाराला मर्यादा होती. सगळेच स्वयंसेवक काही सगळी माहिती प्रभावीपणे सांगणारे नव्हते. आता छापील माहितीपत्रकांची गरज भासू लागली. सोप्या मराठीमध्ये ती बनवून घेतली. घरोघरी ती पोहोचवणं आणि सोबत आपणही शंका-निरसन करून समोरच्या व्यक्तीला 'भाग' घ्यायला भाग पाडणं हे उद्दिष्ट असे. या कामासाठीही आसपासच्या गरजू महिला व पुरुष निवडले गेले. ते दररोज वेगवेगळ्या भागांमध्ये फिरून प्रचार करू लागले. जमतील तितके शेअर्स विकू लागले. ह्या सगळ्याला एक व्यवस्थापकीय शिस्त लागावी म्हणून दाढेंच्या राहत्या घरातच बँकेचं एक 'प्रचार कार्यालय' सुरू केलं. एक मदतनीस तिथल्या व्यवस्थापनासाठी नेमला. रोजच्या प्रचारकार्याचा आढावा घेऊन वेगवेगळे मार्ग, पर्याय सुचवणं हे दाढे साहेब व दाढेवहिनींचं काम राहिलं. पण दररोज थोडेतरी शेअर्स होल्डर्स वाढू लागले, हे खरे!

शैक्षणिक संस्थांमध्ये, सरकारी-निमसरकारी ऑफिसांमध्ये, कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष जाणं, तिथल्या कर्मचाऱ्यांसाठी सभा घेणं ह्या प्रकारचे उपक्रम स्वयंसेविका राबवत होत्याच. एकूणच पुण्याच्या परिसरात अशी एखादी बँक सुरू होण्याबाबतचा बोलबाला पुष्कळ होत होता. असं करता करता

सहकार संस्कार

पवित्र, श्रद्धापूर्ण आणि आपल्या कामावर अढळ निष्ठा असणारे कार्यकर्ते एकत्र येऊन सहकाराचा भाव जपत या देशाचे भविष्य निर्माण करू शकतात.

– प. पू. डॉ. केशव बळीराम हेडगेवार

एक लाख रुपयांचं भागभांडवल सर्वसाधारण माणसांकडून- महिलांकडून उभं करावं आणि बँकेची सहकार खात्याकडे रीतसर नोंदणी करून बँक सुरू करावी हे उद्दिष्ट केवळ तीन महिन्यांमध्ये गाठलं गेलं. तेव्हा प्रश्न आला, बँकेचं नाव कोणतं ठेवावं? एखाद्या राजकीय पुढाऱ्याचं, एखाद्या ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाचं नाव सहजपणे देता आलं असतं, पण काही वेळा अशी नावं थेट विशिष्ट जातींच, धर्मांचं, निष्ठांचं सूचन करतात. ते टाळायचं होतं. कोणाही छोट्या, गरजू व्यक्तीला योग्यवेळी आर्थिक पाठबळ देणं हे एवढंच उद्दिष्ट होतं. गरजेला वैध मदत करणं हा धर्म पाळायचा होता. बँकेच्या संबंधातल्या सुरुवातीच्या काही मीटिंग्ज शारदा मठाच्या जवळ होत असत. तिथे विवेकानंदांच्या शिष्या भगिनी निवेदितांच्या कार्याचा गौरव होत असे. भगिनी निवेदितांचं काम गौरवास्पद होतंच. विवेकानंदांच्या ह्या शिष्या जन्माने आयरिश होत्या. त्यांचं मूळ नाव मागरिट एलिझाबेथ नोबल. त्या १८९५मध्ये पहिल्यांदा लंडनमध्ये स्वामी विवेकानंदांना भेटल्या. विवेकानंदांचे विचार, त्यांचा व्यासंग आणि जनहिताची त्यांची तळमळ ह्यामुळे मागरिट भारावून गेल्या. इतक्या की, १८९८मध्ये त्या आपली सर्व पार्श्वभूमी मागे टाकून कलकत्त्याला येऊन राहिल्या. त्या काळात स्वामी रामकृष्ण परमहंस ह्यांच्या पत्नी शारदादेवी ह्यांच्याशी त्यांचा घनिष्ठ स्नेहबंध जुळला. १८९९मध्ये कलकत्त्यात प्लेगची भीषण साथ आली. तिच्यातून तावूनसुलाखून निघेपर्यंत १९०६ मधला बंगालचा दुष्काळ अक्राळविक्राळ रूप घेऊ लागला. अशा आपत्तींच्या काळात सामान्य नागरिकांसाठी व त्यातही गरीब-गरजू स्त्रियांसाठी मोठं मदतकार्य त्यांनी उभं केलं. स्वामी विवेकानंदही रामकृष्ण परमहंसांचेच परम शिष्य, त्यांनी आपल्या ह्या गुरुभगिनीला 'भगिनी निवेदिता' असं नवं नाव दिलं. अवघ्या ४४व्या वर्षी कालवश झालेल्या भगिनी निवेदितांनी भारतातल्या आपल्या वास्तव्यामध्ये अगदी शेवटपर्यंत दीनदुबळ्यांना, अडल्यानडल्यांना मदतीचा हात देऊ केला. ह्यामुळे भगिनी निवेदिता ह्या भारतभरातल्या महिलावर्गाच्या जणू भगिनीच झाल्या. त्यांनी भारताचा पहिला

सहकार संस्कार

गोरगरिबांना शिक्षण देणे आत्यंतिक महत्त्वाचे आहे, त्यामुळे परस्परांतील स्नेहभाव आणि सहकार्य शहरी भागांतून ग्रामीण भागांत पोहोचण्यास मदत होईल. भारताचा ग्रामीण भाग ही सहकाराची खरी ओळख आहे.
– स्वामी विवेकानंद

नकाशा बनवला, स्वदेशीची चळवळ बंगालमध्ये उभारली; 'वंदे मातरम्' चा बंगाली भाषेतला अनुवाद करून दिला. बंगालमधल्या स्त्रीशिक्षणाला चालना दिली अशी इतिहासात नोंद आहे.

एक परदेशी युवती भारतात येऊन आणि अल्प आयुष्य लाभूनही इतकं काम करू शकते. मग आपल्याकडच्या बायकांनी आपल्याच माता-भगिनींसाठी काम का करू नये? ह्या दृष्टीने व त्या थोर महिलेचं उदाहरण सतत डोळ्यांसमोर राहावं म्हणून बँकेला भगिनी निवेदितांचं नाव द्यावं हा विचार पक्का होत गेला. ह्या बाबतीत डॉ. सरोजिनी बाबर ह्यांनी पुढाकार घेतला. त्या पहिल्यापासून ह्या कामाशी जोडलेल्या होत्या. सुरुवातीला काही सभा त्यांच्या घरी होत असत. नाव तर नक्की झालं, पण अधिकृत नोंदणी व्हायची होती. इथवर जरी १००० सभासद झाले असले तरी पुरूषांचा सहभाग वाढवण्यासाठी पुन्हा प्रयत्न करावे लागले. करता करता स्त्रिया आणि पुरुष असे सगळे मिळून १५०० सभासद आणि १,७७,००० रुपये एवढं भागभांडवल तयार झालं. बँक सुरू करण्याचा आर्थिक निकष तर पूर्ण झाला. नजीकचा आणि चांगला मुहूर्त म्हणून १९७४ चा गुढीपाडवा म्हणजेच २४ मार्च हा दिवस निवडला गेला. पण अजूनतरी व्यवसाययोग्य जागा मिळाली नव्हती. ती सदाशिव-नारायण ह्या पेठांच्या आसपास हवी होती. व्यवसायाला साजेशी हवी होती आणि वाजवी भाड्यात हवीच होती. अशा जागेचा शोध सुरू झाला.

१९८० सालातील बँकेचे मुख्य कार्यालय

इथवर टंकलेखिका म्हणून काम करणाऱ्या एक उर्मिला जोशी नावाच्या महिला होत्या. त्यांचे बंधू राष्ट्रभाषा सभेच्या कार्यालयात नोकरीला होते. राष्ट्रभाषा भवन, ३८७-३८८ नारायण पेठ ह्या इमारतीत एक हॉलवजा जागा फारशी वापरात नसल्याची माहिती त्यांना मिळाली. ह्या राष्ट्रभाषा सभेचे प्रमुख कार्यवाह श्री. ग. वा. करमरकर आणि श्री. जानोरकर तसेच प्रवर्तक श्री. गो. प. नेने आणि श्री. ग. ल. ठोकळ हे दाढे साहेबांच्या परिचितांच्या परिघातले होते. सगळेच जागरूक हितचिंतक होते. त्यांच्याशी सल्लामसलत केल्यावर सुमारे ३०० चौरस फुटांची ही रिकामी जागा, थोडीफार डागडुजी करून वापरता येईल असं लक्षात

आलं. तशी ही जागा वरच्या मजल्यावरची, लाकडी जिन्यामुळे ज्येष्ठ सभासदांना चढण्याउतरण्याला काहीशी गैरसोयीची, असली तरी लगेच उपलब्ध होत असल्याने ती घ्यायचं ठरलं. नंतर एका ना एका टप्प्यावर बँकेला स्वत:च्या मालकीच्या वास्तू उभारायच्या होत्याच.

एकदा जागेची निश्चिती झाल्यावर कामांना वेग आला. त्या जागेमध्ये जरूर ती अंतर्गत रचना-सजावट करून घ्यायची होती. बँकेचं एखादं बोधवाक्य ठरवायचं होतं. तिथे दाढेवहिनींचं संस्कृत भाषेचं प्रेम आणि व्यासंग उपयोगी पडला. मुखोद्गत असलेल्या नाना संस्कृत सुभाषितांमधून ‘गृहिणी गृहमुच्यते’ हा अंश त्यांनी बँकेचं बोधवाक्य म्हणून निवडला.

‘न गृहम् गृहमित्याहुः गृहिणी गृहमुच्यते।।’

घरात गृहिणी नसेल तर त्याला घर म्हणता येत नाही, म्हणजेच गृहिणीशिवाय घराला घरपण येत नसतं, असं म्हणून ह्यातून गृहिणींचं महत्त्व अधोरेखित होत होतं. बँकेच्या ध्येयधोरणाशी ते सुसंगतही होतं. इथे गृहिणींमध्ये संस्थापिका, संचालिकांपासून लहानात लहान खातेदारांपर्यंत बहुतेक सगळ्याच बायका सामावत होत्या. त्यांनी एकत्र मिळून अर्थकारणात सामावणं, अर्थसाक्षरता वाढवणं आणि समाजातला एक महत्त्वाचा घटक बनणं ही काळाची गरज होती. साडेतीन मुहूर्तांमधल्या एका मुहूर्तावर शुभारंभ करण्याचं घाटत होतं. पण त्यापूर्वी संबंधित ठराव पास करून घ्यायला हवा होता. कामासंबंधी नियमावली ठरवायची होती. त्या दृष्टीने भागधारकांची पहिली जाहीर सभा ६ मार्च १९७४ रोजी स.प. कॉलेजच्या लेडी रमाबाई सभागृहात घेतली गेली. तिचं अध्यक्षपद डॉ. सरोजिनी बाबर यांनी भूषवलं. बँकेचं पहिलं संचालक मंडळ त्या सभेमध्ये जाहीर केलं. ह्या संचालकांनी बँकेचं सल्लागार मंडळ तिथेच निवडलं. बँकेच्या कार्याला रीतसर सुरूवात करण्याच्या सगळ्या प्रक्रिया टप्प्याटप्प्याने पूर्ण होत होत्या. ह्या सभेत मान्यता मिळालेल्या संचालक मंडळात खालील व्यक्तींचा समावेश होता.

अध्यक्षा - डॉ. सरोजिनी कृ. बाबर

उपाध्यक्षा - मीनाक्षी वि. दाढे

अन्य संचालकांमध्ये, सुनिती देऊळगावकर, कुमुदिनी पवार, मालिनी बोडस, शीला जोशी, सुलोचना बापट, माणिक फुले, शीला असराणी, पुष्पा डांगे, मीनाक्षी घोरपडे, शारदा सातपुते, श्री. कृष्णराव बाबर, श्री. विवेक दाढे व श्री. शेख मोहियुद्दिन अहमद. शासकीय नियमानुसार तीन पुरूष सभासद ह्या मंडळात घेतलेले होते. एकूण संचालिकांमध्ये महिलांचं प्राबल्य होतं. तर सल्लागार मंडळात पुरूष मोठ्या प्रमाणावर होते. सल्लागार मंडळ एकूण ९ लोकांचं योजलेलं होतं. त्यामध्ये कमलाबाई पारखे, सरला रेगे, श्रीमती गंगूताई पटवर्धन, श्री. विठ्ठलराव सातव, श्री. बी.आर. पाटील, श्री. के. व्ही. बांदल, श्री. पु.म. बोडस, श्री.

दा. ना. गांडेकर आणि श्री. यशवंत जोशी ह्यांचा समावेश होता.

ह्या मंडळींमध्ये समाजातले आर्थिक-शैक्षणिक-सांस्कृतिकदृष्ट्या नाना स्तरांतले लोक सामावलेले होते. साहजिकपणे ह्या बँकेच्या व्यवहारांमध्ये सर्व स्तरातंल्या लोकांचं हित जपलं जाणार होतं. कोणालाच वेगळं, झुकतं माप दिलं जाण्याची शक्यता नव्हती. ‘जनसामान्यांचा विश्वास आणि दुवा’ संपादन करणं हे आपलं उद्दिष्ट असल्याचं माहितीपत्रामध्ये जाहीर केलेलं होतं. १९७४ च्या फेब्रुवारी महिन्यात रिझर्व्ह बँकेचा परवाना हाती आला. बँकेचं उद्घाटन करायला एखाद्या राजकीय पुढाऱ्याला, सामाजिक नेत्याला आमंत्रण देणं सहजच शक्य होतं. पण त्यामुळे आयोजिकांचं सगळं लक्ष, सगळं बळ त्याच्यावरच केंद्रित करावं लागलं असतं. आणि त्याच्या सरबराईत सर्वसाधारण ग्राहक दुर्लक्षित राहिला असता. हा धोका पत्करायचा नव्हता. म्हणून जो कोणी सर्वांत पहिल्यांदा खातं उघडेल त्याच्याच हस्ते उद्घाटन करावं, म्हणजेच, उद्घाटन झाल्याचं जाहीर करावं, असं ठरवलं. सकाळी ९.३० वाजता लक्ष्मीपूजनाने शुभारंभ करावा आणि दिवसभर लोकांना खाती उघडण्याची सोय करून द्यावी असं चर्चेतून निष्पन्न झालं. बँक सुरू होणार, रोज उठून पैशाशी संबंध येणार, तेव्हा सर्व संबंधितांची प्रतिमा उज्वल राहायला हवी. कोणाबाबतही, कुठेही, संशयाला जागा नसावी. ह्या दृष्टीने बँक सुरू करण्याच्या आरंभीच्या धकाधकीतही या संचालकांनी काही बंधनं स्वत:वर घालून घेतली. बँकेचं कामकाज आणि जनमानसातली प्रतिमा स्वच्छ राहण्याच्या दृष्टीने ही बंधनं आवश्यकच होती.

१) संचालकांनी स्वत:साठी कधीही या बँकेतून कर्ज काढायचं नाही.

२) आपल्या नात्यातल्या मंडळींना इथे नोकरी द्यायची नाही.

३) निवास, प्रवास, खाणंपिणं, घरदार यांसारख्या व्यक्तिगत फायद्याच्या कोणत्याही गोष्टी बँकेकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे घ्यायच्या नाहीत.

४) प्रत्येक निर्णय प्रत्येक वेळेला फक्त

सहकार संस्कार

देशाच्या औद्योगिक प्रगतीसाठी आपल्याला औद्योगिक संस्था सुरु केल्या पाहिजे. ज्यासाठी पुरेसे भांडवल आवश्यक आहे. म्हणूनच त्यासाठी सर्व समाजाला एकत्र करून सहकाराचा प्रयोग केला पाहिजे.

– लोकमान्य टिळक

बहुमतानेच घ्यायचा.

५) राजकारणातल्या व्यक्तींना कोणत्याही कारणाने बँकेत पाचारण करायचं नाही.

हे निग्रह किंवा दंडक आजही तेव्हा इतक्याच कसोशीने पाळले जातात. ह्यामुळे बँकेवर राजकीय किंवा व्यक्तिगत हितसंबंधांचं दडपण कधीही आलं नाही. जनहिताचे निर्णय घ्यायला आणि राबवायला बँक नेहमीच मोकळी राहिली. 'अ-सरकारी' असेल तेच सर्वांत जास्त 'असर-कारी' असेल हा विश्वास त्यामागे होता. मात्र ह्या कठोर निग्रहामुळे काही वेळा संचालकांच्या आप्तेष्टांमधली काही जवळची माणसं नाराज झाली. दुखावली गेली. ही मंडळी, आपल्यातल्या एखाद्याला इथे सहज कर्ज मिळेल, चटकन नोकरी मिळेल, अशा दृष्टीने शब्द टाकायला बघत. त्याला नकार मिळाला की त्रासून जात. ''बाकी सगळे लोक आपापल्या माणसांचा फायदा करून देतात. तुम्हांलाच काय एवढा तत्त्वाचा पुळका आलाय? एक साधी नोकरी किंवा झटपट कर्जही देता येत नसेल, तर तुमच्याकडे शब्द टाकण्याचा, तुम्हांला शेअर होल्डर मिळवून देण्याचा काय फायदा?'' असे प्रश्न करत. पण इथल्या संचालकांनी हे दोषारोप झेलतानाही कधीही आपल्या तत्त्वांशी तडजोड केली नाही. कोणाचीही भीड पडू न देता ठरवलेल्या, अधिकृत पद्धतीने काम सुरू ठेवलं.

१९७४ सालच्या त्या गुढीपाडव्याच्या सुमारास 'घरचं कार्य' असल्यासारखा उत्साह, लगबग, उत्कंठा संस्थापक-संचालकांमध्ये पसरली. निमंत्रणपत्रिका छापल्या गेल्या. पण टपालाने त्या पोहोचाव्यात एवढा वेळ हाताशी उरला नव्हता. म्हणून बहुतेक निमंत्रणपत्रिका हातोहाती घरोघरी पोहोचवल्या गेल्या. नियोजित जागेला सजवण्यासाठी सुतार-रंगारी हे रात्रंदिवस काम करू लागले. बँकेत काम करण्यासाठी माणसांची शोधाशोध सुरू होऊन एक मॅनेजर, काही महिला सहाय्यिका आणि एक पुरूष शिपाई एवढा 'स्टाफ' नेमला गेला. सुरुवातीला तरी ह्या कामाचा व्याप किती वाढेल, किती माणसं लागतील ह्याचा अंदाज नव्हता. काम वाढेल तसतशी माणसं वाढवणं शक्य होतं. आसपास सगळीकडे निमंत्रण पत्रिका जात होती. तिच्यात म्हटलं होतं,



हा लोभ उभयपक्षी किती वृद्धिंगत होणार आहे, हे बघायला बँकही उत्सुक होती आणि जनता जनार्दनही!

❖❖❖

शुभारंभ ते रौप्य महोत्सव

शुभारंभ :

....तर, अशा प्रकारे सप्टेंबर १९७३ च्या सुमारास बँक सुरू करण्याचा विचार आला. १९७३ ऑक्टोबरपासून प्रत्यक्ष प्रचारकार्य सुरू केलं. फेब्रुवारी १९७४ मध्ये संबंधित सर्व परवाने टपालाने आले. केवळ 'महिला बँक' म्हणून नोंदणी न होता सर्वसाधारण श्रेणीत म्हणजे 'जनरल कॅटेगरी'त बँकेचं लायसन्स मिळालं. १९७४ मध्ये बँक सुरू झाली. बघता बघता एक स्वप्न सत्यात आलं.

एक झपाटलेपण.... अविरत कष्ट करण्याची तयारी... धडपड... ह्यांतून एकदम प्रसिद्धीचा झोत अंगावर आला. दाढेवहिनींच्या माध्यमांमध्ये मुलाखती घेणं सुरू झालं. मात्र त्यांनी सगळं श्रेय एकटीचं असल्याचं कधीही भासवलं नाही. हा सगळा सांघिक खटाटोप असल्याचं त्या आवर्जून सांगत. बँकेचं उद्घाटन अभूतपूर्व उत्साहात झालं. लोक रांगा लावूनलावून सभासद होण्याची उत्सुकता दाखवू लागले. अगदी ५ रुपये जमा करू शकणाऱ्यालाही खातेदार केलं जात असल्याने दिवसअखेर तब्बल १००० खातेदार मिळून गेले. त्यांनी जमा केलेले रोख पैसे मोजण्याचं काम मध्यरात्रीपर्यंत चाललं. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रांनी ठळक जागी या उद्घाटनाच्या बातम्या छापल्या. पाडव्याच्या पुरवण्यांमध्ये बँकेला भरपूर जागा दिलेली होतीच. त्यामुळे एकूणच बँकेचा बोलबाला वाढला. पहिल्या दिवसानिमित्त प्रत्येक खातेदाराला दिलेल्या फुलांचा गंध जणू काही चौफेर पसरला.

बँक सुरू होईपर्यंत फक्त शेअर्स मिळवण्यासाठी फिरणारे हे लोक पुढे 'पिग्मी एजंट्स' म्हणून काम करू लागले. आता बँक सुरू झाली होती. त्यामुळे रीतसर भरणापुस्तिका सोबत घेऊन सुमारे ६५ स्वयंसेवक घरोघरी, रस्त्यारस्त्यांवर

फिरू लागले. मंडईत गाळेवाले, गावभरातले फेरीवाले, हातगाडीवाले, कपडेवाले, भांडीवाले वगैरेंकडे जाऊन अक्षरशः २ रुपये, ५-१०-२० रुपये अशा रकमा ते गोळा करत. 'डोअरस्टेप बँकिंग' म्हणजे अशिक्षित लोकांना, आर्थिक व्यवहाराविषयी अनास्था बाळगणाऱ्यांना, जागरूक करणं, हे ह्यातून होऊ लागलं.

पिग्मी एजंट्सना दररोज गोळा केलेल्या रकमेवर ४ टक्के कमिशन रोख मिळे. दिवसभरात किमान दीड-दोन हजार एवढी रक्कम अनेक जण आणत. ह्यात गरजू मुली, बायका बऱ्याच होत्या. तसेच पुरुषही होते. कुठे रोज जायचं, कुठे आठवड्यातून दोनदा-तीनदा जायचं, ह्याचे आपापले आडाखे बांधत. बचत मिळाली की प्रत्येक खातेदाराच्या पुस्तकात तशा नोंदी करून ठेवत. ह्यातलेच काही एजंट पुढे बँकेच्या नोकरीमध्ये सामावले गेले. तर अशा पिग्मी बचतीच्या रकमा पुढे बँकेच्या मुदत ठेवीत गुंतवण्याकडे अनेकांना वळवलं गेलं. अशा प्रकारे पैसे गुंतवणारे व ते जमा करणारे ह्या सर्वांचा ह्या प्रचारकार्यामधून फायदाच होऊन बँकेला भरवशाची खाती मिळाली ती वेगळीच!

बँक कार्यान्वित झाल्यानंतर पुढे जेव्हा राज्य शासनाची ईपीपी म्हणजे एम्प्लॉयमेंट प्रमोशन प्रोग्रॅम ही योजना १९७६ मध्ये कार्यान्वित झाली तेव्हा तिच्या चौकटीमध्ये बसणाऱ्या अनेक स्वयंसेवकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार दरमहा १००

बँकेत ग्राहकांची होणारी गर्दी, त्यावेळच्या जुन्या खतावण्या

रुपयांपासून ३०० रुपयांपर्यंत मानधन सुरू झालं. ह्याचा बँकेला अनेक प्रकारे फायदा झाला. एक तर ५०-६० स्वयंसेवकांच्या काही काळाच्या पगाराचा बोजा बँकेवर पडेनासा झाला. दुसरं म्हणजे अधिक कार्यक्षम स्वयंसेवक ह्या कामाकडे वळू लागले. लोकांना बचतीची सवय लागली, बचतीचे फायदे समजले, अशा लोकांमधून आपल्यासाठी संभाव्य खातेदार मिळवणं बँकेला जमलं. नावलौकिक हळूहळू पसरू लागला.

प्रचार कार्यालय सुरू करणं, अनेक अर्थांनी बँकेच्या फायद्याचं झालं. पुढे १९८६ मध्ये ते बंद केलं गेलं. कारण तोवर बँकेच्या ६ शाखाही सुरू झालेल्या होत्या. अशा प्रचाराची प्राथमिक गरज संपली होती. तसेच प्रचाराचे, प्रसिद्धीचे नवनवे मार्ग, प्रकार काळाबरोबर विकसित झालेले होते. बदलत्या काळाशी जुळवून घेताना बदलतळ तंत्रज्ञान वापरणं अपरिहार्य होतं.

रोज खातेदार वाढत होते. भागधारक वाढत होते. इथल्या सर्व कर्मचाऱ्यांचे अनुभवही वाढत होते. इथे बँकेच्या कामाचं निमित्त करून दुपारी गप्पा मारायला येणाऱ्या भगिनी होत्या. नवऱ्याला कळू न देता, चोरून, आपल्या एकटीच्या नावाने खातं उघडणाऱ्या कोणीकोणी होत्या. कर्जाचा हप्ता भरण्यासाठी बायकोकडून पैसे घेऊन ते स्वतःच्या चैनीवर उडवणारे पुरुष समोर येत होते. पातळात लपवलेल्या, कनवटीला गुंडाळलेल्या, चुरगळलेल्या नोटा देऊन खातं उघडणाऱ्या बायका होत्या. आपल्याला सही करता येत नाही ह्याचा संकोच बाळगणाऱ्या खातेदार होत्या. त्यांना सही करता यावी, म्हणून भरीला घालावं लागलं. जोडप्याने बँकेत येऊन बायकोवर सर्वांसमोर डाफरणाऱ्या एखाद्या नवऱ्याला जरा गप्प करावं लागलं. तर उगाचच कोणा बड्या व्यक्तींचं नाव सांगून रुबाब दाखवणाऱ्याला समज द्यावी लागली. असे नाना प्रकारचे लोक रोज नवेनवे अनुभव देऊ लागले.

सुरुवातीच्या काळात बँकेचे अनेक कर्जदार हे नोकरीतले असत. रंगारी, सुतार, वाहनचालक, रस्ते झाडणाऱ्या बायका, सफाई कामगार वगैरे अल्प शिक्षित मंडळींचा त्यात समावेश असे. मुळात पगार बेताचे. त्यात व्यसनं, चुकीच्या सवयी, अनारोग्य ह्यांमुळे अनेकांना हालअपेष्टांमध्ये जगावं लागे. त्यातही बायका जास्त पोळून निघत. दिवसभर राबराबून मिळवलेला पै-पैसा रात्री नवऱ्याच्या व्यसनामध्ये उडालेला बघावा लागे. वर नवऱ्याकडून मारहाण सोसणं, मुलांची आबाळ, भविष्याची अनिश्चितता ह्याने गांजून जात.

अशा वेळी भगिनी निवेदिता बँकेने ह्या पीडित महिलांसाठी भरवशाचा मदतीचा हात पुढे केला. ह्या बायकांनी आपल्या बँकेत आपल्या नावाने स्वतंत्र खाती उघडावीत, त्यांना जमत नसेल तर त्यांच्या स्लिपा आपणच गरजेनुसार भरून द्यावीत. त्यांच्याकडून नियमितपणे थोडेथोडे पैसे ह्या

खात्यांमध्ये भरून घ्यावेत, सतत संवाद साधून त्यांना सावकारी पाशांपासून दूर ठेवावं किंवा सावध करावं, त्यांच्या गरजेनुसार त्यांची पासबुकं ही बँकेतच जपून ठेवावीत, म्हणजेच काहीही करून त्यांचे पैसे वाचवावेत यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली जात असे त्यामुळे त्यांचा बँकेवरचा विश्वास वाढला. त्यातून असा काही भावबंध विकसित झाला की या बँकेशी जोडलं जाणं हिताचं आहे, इथे आपले चार पैसे तरी शिलकीत पडतात, अडीअडचणीला बँक मदत करते, बँकेतल्या कर्मचाऱ्यांशी मोकळेपणाने बोलता येतं, हा विश्वास पसरत गेला. इथे ठेवलेल्या रकमाही वाढतात आणि जिव्हाळ्याची माणसंही मिळतात हा दुहेरी विश्वास बँकेच्या प्रचार-प्रसारातला एक महत्त्वाचा घटक ठरला. त्यापैकी अनेकांचं सोनंनाणं किंवा भांडीकुंडी ही सावकारांनी व्याजापोटी गिळंकृत केली होती. अशा चीजवस्तू हीच आपली दौलत आहे असं मानणारे हे लोक त्यामुळे फारच कष्टी झाले होते. दाढेवहिनींनी अशा अनेकांच्या बाबतीत स्वतः लक्ष घालून, पुढाकार घेऊन ह्या जप्तीतल्या गोष्टी परत मिळवून दिल्या. अशी व्यक्तिगत सेवा किती बँकांनी दिली असती? हा प्रश्नच आहे! पण दाढेवहिनी पगार होण्याच्या दिवशी स्वतः जातीने तिथे हजर राहात. कामगारांच्या हातातले पगार हिसकावून घेणाऱ्या दलालांना सावकारांचे हिशोब मागत. ते तपासून बघत आणि अवास्तव वसुली करणाऱ्यांना जाबही विचारत. फारच अनागोंदी हिशोब केले असले तर बँकेच्या शिपायाला सोबत घेऊन सरळ त्या सावकाराच्या घरी जात. तिथे त्याला समज देत. पोलिसी कारवाईचा धाक दाखवत आणि किरकोळ बाकी उरली असेल तर तेवढे पैसे तिथल्या तिथे भरून त्या कर्जदाराची तारणवस्तू परत घेऊन येत. या बाबतीत अनेक पुरुषांनाही जमू नये असं धाडस त्या दाखवत असत. अशा काही केसेस झाल्यानंतर संबंधित सावकार नरमल्याचं बोललं जाई. या कर्मचाऱ्यांपैकी एक असणाऱ्या इंदुबाई सकट या अगोदर बँकेच्या सभासद तर होत्याच, पण पुढे त्या बँकेच्या संचालिकाही झाल्या.

एक मात्र होतं. अनुभव नसल्याने, पैशाची किंमत फार वाटत असल्याने, सुरुवातीला कर्ज द्यायचं म्हटलं की इथे संचालिका जरा डगमगत. एवढं का? कसं फेडणार? त्यापेक्षा कमीच कर्ज उचला ना! वगैरे भाषा उच्चारत. अशा वेळी दाढे सरांना हे समजावून सांगावं लागे की, कर्जवाटपानेच बँकेचा खरा व्यवसाय होणार आहे. गोळा झालेला पैसा नुसता जिवापाड जपणे म्हणजे बँकिंग नाही. पैसा फिरता राहिला पाहिजे. पैशातून पैसा वाढला पाहिजे. त्यासाठी काही वेळा जबाबदारीने धोकाही पत्करावा लागेल. तो पत्करण्याची तयारी ठेवायला हवी. कर्ज गरजेपेक्षा कमीही देऊ नये. गरजेपेक्षा जास्तही देऊ नये. कर्ज हे नेहमी आवश्यकतेइतकंच द्यावं, वगैरे वगैरे...

ते शिकण्याचे दिवस होते! एकीकडे

स्त्रीसुलभ सावधता, बारकावा जपत व्यावसायिक वृत्ती कशा अंगी बाणवाव्यात ह्याचे धडे दररोज मिळत होते. नवनवे नियम, कायदेकानू शिकावे लागत होते. काही बाबतीत संकोचीपणा सोडावा लागत होता. फटकळपणा न करता स्पष्टवक्तेपणा बाणवावा लागत होता. तरी सर्वांना सारखेपणाने वागवलं जात असल्यामुळे हे ‘प्रौढ शिक्षण’ भगिनी आनंदाने घेत होत्या.

बँक सुरू करताना तिच्या कामाची वेळ महिलांच्या सोयीची असावी हा निकष निश्चितपणे होता. सकाळी बँका उघड्या असतात, तेव्हा गृहिणींना घरकामामुळे तिथवर जाणं कठीण पडतं. म्हणून भगिनी निवेदिता बँकेने कामाची वेळ दुपारी २ ते ६ अशीच सुरुवातीला ठेवली होती. मंगळवारी अर्धवेळ काम व बुधवारी आठवडी सुट्टी असं वेळापत्रक ठेवलं. कामावर येणाऱ्या बायकांना शक्यतो सोयीने घराबाहेर पडता यावं, शनिवारी-रविवारी नवरा-मुलं ही घरी असल्याने तेवढीच घराची व्यवस्था सोपी पडावी असे विचार यामागे होते. त्यामुळे पहिली पाच वर्षं ही नारायण पेठ शाखा ह्याच वेळापत्रकानुसार चालली. पुढे ‘सेन्ट्रलाइज्ड क्लिअरिंग’ ही पद्धत सुरू झाल्यावर सर्व बँकांची कामं एकाच वेळात व्हावीत असा नियम आला. त्यामुळे भगिनी निवेदिता बँकेच्या शाखांमधल्या कामाच्या वेळा सगळ्या ठिकाणी एकसारख्या कराव्या लागल्या. पण चेक क्लिअरिंगचं काम जोवर हाती होत होतं, तोवर नारायण पेठ शाखेची दुपारची वेळ सर्वांनाच प्रिय ठरली. शाखेकडे ओढण्याचं एक आकर्षण ठरली.

अल्पशिक्षित सभासदांना बँकसाक्षर करण्याचा प्रयत्न

बाकी पुष्कळ सोयी सुरुवातीला तिथे नव्हत्या. चहाच्या वेळेला बँकेत चहा मिळत नसे. सेवकांना कामावर आल्यानंतर स्वत:चं सामान ठेवायला जागा नसे. घरून आणलेले डबे खायला जिन्याच्या पायऱ्यांवर बसावं लागे. अशा छोट्या मोठ्या अडचणी होत्या. पण लोकांचा वाढता प्रतिसाद हा मात्र उत्साहवर्धक होता. शिवाय हळूहळू एकेका बाबतीत घडी बसायला लागली. सुरुवातीला जवळच राहणाऱ्या शीलाताई काळे ह्यांच्या घरून चहा यायचा. शेजारच्या वाड्यात अंगणात, पिण्याच्या पाण्याचं पिंप भरून ठेवलं जायचं. पुढे या गोष्टी बँकेतच मिळू लागल्या. वागण्याबोलण्यातला घरगुतीपणा, साधेपणा ह्यामुळे आसपासची माणसंही हळूहळू जोडली जाऊ लागली. कधीकधी खाणं मागवावं लागे. जवळच बेडेकर मिसळवाले होते. ते प्लेटचा हिशोब न करता मोठी भांडी भरभरून मिसळ पाठवायचे. समोर मोडक वाडा होता. त्यातले नाना मोडक अंगणात खुर्ची टाकून बसलेले असत. बँकेत अचानक दिवा लागला, रात्री दरवाजाचा आवाज आला, असं कुठेही कहीही जाणवलं तरी ते लगेच कळवत. जागता पहाराच होता त्यांचा!

भगिनी निवेदिता सहकारी बँकेची पहिली वार्षिक सर्वसाधारण सभा ही राष्ट्रभाषा भवनाच्या वरच्या हॉलमध्ये झाली होती. अंधारा जिना, कोंदट हॉल आणि जमिनीवर दाटीवाटीने बसलेले भागधारक असं एकूण दृश्य होतं. त्यांच्याच आजूबाजूला संचालिकाही बसल्या होत्या. 'वार्षिक सर्वसाधारण सभा काय असते?' असा भाव सभासदांच्या चेहऱ्यावर होता. तर 'सगळ्या प्रश्नांना उत्तरं देता येतील ना?' ह्याचा ताण संचालिकांच्या चेहऱ्यावर उतरला होता. पण अगदी खेळीमेळीत ही पहिली ए.जी.एम. - वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली. दुसऱ्या वर्षीची एजीएम एस.पी. कॉलेजच्या लेडी रमाबाई हॉलमध्ये झाली. तो हॉल धूळमय होता. काही संचालिकांनी स्वत: हातात झाडू धरून तो स्वच्छ करायलाही मदत केली. पहिल्या सभेप्रमाणेच ह्या सभेतही लोकांचं समाधान करता आलं. पण काही विघ्नसंतोषी माणसं मुद्दाम खुसपटं

सहकार संस्कार

सहकारी संस्थांमध्ये संपूर्ण समाजाचे प्रतिबिंब पहायला मिळते. मात्र प्रत्येक व्यक्तीने आपली जबाबदारी आणि आपली कर्तव्ये याचे भान बाळगणे आवश्यक आहे, तरच यशप्राप्ती शक्य होईल.

– प. पू. श्री. गोळवलकर गुरुजी

काढायला, महिलांना कोंडीत पकडायला येत असतात हेही जाणवलं. अशाच मनोवृत्तीचे एक सभासद हे एका किराणा दुकानाचे मालक होते. हे पुरेशी तयारी करून, जणू काही सभा उधळायलाच ए.जी.एम. ला हजर राहत. बँकेचा अहवाल हातात धरून फडफडवत बोलायला उभे राहत. त्यांचा आविर्भाव पाहूनही काही संचालिका अस्वस्थ होत. मग ते इतर सभासदांना भडकवत, त्यांची मनं बँक व्यवहाराबाबत कलुषित करत. दाढेवहिनी 'अध्यक्ष' ह्या नात्याने त्याला यथायोग्य उत्तरं देऊन त्याचं समाधान करायला बघत. त्यांचे स्पष्टीकरण पटल्याने काही सुशिक्षित सभासद त्यांच्या बाजूने बोलत. कारण त्यांना खोडसाळपणा समजलेला असे. तीनचार वर्षे गेल्यावर एका वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये याच सभासदाने बँकेची बाजू घेऊन तिच्या प्रगतीला दाद दिली. तेव्हा आपल्या प्रामाणिक प्रयत्नांना मिळालेली ही दाद आहे अशीच सर्वांची भावना झाली.

अशा प्रकारे 'व्यक्ती तितक्या प्रकृती' समोर येत होत्याच. पण त्यांची मन ओळखणं, त्यांचे शंकानिरसन करणं व त्यांना आपलं म्हणून समजावून सांगणं पुढे सवयीने जमायला लागलं.

बँक झपाट्याने वाढायला लागली. राष्ट्रभाषा सभेत घेतलेली बँकेची जागा अपुरी होती. तसंच अडचणीची होती. वरचा मजला, एक गैरसोयीचा जिना ह्यामुळे ग्राहकांना यायला जायला त्रास पडे. घाईच्या वेळेला जिन्यामध्ये रांगा लागत. त्याच इमारतीत राष्ट्रभाषा हिंदी वर्ग भरत असत. पण पुढे ते बंद झाले होते. ती मोठी जागा आता वापरात नव्हती. पुस्तकं, मोडकी बाकं, धूळ ह्यांचं काहीसं साम्राज्यं होतं तिथे. ही जागा बँकेला भाड्याने मिळणं खूप सोयीचं ठरणार होतं. पण खालच्या पातळीवर त्या बाबत कोणीही सहज सहकार्य करेना. राष्ट्रभाषा सभेचे संचालक श्री. मोहन धारिया हे परिचयातले होते. बँकेचे हितचिंतक होते. म्हणून निवेदिता बँकेच्या काही संचालिका त्यांना जाऊन भेटल्या. बँक ती जागा साफ करून, सोयी करून घेऊ शकेल व संस्थेला रीतसर भाडंही देईल असा प्रस्ताव त्यांनी धारिया साहेबांसमोर मांडला. त्यांनी संमती दिली. ह्यामुळे लवकरच त्या इमारतीचा पहिला मजला बँकेला भाड्याने मिळाला. त्यात ग्राहकांना बसायला जागा करता आली. काउंटर वाढवले. एकूण वापरायला चांगली जागा मिळाली. मग अशाच भेटीगाठींमधून त्याच इमारती मधला वरचा मजलाही मिळवण्यात यश आलं. त्यामध्ये नव्याने फर्निचर करून संचालिकांसाठी चांगल्या खुर्च्या, सुबक टेबलं, शेल्फ आणि इतर सुविधा करण्यात आल्या आणि एक अद्ययावत बोर्डरूम तयार करण्यात आली. एकेका टप्प्याने बँकेचा बाह्य चेहरामोहरा सुधारत गेला. अधिक व्यावसायिक रुप धारण करत गेला.

पहिला बराच काळ ह्या एकाच ठिकाणी

बँकेचं कार्यालय आणि शाखाही होती. जसजसे ग्राहक वाढत गेले तसतसा त्यांचा वावर, गजबज यामुळे मुख्यालयाची जागा अपुरी पडायला लागली. ब्रँच आणि हेड ऑफिस स्वतंत्र असायलाच हवं होतं.

१९८०मध्ये मुख्य कचेरी व नारायण पेठ शाखा कामकाजाच्या सोयीसाठी स्वतंत्र करण्यात आली.

पुढे १९९१मध्ये नारायण पेठ शाखेचे लक्ष्मी रोडवर संचेती चेंबर्स येथे स्थलांतर करण्यात आले. ब्रँच व हेड ऑफिस स्वतंत्रही हवं पण एकमेकांपासून फार दूरही असू नये अशी कल्पना होती. विजय टॉकीजजवळ श्री. मदनभाई संचेती हे मोठी व्यापारी इमारत उभारत होते. ते डॉ. संचेतींचे बंधू. डॉ संचेती हे बँकेचे हितचिंतक. त्यांच्या मध्यस्थीने ह्या नव्या इमारतीतली पहिल्या मजल्यावरची प्रशस्त जागा बँकेने विकत घेतली आणि नारायण पेठ शाखा तिथे सुरू केली. भाड्याच्या जागेतून स्वत:च्या मालकीच्या जागेमध्ये जाण्याचा आनंद अवर्णनीय होता.

बँक सुरू केल्यावर पहिल्या दोनतीन वर्षांतच सहकार क्षेत्रात बँकेचा नावलौकिक पसरू लागला. महिलांच्या उत्तम सहकाराचं उदाहरण म्हणून भगिनी निवेदिता बँकेचा उल्लेख व्हायला लागला. १९७६च्या मार्च महिन्यात बँक व्यवहाराबाबत एक मोठी आंतरराष्ट्रीय परिषद दिल्लीमध्ये भरणार होती. तिच्यासाठी भगिनी निवेदिता बँकेच्या एका प्रतिनिधीला आमंत्रण आलेलं होतं. त्या काळात दिल्ली ही खरोखरच 'दूर' वाटायची. त्यात आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी येणार. संपूर्ण परिषदेत इंग्रजी भाषेत बोलणी होणार, मान्यवर लोक जमणार, तिथे आपण जाऊन काय करू शकू? ही चिंता इथल्या भगिनींना पडली होती. पण दाढे साहेबांनी त्यांना प्रेरित केलं. अशा संधी सोडायच्या नसतात. मोठ्या लोकांमध्ये वावरून नुसती श्रवणभक्ती केली तरी नवशिक्या लोकांचा फायदाच होतो. ह्या बाबत ते ठाम होते. बँकेने एका प्रतिनिधीचा जाणे-येणे-वास्तव्य वगैरेंचा खर्च करण्याची तयारी दाखवली. तसंच दाढेवहिनींखेरीज अन्य कोणीही दिल्लीला जावं असंही सुचवलं.

त्यानुसार शीलाताई काळे, प्रमिलाताई गरुड, सुमित्राताई गोवईकर आणि मीराताई देशपांडे यांनी दिल्ली गाठली. दिल्लीतल्या पूना गेस्ट हाउसच्या स्वस्तातल्या खोल्यांमध्ये राहून NCUI म्हणजे नॅशनल को-ऑपरेटिव्ह युनियन ऑफ इंडियाच्या भव्य वास्तूत भरलेली ती संपूर्ण परिषद अनुभवली. 'ऑब्झर्व्हर' म्हणून परिषदेत सर्वांनी प्रवेश मिळवला. भारतभरातून आलेल्या प्रतिनिधींना आपल्याकडली प्रचारपत्रकं वाटली. त्या वेळचे पंतप्रधान मोरारजीभाई देसाई, बाबू जगजीवन राम, रिझर्व्ह बँकेचे तेव्हाचे अधिकारी, अन्य मंत्री ह्यांना निदान बघता तरी आलं. ह्या अनुभवापुढे ह्या सहकारी बँकिंग क्षेत्राचा आवाका समजला. त्यात लोक काय करताहेत. आपण तूर्त कुठंवर आलोय हे जाणवलं. आपण नव्या ओळखी

करून घेऊ शकतो, ह्याचा आत्मविश्वास आला. पुढे सालोसाल अशा सभा-परिषदा यांना हजर राहणं अगदीच अंगवळणी पडलं. १९८८ साली तेंव्हाच्या संचालिका सुमित्राताई गोवईकर यांनी कॅनडातल्या एका औद्योगिक परिषदेमध्ये भगिनी निवेदिता बँकेच्या कार्यपद्धतीबाबत एक 'शोधनिबंध' सादर केला होता.

बँक सुरू केल्यावर पहिल्या तीनचार वर्षांमध्येच एका कर्जवाटपात काहीशी चूक झाली. एका कर्जदाराने शिताफीने अपुऱ्या कागदपत्रांवर कर्ज मिळवलं. सहकार खात्याकडून लगेचच 'कारणे द्या' नोटीस बँकेच्या अध्यक्षांच्या म्हणजे दाढेवहिनींच्या नावाने आली असली तरी सगळ्या संचालिका घाबऱ्याघुबऱ्या झाल्या. डी.डी.आर.कडून नोटीस येणे ही साधी घटना नव्हती. पण दाढे साहेबांनी धीर दिला. त्यांनी ह्या भगिनींना फक्त फोर्टमधल्या एका नामवंत वकीलांचा संपर्क मिळवून दिला. ते सहकार क्षेत्रांच्या कामात वाकबगार होते. त्यांच्याकडे प्रत्यक्ष जाणं, सल्ला घेणं, तो अमलात आणणं ह्या सर्व गोष्टी संचालिकांनीच कराव्यात असा आग्रह दाढे साहेबांनी धरला. हे सगळं प्रकरण संपेपर्यंत भगिनींना पुष्कळच त्रास पडला खरा. पण बँकिंगमधले काही महत्त्वाचे धडेही मिळाले. महानगरात जाऊन, तज्ज्ञांशी चर्चा करून, स्वत:च्या चुकांचं, स्वत:च निराकरण करण्याचा अनुभव मिळाला तो वेगळाच!

अशा कसोटीच्या, आव्हानाच्या सर्व प्रसंगांना दाढे साहेबांनी सदैव 'पुढे चला, तुम्हीही हे करू शकता.' अशा अर्थाचा हिरवा कंदीलच दाखवला. कधीही, कोणीही, कोणाचाही पाय मागे घेण्याचं धोरण ठेवलं नाही. एकेका अनुभवाने आपणही शिकतोय, पुढे जातोय असं संचालिकांना वाटत राहिलं. बाहेर समाजात शंका-आक्षेप घेणारे, आत्मविश्वासाचं खच्चीकरण करणारे कोणीकोणी लोक भेटत असले तरी दाढे दांपत्याची मोलाची पाठराखण बँकेला स्थिरावायला खूपच उपयोगी पडली.

अशा प्रकारे १९७४पासून १९७९पर्यंत म्हणजे पहिली पाच वर्षे बँकेचा सगळा व्यवहार नारायण पेठेतूनच होत गेला. पण हळूहळू ''आमच्या भागात शाखा सुरू

सहकार संस्कार

समान आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी समान गरजा असणाऱ्या व्यक्तींनी ऐच्छिकरीत्या स्थापलेली संघटना म्हणजे सहकार!

– स्व. वैकुंठभाई मेहता

करा, बँक घरापासून फार लांब आहे. जवळच सुरू झाली तर बरं पडेल,'' असा लोकांचा प्रेमाचा आग्रह सुरू झाला. तेव्हा सहकारनगरमध्ये शाखा काढायचं ठरलं. आपल्याला बँक चालवता येते. यशस्वीपणे आगेकूच होतेय, ह्याचा आत्मविश्वास एकीकडे होता. तर दुसरीकडे, पानशेतच्या पुरानंतर सदाशिव पेठेतले अनेक लोक सहकारनगर भागाकडे स्थलांतरित झालेले दिसत होते. तिथे वस्त्या वाढत होत्या. छोटेमोठे उद्योग आकार घेत होते. तिथे ३ मार्च १९७९ रोजी एका छोट्याशा दुकानाच्या जागेत बँकेची शाखा सुरू केली. १० × १० आकाराचे दोन गाळे माफक भाड्यात मिळाले होते. जम बसला तर पुढे मोठ्या आणि स्वत:च्या मालकीच्या जागेत स्थिरावण्याचं स्वप्नही होतंच.

ग्राहकांच्या सोयीसाठी ही सहकारनगर शाखा दिवसातून दोन वेळा ठेवण्याचा प्रयोग केला गेला. रोज सकाळी ११ ते १ आणि संध्याकाळी ४ ते ६ ह्या वेळात बँक ग्राहकांसाठी सेवा देई. त्यामुळे ग्राहक फार खूश होते. ग्राहकांना काय? चोवीस तासही कोणी बँकसेवा दिली तरी ते लाभ घेतीलच. पण कर्मचारी महिलांना दिवसातून दोन वेळा घराबाहेर पडणं तितकंसं सोयीचं वाटत नसे. ज्यांची घरं ह्या शाखेपासून खूप लांब होती. अशा काही महिला तर दुपारी १ ते ४ ह्या (बँक ग्राहकांसाठी बंद असण्याच्या) काळात स्वत: तिथेच थांबून राहात. दोनदोनदा ही जा-ये करण्यापेक्षा तिथे थांबून राहाणं काहींना सोयीचं वाटे.

लवकरच लहान जागेतली ही शाखा मोठा व्यवसाय करू लागली. बँकेत लॉकर्स असावेत अशी मागणी लोक करू लागले. पण लॉकर उघडणासाठी काही पायाभूत

सहकारनगर शाखा उद्घाटन

सोयी असाव्या लागतात. भाड्याने घेतलेल्या जागेचं बांधकाम काही ह्या सोयींचा विचार करून झालेलं नसतं. त्या दृष्टीने शोधाशोध सुरू झाली १९७९मध्ये सहकारनगरमधल्या तपोधन सोसायटीमध्ये भाड्याची मोठी जागा मिळाली. तीच नंतर ओनरशिपमध्ये बदलली गेली. त्या वेळी लॉकर्ससाठी जरूर त्या गोष्टींचा अंतर्भाव केला. ह्या शाखेच्या स्थापनेपासून पुढच्या सगळ्या विकासापर्यंत संचालिका सरला रेगे यांचं या शाखेवर बारीक लक्ष असे. त्या सहकारनगर भागातच राहत होत्या, इथे त्यांचा जनसंपर्क मोठा होता. त्यांच्याकडे फिलिप्समधल्या नोकरीचा अनुभव होता. तशीच त्यांना माणसाची फार चांगली पारख होती. नव्या जागी नव्या संचासह बँकेची शाखा चालवताना ह्या गुणांचा मोठा फायदा झाला. बँकेने आपल्या भागधारकांसाठी याच १९७८-७९ या वर्षात पहिला ९ टक्के लाभांश जाहीर केला. त्यामुळे लोक खूश झाले, बँक चांगल्या प्रकारे चालत असल्याची एक प्रकारची ग्वाही दिली गेली.

यानंतर १९८० मध्ये सुरू झालेल्या तळेगाव शाखेची गोष्ट तर अजूनच वेगळी होती. पुणं वाढत होतं. पिंपरी-निगडी-तळेगाव एम.आय.डी.सी. अशा ठिकाणी उद्योगधंदे बहरत होते. कॅडबरी इंडिया, इगल फ्लास्क, नॅशनल हेवी इंजिनिअरिंग वगैरे मोठे उद्योग पूर्वीपासूनच तिथे होते. दुसऱ्या बाजूने थंड हवेचं ठिकाणं, चांगलं सांस्कृतिक केंद्र पुणं आणि मुंबई ह्या दोन्ही महानगरांपासून जाण्यायेण्याची सुलभता, ऐतिहासिक परंपरा, ह्या गोष्टींमुळे तळेगावकडे लोकांचा ओढा होता. त्यामुळे तिथे बँकेची शाखा सुरू केली तर पुरेसा व्यवसाय मिळणं शक्य होतं. भगिनी निवेदिता बँकेच्या

सुरुवातीच्या काळात कामकाजावर दाढे वहिनींचं व्यक्तिगत लक्ष असे

तेव्हाच्या संचालिका अरुंधती महाजन ह्यांचा तळेगावजवळ कॉम्युगेटेड बॉक्सेस बनवण्याचा व्यवसाय होता. त्यांचा जनसंपर्कही लक्षणीय होता. ह्या सर्वांतून तळेगावला बँकेची शाखा निघण्याची शक्यता खुणावू लागली होती. बँकेच्या संचालिका ह्याच्या शक्यता चाचपून पाहायला, सर्व्हे करायला तळेगावला चकरा टाकू लागल्या.

पुण्याहून लोकलने जाणं, तिच्यात चढण्याउतरण्याची धक्काबुक्की सोसणं, घोरावाडी स्टेशनला उतरून पायी चालत आसपासचा परिसर बघणं, ही धकाधक सुरू झाली आणि लवकरच शाखा सुरू करण्याचा निर्णय झाला. सुरूवातीला तळेगावमध्ये एका अगदी छोट्या, भाड्याच्या जागेत शाखा निघाली. ही बँकेची तिसरी शाखा ५ मार्च १९८० रोजी सुरू झाली. त्या काळात तिथे जवळपास खाद्यपेय मिळण्याची फारशी सोय नव्हती. काही कर्मचारी तळेगावमधले घेता आले असले तरी पुण्याहून रोजच्या कामासाठी किंवा दैनंदिन देखरेखीसाठी काहींना जावंच लागे. बँकेची कामाची वेळही पुणे तळेगाव लोकलच्या वेळेशी जुळवून घेण्याच्या दृष्टीने ग्राहकांसाठी ९.३० ते १.३० ही वेळ ठरवली गेली. पुण्यातल्या लोकांना सकाळी ८ वाजून ५ मिनिटांची लोकल पकडून जाणं शक्य होई. सुरुवातीला ह्या बँकेत खाते उघडायला येणारे इच्छुक लोक बरेचसे निम्न वर्गातले, अशिक्षित, कामगार वर्गातले असत. त्यांना समजेल अशा भाषेत बँक व्यवहार सांगणं हे ही आव्हान ठरे. कारण त्यातल्या अनेकांना बँक व्यवहाराची तोंडओळखही नसे. एकूण त्या भागात बँकांच फारशा नव्हत्या. जम बसवण्याची आणि कामकाज वाढवण्याची उत्तम संधी असलेली अशी ही शाखा होती.

साहजिकच, भगिनी निवेदिता बँकेच्या कर्मचाऱ्यांनी, संचालकांनी या संधीचं चीज केलं. आसपासच्या शाळांची, कंपन्यांची पगाराची खाती बँकेकडे वळवून घेतली. ग्राहकांना घरगुती जिव्हाळ्याची सेवा देऊन आपलंसं करून घेतलं. फोन-फॅक्स ह्या त्या काळातल्या सुविधा वापरून सतत पुण्याशी संपर्क सुरू ठेवला. लहान प्रमाणात बँक आहे, म्हणून तिथे अमुक एक सेवा मिळणार नाही, असं कोणालाही कधीही वाटू दिलं नाही.

दाढे साहेबांचे अनेक मित्र-स्नेही तळेगावमध्ये राहत असत. त्यांनीही आपापल्या परिवाराला ह्या तळेगाव शाखेत खाती उघडायला उद्युक्त केलं. ही खासगी खाती आणि पगार खाती ह्यामुळे बँक लवकरच भरभराटीला आली. पगारखाती स्वीकारली की काम वाढतं. किचकट हिशोब तपासणीची कामं वाढतात. पण निश्चित कायमस्वरूपी व्यवसाय मिळत राहतो, हा धडा तळेगाव शाखेने दिला.

तळेगाव शाखेने अनेक छोट्या महिला व्यावसायिकांना कर्जे दिली. मसाले, लोणची, पापड बनवणाऱ्या, बेकरी माल बनवणाऱ्या लहान मुलांचे, कपडे-स्वेटर तयार करणाऱ्या अशा ह्या महिला काही दिवसांनंतर बँकेच्या

जवळ जमून आपापला माल विकू लागल्या. बँकेत येणारे ग्राहक त्यांची दखल घेऊ लागले. अशा प्रकारे, न कळतपणे आणि बँकेच्या कामाखेरीजचं, हे महिला उद्योगाला प्रोत्साहन देण्याचं कार्यही या परिसरात होऊ लागलं.

कष्टकरी किंवा सुशिक्षित मध्यम वर्गीय मराठी समाज जिथे जास्त असेल तिथे आतापर्यंतचा सगळा बँक विस्तार झाला होता. त्या मानाने मंगळवार पेठेतलं, वातावरण वेगळं होतं. कनिष्ठ मध्यम वर्गीय लोक किंवा अमराठी लोक तिथे पुष्कळ होते. एकूण लोकांची वस्ती खूप होती. त्या लोकांच्या गरजा ओळखून सेवा देणं शक्य होतं. म्हणून १७ मार्च १९८० रोजी तिथे एका छोट्या भाड्याच्या जागेत शाखा सुरू केली. पण ती जेमतेम ३०० चौ. फुटांची जागा लवकरच अपुरी पडायला लागली. नंतर थोडी मोठी भाड्याची जागा आणि आता भलीमोठी स्वत:च्या मालकीची जागा घेण्यापर्यंत बँकेची मजल गेली. अपोलो टॉकीजजवळच्या ह्या शाखेत सदैव गजबज असते. बँकेतल्या स्टाफसाठी ट्रेनिंग प्रोग्रॅम्स इथेच घेतले जातात. इथेच आता बँकेचा स्टेशनरी विभाग कार्यरत झालेला आहे.

आता चार शाखा सुरू करण्याचा अनुभव गाठीशी होता. शाखा कुठे, कधी सुरू करावी? शाखेसाठी जागा कुठे निवडावी? गुंतवणूक किती करावी? वगैरेंचा अंदाज आलेला होता. सुरुवात नेहमी भाड्याच्या जागेपासून करायची आणि जम बसल्यावर स्वत:च्या मालकीच्या जागेची भरारी घ्यायची हेही धोरण म्हणून ठरलं. प्रत्येक येणारा दिवस व्यवसाय वाढवू लागला. शाखा निघाल्या.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे एखादी शाखा घाईने सुरू केली, तिच्या जागेची, इमारतीची

भांडारकर रोड शाखेचा शुभारंभ

निवड चुकली, ह्यामुळे पुढे पश्चात्तापाची वेळ आली, असा एकही अनुभव बँकेला आलेला नाही. एखाद्या लाटेवर आरूढ होऊन घाईघाईने निर्णय घेणं आणि माघार घेणं असा प्रकार भगिनी निवेदिता बँकेच्या इतिहासात नाही.

मंगळवार पेठ शाखेनंतर ५वी शाखा सुरू झाली ती पुण्याच्या भांडारकर रोडवर. १४ ऑक्टोबर १९८० रोजी भांडारकर रोडच्या एका गल्लीत मराठे क्लासेसच्या इमारतीत ही शाखा सुरू करताना आसपासच्या उच्चभ्रू वस्तीचा काहीसा दबाव संस्थेवर होता. अनेक वर्षे तिथे गणिताचे क्लासेस घेणारे प्रा. मराठे हे अनेकींच्या परिचयातले होते. तिथली जागा फार मोठी नव्हती पण ही शाखा सुरू केली तेव्हा तिथे आसपास फारशा बँका नव्हत्या. पहिल्या दिवसापासूनच इथे दिमाखदार फर्निचर, देखणी मांडणी असा थाट केला होता. त्यामुळे बँकेकडे येणारे बाहेरचे पाहुणे असोत किंवा संचालक मंडळाच्या सभा असोत, असे सगळे उपक्रम ह्या शाखेतच होत असत. इथे लॉकर्सही होते. आसपासच्या उच्चभ्रू वर्गातील महिला लग्नकार्याला जाताना इथे येऊन, लॉकरमधले दागिने काढून इथेच ते परिधान करून बाहेर पडत. अगदी सुरुवातीपासून ह्या शाखेत जवळपासच्या प्रमोटर्स-बिल्डर्सची, व्यापाऱ्यांची, खानदानी धनिकांची अशी 'मोठी अकाउंट्स' येत गेली. त्यामुळे शाखा लहान असली तरी, उलाढाली मोठ्या झाल्या. वरच्या स्तरावर आर्थिक व्यवहार कसे होतात हे इथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना शिकता आलं. पण पुढे वाढत्या व्यापाला ही जागा अपुरी पडायला लागली. १९८० ते २००१ एवढा काळ मराठे क्लासेसच्या भाड्याच्या जागेत मांडलेला शाखेचा प्रपंच नंतर मात्र जवळच्याच हेरेकर पार्कमध्ये स्वत:च्या मालकीच्या जागेत हलवावा लागला. मराठे क्लासेसची जागा थोडी आडजागी होती. हेरेकर पार्क तर अगदी वाहत्या रस्त्यावरच होते. त्यामुळे बँकेने ती जागा विकत घेतली. बँकेचा संपूर्ण वसुली विभाग इथे हलवला. ही शाखा आजही भगिनी निवेदिता बँकेची दिमाखदार शाखा म्हणून ओळखली जाते.

१९८१ साली भगिनी निवेदिता बँकेमध्ये 'बँक कर्मचारी संघ' म्हणजेच लेबर युनियनचा प्रवेश झाला. तो काळ एकूणच अशा युनियन्सना बिचकण्याचा होता. आपलं महत्त्व वाढवण्यासाठी युनियन कामगारांना बहकवतात, संप-हरताळ घडवून आणतात, असा समज होता. त्यामुळे इथे युनियनचा शिरकाव झाल्यावर काही अप्रिय घडामोडी होतील की काय? अशी शंका व्यक्त होत होती. पण तसं काहीही झालं नाही. बँकेला कर्मचारी संघाशी जोडलं जाण्याने उलट काही व्यवहारांमध्ये सुसूत्रताच आली.

पूर्वी बँकेमध्ये सरसकट पगारवाढ होत असे. इथे कामगार संघटना आल्यावर पगारवाढ ही श्रेणीनुसार म्हणजे ग्रेडवाइज होऊ लागली. पगाराची रचना बेसिक अधिक महागाई भत्ता अशा प्रकारे होऊ लागली. टेम्पररी स्टाफ, नंतर प्रोबेशनवरचे लोक, कनिष्ठ लिपिक, त्यानंतर (चाचणी परीक्षा पास करू शकणारे) वरिष्ठ लिपिक ऑफिसर, ब्रँच मॅनेजर, असिस्टंट जनरल मॅनेजर, जनरल मॅनेजर, मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) ह्या निश्चित श्रेणीही ठरल्या. पूर्वीच्या कर्मचारी महिला हीच कामं करत असत. वरची अधिकारी गैरहजर असेल तर खालच्या पदावरच्या अनुभवी महिला त्यांच्या जबाबदाऱ्या समर्थपणे उचलत असत. श्रेणी मिळण्यासाठी कामं थांबणं हा प्रकार कधीच होत नव्हता. पण युनियन आल्यावर ह्यातच जास्त नेमकेपणा आला. कर्मचाऱ्यांची नेमणूक, बदली, बढती करणं हे जास्त नियमबद्ध झालं. सगळ्याच व्यवहारांना जास्त व्यावसायिक रूप आलं जी आधुनिक काळाची आणि वाढत्या कार्यक्षेत्राची गरजच होती. अनेक घरगुती किंवा कौटुंबिक वळणाचे उद्योगव्यवसाय हळूहळू अनौपचारिकतेकडून औपचारिक स्वरूपामध्ये परावर्तित होत होतेच. त्यात बँकेचे तर दिवसेंदिवस मोठ्या उद्योगधंद्यांशी व्यवहार घडू लागले. त्यामुळे अशी व्यवस्थापकीय घडी बसवणं गरजेचंच होतं. युनियन आल्यानंतर कर्मचाऱ्यांमध्ये फूट न पाडता व्यवस्थापनालाच चौकट लाभते आहे, हे जाणवल्यामुळे भगिनी निवेदिता सहकारी बँकेने तिचं स्वागत केलं. जरूर तेव्हा एखाद्या करारावर स्वाक्षऱ्या करण्यासाठी किंवा त्यातल्या अटी समजून घेण्यापुरताच आता इथल्या महिलांचा

ज्येष्ठ समाजवादी नेते एस. एम. जोशी यांची बँकेला भेट

युनियनशी संबंध येतो. एरवी सर्व व्यवहार अत्यंत खेळीमेळीने पार पडतो.

वेळोवेळी अनेक ज्येष्ठ, नामवंत लोक बँकेला भेट देत. डॉ. बानूबाई कोयाजी, पंचांगकर्ते दाते, उद्योगपती श्री. गोगटे, सकाळचे संपादक श्री. मुणगेकर, चीफ जस्टिस श्री. चंद्रचूड, ज्येष्ठ समाजवादी नेते एस.एम.जोशी, विजयाराजे शिंदे, मोहन धारिया, रिझर्व्ह बँकेचे वेगवेगळे पदाधिकारी अशी मंडळी येत, तेव्हा मुद्दाम त्यांच्याशी वार्तालाप ठेवला जाई. त्यांचा अनुभव आणि ज्ञान बँकेतल्या सर्व कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचेल असा प्रयत्न केला जाई. ती मंडळीही बँकेच्या प्रगतीला मनोमन दाद देत.

बँकेच्या शाखा निघू लागल्या तसतशी बँकेत सेवा देणाऱ्यांची संख्या वाढली. पूर्वी जोवर सर्व व्यवहार 'हाती' होत तोवर बँकेला जास्त स्टाफ लागतही असे. त्यामुळे कर्मचारी निवड हाही एक कळीचा मुद्दा ठरला. १९८३पासून बँकेत नोकरीसाठी परीक्षा घेणं सुरू झालं. नोकरीवर रुजू झाल्यावर त्यांना प्रशिक्षण दिलं जायचं. पण बँक जसजशी प्रगतिपथावर जाऊ लागली तसतशी ह्या सगळ्याला अधिक संघटित रूप देण्याची गरज निर्माण झाली. प्रवेशपरीक्षा, श्रेणी, पात्रतेनुसार पदोन्नती, पदानुसार वेतन वगैरे औपचारिकता आणणं ही गरज बनली.

ह्यातून सुरुवातीला संचालिकाच प्रवेशपरीक्षेचे पेपर काढत असत. कुठल्यातरी शाळेत, सुट्टीच्या दिवशी ह्या परीक्षा घेण्याचं जाहीर केलं जाई. ४-५ जागांसाठी ३००,

मा. मृणाल गोरे यांची बँकेस भेट

४०० मुली परीक्षा देत. परीक्षा पास करणाऱ्या मुलींची तोंडी परीक्षा घेतली जाई. ह्या परीक्षांना अनेकदा लेकुरवाळ्या तरुण महिला येत. त्यांचे आईवडील व्हरांड्यात त्यांची मुलं सांभाळत बसत. पण तशा मर्यादा पडत असल्या तरी, भगिनी निवेदिता बँकेत नोकरी करणं सुरक्षित असेल, नियमाला धरून असेल असा विश्वास लोकांमध्ये होता. बँकेच्या उज्ज्वल प्रतिमेचं हेही एक प्रतीकच होतं. संचालिकांचा मात्र ह्या प्रक्रियेमध्ये बराच वेळ जाई.

भांडारकर रोड शाखेनंतर बँकेने ६वी शाखा सुरू केली ती निगडी-आकुर्डी शाखा. हा सगळा उभरता औद्योगिक विभाग होता. इथे तळेगाव शाखेतले काही अनुभव उपयोगी पडणार होते. म्हणून १ सप्टेंबर १९८३ रोजी निगडीमध्ये छोट्या भाड्याच्या जागेत शाखा सुरू केली टेल्को, बजाज, सॅण्डविक ह्यासारख्या कंपन्या जवळपास होत्या. चटकन जम बसला. धंदा वाढल्याने लवकरच ही भाड्याची जागा अपुरी पडायला लागली. त्या काळात शैक्षणिक संस्थासाठी, त्यांच्या परिसरात, एक्स्टेन्शन काउन्टर्स उघडण्याची बँकांना परवानगी असायची. त्या दृष्टीने शोध सुरू करता प्राधिकरणामधल्या डेक्कन इन्स्टिट्युट ऑफ कॉमर्सच्या आवारात ओनरशिपवर मोठी जागा मिळून गेली. मात्र अशा एक्सटेन्शन काउंटर्सवरून फक्त पैसे ठेवणं-काढणं अशी कामं करता येत. कर्जाचे व्यवहार तिथून करायला परवानगी नसे. अशा चौकटीत काम करता करता काही

निगडी–आकुर्डी शाखा शुभारंभ

वर्षं गेली आणि २००४-२००५ ह्या आर्थिक वर्षात निगडी शाखा ह्या एक्स्टेन्शन शाखेमध्ये विसर्जित झाली. आज निगडी-आकुर्डी शाखा ही बँकेची मोठी शाखा बनली आहे.

१९८४ पर्यंत दाढेवहिनींच्या अध्यक्षीय कारकिर्दीची ७ वर्षे संपत आली, तेव्हा नियमानुसार दुसऱ्या कोणालातरी अध्यक्षपद देण्याची वेळ आली. दाढेवहिनींबद्दल सर्वांनाच पुरेसा प्रेम आणि आदर होता. त्यांच्या अध्यक्षीय कारकीर्दीबाबत कोणाचीही काहीही तक्रार नव्हती. त्याचबरोबर सर्व संचालिकांना आळीपाळीने या पदाचा अनुभव व मान मिळायला हवा असंही जाणवत होतं. त्यामुळे सौ. मीरा देशपांडे यांना अध्यक्ष केलं गेलं. प्रत्येक वेळेस उपाध्यक्षांना अध्यक्षपद देण्याचा प्रघात पडला. दाढेवहिनी पुन्हा कधीही बँकेच्या अध्यक्ष झाल्या नाहीत.

निगडी-आकुर्डी शाखा उत्तम प्रकारे नावारूपाला आल्यावर अधिक विस्ताराचे वेध लागले होतेच. तोवर पुण्यात वाढू लागलेल्या सांगवी भागामध्ये फारशा बँका निघालेल्या नाहीत, एकच राष्ट्रीयीकृत बँक आहे ही माहिती मिळाली होती. म्हणून तिथे जागेचा शोध सुरू झाला. अखेरीस भाड्याने मिळालेल्या अवघ्या एका गाळ्यात १४ फेब्रुवारी १९८८ रोजी बँकेची सांगवी शाखा निघाली. तिथली ही पहिली सहकारी बँक ठरली आणि सहकारी तत्त्व आणि घरगुती जिव्हाळा ह्या दोन्हीची हमी वाटल्यामुळे शाखेला उद्घाटनाच्या दिवशीच प्रचंड प्रतिसाद मिळाला. इतका की साधारणपणे पहिल्या दिवशी गरज पडेल एवढी स्टेशनरी सोबत नेली असली तरी दुपारीच ती संपुष्टात आली. पुण्यातल्या ऑफिसमधून, धावतपळत जाऊन, नव्याने स्टेशनरी आणावी लागली. त्या काळात नव्याने पुण्यात येणारी अनेक

हिंगणे-वारजे शाखा सुरुवातीपासूनच गजबजलेली असे

माणसं सांगवी भागामध्ये स्थिरावत होती. त्या सर्वांनी बँकेला आपलंसं केलं. एकूण वाढता व्याप बघता व्यवस्थापनानेही जवळपास ओनरशिपची मोठी जागा बघायला लवकरच सुरुवात केली. १९९१ साली आनंद अपार्टमेंटमध्ये मालकीची मोठी जागा घेऊन तिच्यात काम सुरू केलं. आजही ही शाखा सतत प्रगतिपथावरच आहे.

ह्याच १९८८च्या वर्षात कर्वेनगर भागाकडे कूच केली. तो भाग फार झपाट्याने विकसित होत होता. शिक्षणसंस्था, नवीन गृहनिर्माण योजना, विद्यार्थिवर्ग यांतून मोठा व्यवसाय मिळण्याच्या शक्यता दिसत होत्या. यामुळेच २९ मे १९८८ रोजी कर्वेनगरमध्ये तांबोळी यांच्या बंगल्यातील तळमजल्यात भाड्याचे तीन गाळे घेऊन शाखा सुरू केली. पुढे २००१ मध्ये तिचं कुमार साकेत या गृहनिर्माण योजनेतल्या स्वत:च्या मालकीच्या जागेत स्थलांतर झालं. इथे ग्राहकांची कधीच कमतरता भासली नाही. उलट प्रगतीचा आलेख चढताच राहिला. इथेच पहिल्यांदा बँकेचं डेटा सेंटर उघडलं.

कर्वेनगरमधून हिंगणे-वारजे भागाकडे मोहरा वळणं तसं अपरिहार्यच होतं. महिलांच्या शिक्षणाची धुरा समर्थपणे सांभाळणाऱ्या हिंगण्यात ह्या 'महिलां'च्या बँकेने योगदान द्यावं हे रास्त होतं. हिंगणे येथील मुलींच्या इंजिनिअरिंग कॉलेजला कर्ज देऊन बँकेने स्त्रीशिक्षणालाही मोठा हातभार लावला. १९९६मध्ये महर्षी कर्वे हिंगणे स्त्री-शिक्षण संस्थेच्या आवारात एका छोट्या खोलीत एक्स्टेन्शन काउंटर उघडायला परवानगी मिळाली. तिथे पहिल्यांदा प्रायोगिक तत्त्वावर 'टेलर सिस्टिम' सुरू केली. म्हणजेच पैशांची मागणी करताक्षणी ताबडतोब, तिथल्या तिथे पैसे हाती पडू लागले. इथवर ही स्लिप तीनचार कर्मचाऱ्यांची हाती पडून यथायोग्य

तंत्रसज्ज महिला कर्मचारी पुरुषांनाही मार्गदर्शन करताना

नोंदी करवून मगच रोख रक्कम मिळत असे. याला वेळ लागे.

हातात टोकन नंबरचा बिल्ला धरून आपल्या क्रमांकाचा पुकारा होण्याची वाट बघावी लागे. आता अशी प्रतीक्षा करणं संपलं. ''इथे ताबडतोब पैसे मिळतात.'' या गोष्टीने अनेक ग्राहक सुखावले. पुढे ९ मे १९९७ रोजी संस्थेच्या आवारातच पण मालकीची मोठी जागा खरेदी करणं शक्य झालं. संस्थेची वेगवेगळी एकाच परिसरात अनेक महाविद्यालये चालतात. त्यांचे शिक्षण शुल्क वेगवेगळ्या महाविद्यालयांच्या नावाने जमा होत. त्यांची नीट वर्गवारी करताना, वाटणी करताना काही वेळा तारांबळ उडे. या बाबतीत, कम्प्यूटरची मदत घेऊन, आलेल्या प्रत्येक रकमेची शाळा, महाविद्यालय निहाय नोंद होण्याची व्यवस्था बँकेने करून घेतली. त्यामुळे महर्षी कर्वे हिंगणे स्त्री-शिक्षण संस्थेचं काम फार सोपं झालं. तसंच बँकेच्या सेवा देताना कम्प्यूटरचा वापर करण्याच्या वेगवेगळ्या शक्यताही लक्षात आल्या. प्रयोगशीलता वाढली.

भगिनी निवेदिता बँकेच्या कर्वेनगर आणि हिंगणे-वारजे या दोन्ही शाखांनी अनेक कंपन्यांच्या स्टाफला नेहमीच मदतीचा हात दिलेला आहे. त्यांची 'सॅलरी अकाउंट्स' इथे उघडल्याने पगाराच्या दिवशी कंपन्यांमधून अनेक कामगार, कर्मचारी इथे येतात. पगार तर इथून घेतातच, पण त्याखेरीज गृहकर्ज, उच्च शिक्षण कर्ज, मुदत ठेवी, अशा अनेक संदर्भांमध्ये बँक ह्या कर्मचाऱ्यांना सहकार्य करते. नियोजनबद्ध अर्थकारण कसं करावं? याचे सल्ले देते. आर.बी.आय.च्या चौकटीत राहून शक्य तेवढ्या सेवा-सुविधा देते. पगाराच्या दिवशी केवळ अशा कामगारांसाठी एक वेगळा काउंटर उघडते. कारण अनेक कामगार लंच टाइम म्हणजे जेवणाच्या अर्ध्या तासाच्या सुट्टीत बँकेत येत असतात. तेवढ्या

बँकिंग व्यतिरिक्त असेही उपक्रम राबविले जातात

मोजक्या वेळात जास्तीतजास्त लोकांना पगाराचे हिशोब व पैसे द्यावे लागतात. अन्य सेवाही दिल्या जातात. यातूनच अनेक कामगारांचे पुढे स्वत:चे फ्लॅट्स तयार झाले. अनेकांची मुलं उच्च शिक्षण घेऊ शकली. एका टप्प्यावर एका कंपनीत मोठा संप झाल्याने तेवढा काळ कंपनीचे गेट बंद ठेवण्याची वेळ आली. पण तिथल्या कामगारांवर अगदीच हलाखीची परिस्थिती ओढवली नाही. बँकेच्या सहकार्यामुळे तो अवघड काळही कामगार निभवू शकले. याबद्दल अनेक कामगारांच्या मनात भगिनी निवेदिता बँकेबद्दल कृतज्ञता आहे. कंपन्यांमधले शेकडो कामगार बँकेचे भागधारक आहेत. यावरून बँकेवरचं प्रेम आणि विश्वासच दिसून येतो.

भगिनी निवेदिता सहकारी बँक सुरू होण्याच्या फार पूर्वीपासून पुण्यामध्ये सहकार क्षेत्राबाबत मोठं काम करणारी राष्ट्रीय संस्था होती. 'वैकुंठ मेहता इन्स्टिट्युट' ही VAMNICOM नावाने ओळखली जाते. हिच्यात सहकार क्षेत्रातले नवनवे प्रयोग, बदल, नवी आव्हानं, समस्या यांबाबत सतत अभ्यास होत असतात. देशातले या क्षेत्रातले सर्व महत्त्वाचे टप्पे इथे नोंदवले जातात. साहजिकपणे भगिनी निवेदिता बँकेची पुण्यातली एकूण घडामोड तिथे नोंदवली जाऊ लागली. तिथली परिपत्रकं बँकेत येऊ लागली. तिथल्या सभा, संमेलनं, व्याख्यानं, प्रदर्शनं ह्यांना आपल्याकडल्या महिलांनी भेटी द्याव्यात असा आग्रह दाढे साहेब धरू लागले.

हळूहळू भगिनी निवेदिता बँकेच्या संचालकांची काही कर्मचाऱ्यांची वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ को-ऑपरेटिव्ह मॅनेजमेंट ह्या संस्थेतली ये-जा वाढू लागली. तिथे सहकारी क्षेत्राबद्दल, त्यातल्या कामकाजाबद्दल अनेक चर्चासत्रं, परिसंवाद वगैरे होत असत. त्यांच्यासाठी भगिनी निवेदिता बँकेतल्या संचालिकांना आमंत्रणं येत. तिथे जाणं, तिथली अभ्यासकांची, मान्यवरांची भाषणं ऐकणं या मंडळींना फार आवडे. अत्यंत उद्बोधक आणि उत्साहवर्धक विचारांची देवघेव होई. तिथे वैकुंठ मेहता संस्थेत अभ्यासासाठी येणाऱ्या पाहुण्यांना एक आदर्श सहकारी बँक बघायची असली की तिथले व्यवस्थापकही त्यांना भगिनी निवेदिता बँकेचा अभ्यासदौरा घडवत. राष्ट्रीय नेते, नामवंत विद्यापीठांतले अभ्यासक यातूनच निवेदिता बँकेला भेटी देऊन जात. त्यांचं येणं, त्यांच्याशी वार्तालाप यातूनही इथल्या महिलांना खूप काही शिकायला मिळे.

यात एकच अडचण होती. राष्ट्रभाषा भवनातली बँकेची जागा त्या मानाने फारच साधीसुधी होती. तिच्यात बँकेला साजेसं फर्निचर नव्हतं. इंटीरिअर डेकोरेशन नव्हतं. बोर्डरूममध्ये वातानुकूलन यंत्रणाही नव्हती. मोजक्या आणि जुजबी आसन व्यवस्थेत ती पाहुणे मंडळी दाटीवाटीने बसत. काहींना वेळप्रसंगी उभं राहावं लागे. तिथेच पाहुणचार करावा लागे. दिखाऊपणाची कोणालाही आवड नसली तरी बँकेची बोर्डरूम तिच्या

नावाला साजेशी असायलाच हवी होती. भेटीला येणाऱ्या मान्यवरांचा बँकेच्या सुस्थितीवर, अद्ययावततेवर विश्वास बसावा इतपत नेटकेपणा तरी आणणं भाग होतं. त्यामुळेच बँक सुरू झाल्यानंतर जवळजवळ २० वर्षांनंतर बँकेच्या बोर्डरूममध्ये खाली मखमली रुजामा आला. भिंतींची रंगरंगोटी झाली. अद्ययावत फर्निचर आणलं गेलं. बाह्य रूपाला महत्त्व देणाऱ्या व्यवसायक्षेत्राची बूज राखण्यासाठी बँकेने इतपत चैन केली. एरवी बँकेचं धोरण नेहमीच काटकसरीचं राहिलेलं आहे. झगमगाटी देखाव्याला तिच्यात कुठेच स्थान नाही. शिवाय असल्या दिखाऊपणासाठी कोणाची प्रतिमा अडून राहत नसते, हेही आता अनुभवाने सिद्ध झालेलंच आहे. एखादी गृहिणी जशी आपल्या मोजक्या साधनांमधूनही एक नीटनेटकं, स्वागतशील घर उभं करायला बघते तसाच हा प्रयत्न होता असं म्हणता येईल. बदलत्या काळाला साजेसं रंगरूप धारण करण्यात मागे पडून बँकेला चालणार नव्हतं!

याबरोबरच आपली बँक गरजू माणसांना सेवा देण्यासाठी आहे, याचा विसर पडून चालणार नव्हतं. त्या माणसाचा चोखपणा चाचपण्यासाठी त्याची कागदपत्रं असावीत हे खरंच. पण नुसते कागद वाचण्यापेक्षा माणसं वाचता आली पाहिजेत, हे सनातन सूत्र बिंबवायला हवं होतं. हे साधलं म्हणून इथे येणाऱ्या खातेदारांना, सभासदांना 'बँकेत जायचंय' याचं दडपण आलं नाही. उलट हसतखेळत, सहजपणे, इथलं काम होईल या विश्वासाने अनेक खातेदार इथे येत गेले. हा प्रेमरज्जू जनतेनेही जपला. कसा? तर१९८७ पासून सातत्याने ५ वर्षे बँक दरवर्षी जो डीव्हिडंड जाहीर करे, त्यापैकी काही रक्कम इमारत निधीकडे वर्ग करावी असं भागधारकांना सुचवे. त्या वेळी लोक अत्यंत उदारपणे या प्रस्तावाला मान्यता देत. या औदार्यामुळेच बँकेच्या रौप्य महोत्सवापर्यंत बँकेकडे चांगला इमारत निधी जमला होता. आणि त्यातून बँकेच्या ४ शाखा स्वत:च्या मालकीच्या वास्तूत कार्यरत झाल्या होत्या.

याखेरीज बँकेने बक्षिसांची मोठी कमाई केली होती ती वेगळीच!.

कोणीही, कितीही चांगले काम केले, तरी त्यास जनमान्यता मिळणे आवश्यक आहे. बँकेला १९९१-९२मध्ये पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनने 'उत्कृष्ट बँक' व सांगवी शाखेची 'उत्कृष्ट शाखा' म्हणून निवड केली होती. १९९२-९३मध्ये अर्बन को-ऑप. बँक अँड क्रेडिट सोसायटी यांनी बंगळुरू येथे सर्वोत्कृष्ट सहकारी बँक म्हणून केलेला गौरव, १९९३मध्ये नॅशनल अलायन्स ऑफ यंग एन्टरप्रेन्युअर्स, नवी दिल्ली यांनी हैदराबाद येथे आयोजित केलेल्या महिला उद्योजक परिषदेत बँकेचा बेस्ट इन्स्टिट्यूशन इन द कन्ट्री सपोर्टिंग लेडीज एन्टरप्रेन्युअर्स म्हणून केलेला गौरव बँकेची शान वाढवीत आला आहे.

रौप्यमहोत्सव :

२४ मार्च १९९८ रोजी भगिनी निवेदिता सहकारी बँक पंचविसाव्या वर्षात पदार्पण करणार होती. या रुपेरी वर्षामध्ये बँकेतल्या ठेवींनी १०० कोटींची मर्यादा ओलांडावी हे संचालिकांचं खूप मोठं स्वप्न होतं. एकीकडे मंदीचा काळ होता. बँक क्षेत्रातली चुरस वाढत होती. महानगरांमध्ये येणाऱ्या परदेशी बँका वेगवेगळी आमिषं ग्राहकांना दाखवायला लागल्या होत्या. ह्या पार्श्वभूमीवर १०० कोटींचं उद्दिष्ट भव्यच होतं. पण असं काही भव्यदिव्य काम डोळ्यांसमोर ठेवल्याशिवाय चैतन्य संचारणार नव्हतं.

३० नोव्हेंबर १९९७ रोजी बँकेच्या ठेवी सुमारे रु. ९३.५ कोटींपर्यंत पोहोचल्या होत्या. किमान रु. ७ कोटींच्या ठेवी लगोलग मिळवणं भाग होतं. त्यासाठी १६% व्याजदर जाहीर झाला. अर्थात ही 'ऑफर' अवघ्या १५ दिवसांसाठीच ठेवलेली होती. पण तिचा चांगलाच परिणाम झाला. १ डिसेंबर १९९७ रोजी म्हणजे पहिल्या दिवशीच सुमारे रु. ४७.५ लाख रुपयांच्या ठेवी बँकेकडे सहजपणे आल्या. दुसऱ्या दिवशी सुमारे रु. ६७ लाख, तिसऱ्या दिवशी सुमारे रु. १२५ लाख असा दररोज नव्या ठेवींचा आकडा फुगत चालला. सेवकवर्गाला नेहमीच्या अनेकपट काम दररोज करावं लागलं. पण सगळेच नव्या उद्दिष्टांसाठी हातभार लावायला उत्सुक होते. ६ डिसेंबर रोजी मंगळवार पेठ शाखेत एकदम रु. २ कोटी रुपयांची एक ठेव आल्याने मोठीच भर पडली. 'आता केवळ दीड कोटी जमा व्हायचे राहिलेत. रु. ५० लाखांची कमतरता आहे. फक्त रु. १० लाख कमी पडताहेत,' अशा चर्चा शाखाशाखांमध्ये रंगू लागल्या. १० डिसेंबर १९९७ रोजी शंभर कोटींची मजल गाठली गेली. सर्व शाखांमध्ये एकमेकांच्या अभिनंदनाचे फोन खणखणू लागले. प्रयत्नपूर्तीचा आनंद, अभिमान सर्वांच्याच मनात दाटून आला. पेढे वाटले गेले. १९९७ सालाच्या अखेरीस तब्बल सव्वाशे कोटींच्या ठेवी बँकेच्या सर्व शाखांमध्ये मिळून गोळा झाल्या. पंचविसाव्या वर्षाने नेत्रदीपक यश मिळवले.

कठोर निग्रह केला. सर्वांनी मिळून आनंद-उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवलं तर आपण महत्प्रयत्नाने तिथवर पोहोचू शकतो याची एक प्रकारची 'रुपेरी' हमीच या निमित्ताने मिळाली.

सार्वजनिक क्षेत्रातल्या वित्तसंस्थेच्या आयुष्यात २५ वर्षं हा काही मोठा काळ नव्हे. पण भगिनी निवेदिता बँकेने जिथून सुरुवात केली, त्या मानाने केलेली यशस्वी वाटचाल लक्षणीय होती. यामुळेच बँक दणदणीत समारंभ साजरा करणार होती. ''दाढे साहेब उगाच पत्नीच्या आडून स्वत:ची-बँकेची हौस पुरी करताहेत का? या बायकांनी एवढी धडपड करून दुसरा एखादा धंदा-व्यवसाय केला असता तर बरं झालं नसतं का? सुरुवातीचं ठीक आहे, पण बदलत्या स्पर्धात्मक काळाला या पुऱ्या पडणार का?'' असे शेरे-टोमणे सवयीचे झाले होते. तरीही त्यातूनही बँक २५व्या वर्षामध्ये यशस्वी पदार्पण करत होतीच.

१५० कोटींच्या ठेवींचा आकडा आता फारसा दूर नव्हता. एकेक शाखा वाढत जात बँकेच्या ९ शाखा कार्यरत झालेल्या होत्या. सर्व प्रकारच्या ठेवींवर राष्ट्रीयीकृत व शेड्युल्ड बँकांपेक्षा जास्त व्याजदर देण्याबाबत लौकिक पसरला होता. हे सगळं यश दणक्यात साजरं करावंसं वाटणं स्वाभाविक होतं. याच दृष्टीने रौप्य महोत्सव सोहळ्याच्या कार्यक्रमांचं आयोजन केलं गेलं.

'घरचं कार्य' असावं इतकं चैतन्य संचालिका/कर्मचाऱ्यांत संचारलं. शाखेशाखेत आणि सर्वांचा सामूहिक असे आनंद सोहळे करण्याच्या योजना आखल्या गेल्या.

सामूहिक सोहळ्याची तारीख ठरली, २४ मार्च १९९८. स्थळ - बालगंधर्व रंगमंदिर.

प्रमुख पाहुणे - तेव्हाचे रिझर्व्ह बँकेचे संचालक श्री. डिडोलकर.

अध्यक्ष - मा. प्राचार्य शिवाजीराव भोसले

विशेष अतिथी - ज्येष्ठ कार्यकर्ते, विचारवंत श्री. मोहन धारिया.

असा जंगी कार्यक्रम ठरला.

व्यासपीठावर नामवंत पाहुण्यांसह दादेवहिनी, बँकेच्या त्या वेळच्या अध्यक्षा प्रमिलाताई गरुड, उपाध्यक्षा सरला रेगे विराजमान होत्या. मनोगत व्यक्त करताना या महिलांच्या भावना उचंबळून येत होत्या. कारण या वाटेचं खडतरपण आणि स्वप्नपूर्तीचा आनंद या दोन्हींचा पुरेपूर अनुभव सर्वांजवळ होता. प्रा. शिवाजीराव भोसले यांचा भगिनी निवेदिता आणि स्वामी विवेकानंद यांच्या कार्याचा गाढा अभ्यास असल्यानं त्यांचं भाषण बँकेच्या सर्व कार्यकर्त्यांना प्रेरणा देऊन गेलं.

रौप्य महोत्सवाचा शुभारंभ

एके काळी घराच्या व्हरांड्यात काम सुरू करण्यापासून आता बँकेच्या ९ पैकी ५ शाखांच्या जागा स्वतःच्या मालकीच्या होत्या. ऑडिटमध्ये सातत्याने 'अ' वर्ग मिळत होता. १६५ कोटींच्या ठेवी, २ कोटी रुपयांचं भागभांडवल, ९५ कोटी रुपयांची कर्जं इथवर मजल मारलेली होती. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव होत होता. हाती हिशोबाच्या चिठ्ठ्या लिहून ठेवण्यापासून आता सर्व शाखांमध्ये संगणक साहाय्य मिळवणं शक्य झालं होतं. एकूणच इथल्या शिस्तबद्धतेचा आणि कार्यक्षमतेचा लौकिक सर्वत्र पसरला होता. बँकिंग या विषयांच अधिकृत शिक्षण घेणारी मंडळी भगिनी निवेदिता सहकारी बँकेचा मागोवा घेतल्याशिवाय आपला अभ्यास पूर्ण करू शकत नव्हती. या सर्व ऋणाची नोंद घेण्यासाठी बँकेने रौप्य महोत्सवी वर्षामध्ये आत्तापर्यंतच्या वाटचालीतला सर्वाधिक म्हणजे २५% डिव्हिडंड जाहीर केला. दुसऱ्या बाजूने सभासद कल्याण निधी आणि सेवक कल्याण निधी हे दोन निधी उभारून सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवली.

ह्या निमित्ताने बँकेतर्फे संस्थापिकांचा, संचालिकांचा सत्कार करण्यात आला. तसेच निवृत्त झालेल्या पहिल्या कर्मचाऱ्यांचे सत्कार केले. अन्य मान्यवरांची उत्तमोत्तम भाषणं झाल्यानंतर अश्वमेध मंगल कार्यालयामध्ये सहभोजनाचा कार्यक्रम योजला होता. त्याचा लाभ घ्यायला बँकेच्या सफाई कामगारांपासून आजी-माजी संचालिकांपर्यंत सगळे जमले. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात रौप्यमहोत्सवाचा शुभारंभ करतांना काही निवडक सेवकसेविकांचा सत्कारही केला गेला. बँकेच्या स्थापनेपासून बँक उभारणीपर्यंत त्यांनी दिलेल्या योगदानाचा सन्मान करण्याचा तो प्रयत्न होता.

अशा प्रकारे समूहाने समूहाचं यश, मोठ्या सामूहिक पातळीवर साजरं केलं. लवकरच येऊ घातलेल्या २१व्या शतकाकडे जाण्याच्या दृष्टीने काय काय तयारी करावी लागेल? याविषयी बरचंसं आत्मचिंतनही या निमित्ताने झालं. कधीतरी बँकेला शेड्युल्ड बँकेचा दर्जा मिळावा आणि बँकेची स्वतःची नवी इमारत दिमाखात उभी राहावी ही स्वप्नं उच्चारली गेली.

ह्या सर्व उत्सवाला, उत्साहाला एकच दुःखाची किनार होती, ती म्हणजे संस्थापक श्री. विवेक दाढे उर्फ सर्वांचे दाढे साहेब देहरूपाने सर्वांच्यात नसण्याची. २६/२/१९९० रोजी ते कालवश झालेले होते. पण त्यांनी अंगी बाणवलेली शिस्त, त्यांनी रुजवलेली कार्यतत्परता, त्यांनी बिंबवलेलं साधनशुचितेचं महत्त्व हे बँकेतल्या सर्वांनी जिवापाड जपलं होतं. त्यामुळे दाढे साहेब हे विचारांच्या रुपाने सोबतच असल्याचा दिलासा तरी अनेकांना मिळत होता.

मात्र रौप्य महोत्सव हा फक्त आपापसांत साजरा करण्याचा एकदिवसीय सण, सोहळा असणं योग्य नव्हतं. या निमित्ताने ज्या लोकांनी बँकेला 'मोठं' केलं, त्यांनाही काही

द्यायला हवं होतं. त्यांना एकत्र आणणं, त्यांना गौरवणं, त्यांना मार्गदर्शन करणं या गरजाही होत्या. बँकेचा ग्राहकांशी, माजी-आजी व भावी अशा सर्व ग्राहकांशी, काही ना काही संवाद सुरू ठेवायला हवा होता. त्या दृष्टीने रौप्य महोत्सवी वर्षामध्ये अनेक उपक्रम बँकेने हाती घेतले. त्यापैकीच एक होता 'उद्योजक मेळावा!'

६ जानेवारी १९९९ रोजी डेक्कन जिमखाना भागातल्या गो.ल.आपटे सभागृहात हा मेळावा भरवला गेला. कमी भांडवलामध्ये पण निश्चितपणे आणि दीर्घ काळ चालतील असे व्यवसाय कोणते आहेत? महिलांनी त्यांपैकी कोणते आणि कसे केले आहेत? ह्या सर्व गोष्टी समाजापुढे मांडणं हा त्यामागचा मुख्य उद्देश होता. अशा उद्योगांमधून निर्माण झालेली उत्पादनं प्रदर्शनात मांडली होती. त्याचबरोबर त्यांच्यापैकी काही उद्योजिकांची भाषणंही आयोजित केली होती. त्यांचे अनुभव ऐकून, त्यांच्याकडून मार्गदर्शन घेऊन इतर बायकांनीही उद्योगविश्वात येण्याची प्रेरणा घ्यावी हा हेतू होता.

बघता बघता सभागृहातली टेबलं महिलांच्या उत्पादनांनी सजली. ह्या उत्पादनांसाठीचं आर्थिक बळ भगिनी निवेदिता सहकारी बँकेने दिलेलं होतं. सॉफ्ट टॉइज बनवणाऱ्या स्मिता घारमरकर, सकस पिठं बनविणाऱ्या माधुरी सहस्रबुद्धे, ब्युटी पार्लर चालवणाऱ्या ज्योती ढमढेरे, कर्नाटकी कशिदा करून देणाऱ्या पद्मजा बढे, बेकरी माल बनवणाऱ्या वृंदा नवरे, वधूवर सूचक मंडळ-मेळावे घेणाऱ्या मनीषा सप्रे, फुलांची लायब्ररी चालवणाऱ्या मृणालिनी केळकर,

माजी मुख्य कार्यकारी अधिकारी रेखा भट उद्योजक महिलांना मार्गदर्शन करताना

खाद्यसेवा देणाऱ्या नीलिमा शुक्ल प्रभृतींचा त्यात समावेश होता. या सगळ्या यशस्वी उद्योजिका होत्या.

एखाद्या व्यवसायाची कौटुंबिक पार्श्वभूमी असो-नसो, घरातून भावनिक व आर्थिक पाठबळ मिळो न मिळो, संबंधित शिक्षण-प्रशिक्षण अगोदर घेतलेलं असो-नसो, निग्रह केल्यावर आणि मेहनतीची तयारी बाळगल्यास एखादी महिला त्यातही उत्तम यश मिळवू शकते; ह्याची जिवंत उदाहरणंच जणू काही या टेबलाटेबलांवरून नजरेला पडत होती. ह्या उपक्रमाला महिलांनी प्रचंड प्रतिसाद दिला. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या तेव्हाच्या उपाध्यक्षा मीनल मोहाडीकर ह्यांनी अध्यक्षपद भूषवले.

याखेरीज शाखाशाखांनी आपापल्या पातळीवर घेतलेले उपक्रमही होतेच. मंगळवार पेठ शाखेने रक्तदान शिबिर घेतलं. नारायण पेठ शाखेने ग्राहक मेळावा आयोजित केला. तसेच पुढेही एकेका शाखेने आपापल्या ग्राहकांचे मेळावे घेतले. त्या त्या मेळाव्यांना त्या त्या परिसरातल्या मान्यवरांना बोलावलं गेलं. एकूण बँकेचं अस्तित्व आणि समाजातलं स्थान अधोरेखित व्हावं असे अनेक उपक्रम त्या वर्षभरासाठी योजले गेले. शाखांच्या परिसरातल्या चांगल्या सामाजिक संस्थांना देणगी दिली. एकूणच भगिनी निवेदिता सहकारी बँकेची विजयपताका दूरवरूनही दिसू शकेल, अशा जोमाने त्या रौप्य महोत्सवी वर्षामध्ये फडकत राहिली.

रौप्यमहोत्सवी वर्षाचा शुभारंभ झाल्यापासून बँकेकडे शुभेच्छापत्रांचा ओघ सुरू झाला. साध्यासुध्या पुणेकरांपासून मान्यवर

बँकेने आयोजित केलेल्या महिला दिन प्रसंगी मार्गदर्शन करताना महिला सक्षमीकरणाच्या प्रवर्तक सुधा कोठारी

समाजधुरीणांपर्यंत अनेकांनी पत्राद्वारे शुभेच्छा पाठवल्या. त्या सर्वांना आस्थापूर्वक व्यक्तिगत उत्तरं पाठवावीत, असं संचालिकांनी ठरवलं. त्यासाठी खास सोनेरी रंगातली आकर्षक 'लेटरहेड्स' बनवून घेतली. संवादामधला गोडवा जपण्याचं धोरण नेहमीच असल्याने अनेक संचालिकांनी त्यांच्यावर स्वहस्ते उत्तरं लिहून पाठवली.

रौप्यमहोत्सवाचा सांगता समारंभ २४ मार्च १९९९ रोजी बालगंधर्व रंगमंदिरामध्ये एका जंगी स्वरूपात केला गेला. त्यादिवशी 'इंद्रधनु' ह्या स्मरणिकेचं प्रकाशन करण्यासाठी कवयित्री अरुणा ढेरे यांना बोलावण्यात आलं. तेव्हाचे सहकार आयुक्त श्री. सुभाष लाला, स्त्रीमुक्ती विचाराच्या प्रवर्तक विद्याताई बाळ असे मान्यवर निमंत्रित होते.

आत्तापर्यंतच्या काहीशा खडतर वाटचालीमध्ये बँकेने अनेक छोट्या व्यावसायिकांना छोट्या रकमांची कर्जं दिली होती. त्यात चटण्या-मसाले करून विकणाऱ्या महिला होत्या, फेरीवाले होते, टपरीवाले होते, छोटे गृहउद्योजक होते. त्यांचं महत्त्व होतंच. पण आता नवीन मोठे उद्योग सुरू होतांनाची मोठी कर्जं वितरित करायला हवी होती. त्यात जोखीम जाणवली तरी मोठ्या व्यावसायिक उलाढालींच्या शक्यताही होत्या. अशा मोठ्या प्रस्तावांचा अभ्यास करायला, संभाव्य कर्जदारांशी चर्चा करून बारकावे समजून घ्यायला, अधिक अनुभवी जाणकार संचालिकांची गरज पडणार होती. अगदी सुरुवातीपासूनच्या काही संचालिका वयानुपरत्वे मागे सरणार होत्या. या दृष्टीने विशेष शोध घेऊन नव्या दमाच्या कर्तबगार संचालिकांची फळी निवडायला सुरुवात झाली.

❖❖❖

रौप्य महोत्सवाचा सांगता समारंभ

शाखा विस्तार आणि 'निवेदिता भवन'

रौप्यमहोत्सवी वर्षांनंतर नवीन शाखा उघडण्याबाबत रिझर्व्ह बँकेचे नियम-निकष थोडे कठोर झाले. त्यामुळे बँकेच्या नव्या शाखा सुरू करण्याचा वेग काहिसा मंदावला. इकडे संपर्कसाधनं, वाहन ह्यांची उपलब्धी वाढल्याने बँकेचे ग्राहक लांबच्या ठिकाणाहून जरूर तेव्हा, बँकेत यायला लागले. किंवा प्रत्यक्ष भेट न देताही काही बँकव्यवहार होऊ लागले. शाखांबाबतचा आणखी एक फरक म्हणजे आता तुलनेने लहान आकाराच्या, भाड्याच्या जागांमध्ये शाखा निघू लागल्या. आधुनिक तंत्रसाह्यामुळे लहान जागेतून मोठा व्यवसाय करणं शक्य झालं. जागांचे मालकही १०-१५ वर्षांचे भाडे-करार केल्याशिवाय जागा भाड्याने देइनासे झाले.

या सगळ्यातून रौप्यमहोत्सवानंतर १८ डिसेंबर २०१० रोजी बँकेची १०वी शाखा नगर रोडवर सुरू झाली. मंगळवार पेठ शाखेचे अनेक ग्राहक आतापर्यंत नगर रोड भागामध्ये फैलावत थेट रांजणगावपर्यंत पोचले होते. रांजणगाव येथे औद्योगिक वसाहत वाढत होती. तिथल्या ग्राहकांना बँकेसेवा हवीच होती. ती मागणी चंदननगर, खराडीमध्ये शाखा उघडून पूरी करण्यात आली.

तशीच काहीशी मागणी आळंदी रोड, भोसरी या भागांमधून येत होती. वेगाने छोटेमोठे उद्योग त्या परिसरात सुरू होत होते. ह्या दृष्टीनें नगर रोड शाखेनंतर वर्षभरातच भोसरी शाखा सुरू करण्याचा निर्णय झाला. निगडी शाखेशी व्यवहार करणाऱ्यांना इथून सेवा घेणं सोयीचं ठरणार होतं.

अशा दूरच्या परिसरात अधिकृतरीत्या बांधलेल्या, सोयीच्या जागा मिळवणं खूपदा कठीण पडतं. अनधिकृत किंवा बेकायदा जागेत बँक शाखा सुरू करणं धोक्याचं असतं. भगिनी निवेदिता बँक कधीच, कोणताच अवैध पर्याय पत्करत

नसते. त्यामुळे बरेच दिवस शोध घेतल्यानंतर २०११ सालाच्या अखेरीस आळंदी रोडवरच्या दर्शन रेसिडेन्सीमध्ये ४ गाळे उपलब्ध झाले. २७ फेब्रुवारी २०१२ रोजी बँकेची ११ वी शाखा भोसरीमध्ये कार्यरत झाली.

२०१३ साली बँकेची अनुक्रमे १२वी आणि १३वी शाखा कार्यान्वित झाली. पहिली, पिरंगुटला, घोटवडे फाट्यावर १८ मार्च २०१३ रोजी तर दुसरी धायरीला, चाकणकर प्लाझामध्ये १९ मार्च २०१३ रोजी सुरू झाली. या दोन्ही शाखा निमशहरी भागात होत्या. पण पिरंगुटच्या आसपास उद्योगधंदे वाढत होते, तर धायरी भागातल्या लोकांना 'गृहकर्जं' हवी होती. पुण्याकडे नोकरीसाठी आलेल्या अनेक नवागतांना, आर्थिकदृष्ट्या पुण्यात राहणं जड जात होतं. त्यांच्या गरजांसाठी पुण्यापासून दूर, धायरीसारख्या भागात नवे गृहप्रकल्प, नवी दुकानं येत होते. त्यांच्यासाठी गृहकर्जाला मागणी होती. यामुळे या दोन्ही शाखांचा जम लवकरच बसला. धायरी शाखा सर्वसमावेशक बँकिंग धोरणाला उपकारक ठरली. त्याच सुमारास कात्रजच्या दिशेनंही पुणं पसरत होतं. पुण्याचा परंपरागत, मध्यवर्ती भाग भरत चालल्यामुळे नव्यानं पुणेकर होणाऱ्यांना अशा विस्तारित भागांकडेच वळावं लागणार होतं. व्यवसायाच्या वाढत्या शक्यता तिथेच होत्या. यादृष्टीने, सर्वसमावेशक बँकिंगचं उद्दिष्ट ठेवून, कात्रजजवळच्या सुखसागरनगरमध्ये ४ फेब्रुवारी २०१४ रोजी

विविध शाखांचे उद्घाटन

विविध शाखांचे उद्घाटन

बँकेची १४ वी शाखा सुरू झाली. पुण्याच्या उत्तरेकडच्या उपनगरानं बँकेला सहज सामावून घेतलं.

त्याच वर्षी ३० मे २०१४ रोजी बँकेची १५वी शाखा विश्रांतवाडीला सुरू झाली. पुढच्या विस्तारप्रकल्पासाठी चाकण बसस्टेशनची जागाच नक्की केली गेली. भावी खातेदारांच्या सोयीसाठी व मागणीनुसार आता औद्योगिक विभागात जम बसवायचा होता. त्यादृष्टीने १४ सप्टें. २०१५ रोजी साई रचना प्लाझा, नाणेकरवाडी, चाकण येथे १६ वी शाखा सुरू झाली.

२०१५सालच्या अखेरीस बँकेची शाखा निघाली ती शिरवळमध्ये. इतकी वर्षं 'पुणे जिल्हा' यात सीमित असलेलं बँकेचं कार्यक्षेत्र आता 'महाराष्ट्र राज्य' इथवर विस्तारलं होतं. म्हणून पुणे आणि सातारा या दोन जिल्ह्यांच्या सीमेवरचं शिरवळ हे गाव १७ वी शाखा उघडण्यासाठी निवडलं. शिरवळ-खंडाळा-पारगाव हा भाग औद्योगिक विभाग म्हणून विकसित होत होता. त्यामुळे व्यवसायाच्या दृष्टीनं ही निवड सार्थ ठरली. २१ ऑक्टोबर २०१५ रोजी बँकेच्या प्रथेप्रमाणे प्रथम येणाऱ्या खातेदाराच्या हस्ते शिरवळ शाखेचं उद्घाटन झालं. पुढल्याच वर्षी बँकेनं हडपसरकडं मोहरा वळवला.

मंगळवार पेठ शाखेचे अनेक जुने खातेदार, व्यक्ती आणि उद्योग हे आता हडपसरपर्यंत पांगले होते. त्यांची सतत मागणी होती की, आता हडपसरमध्ये बँकेची शाखा असायला हवी. तिच्यानुसार २ सप्टेंबर

२०१६ रोजी निवृत्ती अपार्टमेंट हडपसर गाडीतळ या इमारतीत बँकेची १८वी शाखा सुरू झाली.

त्या त्या भागाच्या सामाजिक, औद्योगिक विश्वातल्या बदलाचे पडसाद कधी कधी उमटले. जशी पिरंगुटमधल्या बऱ्याच उद्योगांना काही ना काही कारणाने खीळ बसली तशी बँकेतली संबंधित उलाढाल मंदावली किंवा धायरीतील अनेक लोक नोकरीसाठी पुण्याकडे आल्याने त्यांनी पुण्यातच बँकव्यवहार करणं पत्करलं. पण या सर्व आव्हानांना बँकेच्या व्यवस्थापनाने वेळोवेळी आवश्यक ते बदल योग्य तो करून प्रतिसाद दिला. एकदा शाखा सुरू केल्यावर बँकेनं आपलं सर्व लक्ष, कौशल्यं तिथं लावून नेहमी प्रगतीच केलेली आढळते.

निवेदिता भवन :

अशा प्रकारे १९७४ ते २०१६ एवढ्या काळामध्ये बँकेनं पुण्यात व पुण्याच्या चहू दिशांनी १८ शाखांपर्यंत आपलं कार्यक्षेत्र वाढवलं. पण आपली स्वत:ची स्वतंत्र इमारत असावी. आपलं एक दिमाखदार मुख्य कार्यालय असावं हे स्वप्न इ.स. २०१७ मधे साकार झालं.

आजवरच्या पहिल्या ४४-४५ वर्षांमध्ये राष्ट्रभाषा भवनातली जागा अपुरी पडायला लागली होती. ती भर वस्तीत असणं सोयीचं होतं. तरीही लिफ्ट नसणं, अभ्यागतांची वाहनं ठेवायला जागा (पार्किंग स्पेस) नसणं, बोर्डरूममध्ये जाण्यासाठी ४ मजले

बँकेचे हेड ऑफिस

तेव्हा

आता

चढावे लागणं या गोष्टी आधुनिक काळात गैरसोयीच्या होत्या.

अनुकूल जागेचा शोध घेता घेता प्रभात रस्त्याच्या आठव्या गल्लीत योग्य ती जागा मिळाली. कर्वे रस्ता आणि डेक्कन जिमखाना यांच्याजवळ, १९३७ साली, सुप्रसिद्ध लेखक-दिग्दर्शक के. नारायण काळे यांनी ५२००चौ. फुटांच्या प्लॉटवर बांधलेलं 'मनीषा' नावाचं घर होतं. ८ ऑगस्ट २०१३ रोजी बँकेने या जागेच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण केला.

सुमारे ९००० चौ. फुटांचं हे बांधकाम सुरू करण्यापूर्वी ह्या आवारातल्या जुन्या वृक्षराजीची व्यवस्था करून देणं भाग होतं. त्यानुसार इथले १० वृक्ष मुळापासून उचलून अन्यत्र पुन्हा लावले गेले. शिवाय त्या १० वृक्षांच्या उच्चाटनासाठी ३० नवी झाडं बँकेने आसपास लावली व त्यांची उत्तम जोपासना केली. २९ सप्टेंबर २०१४ रोजी भूमिपूजन झालं. त्यानंतर इमारत उभारून सर्व फर्निचर, अंतर्गत सोयी-सुविधा करून घेतल्यानंतर २९ जानेवारी २०१७ रोजी मीनाक्षीताई दाढे यांच्या हस्ते फीत कापून इथे कामकाजाचा शुभारंभ केला गेला. इमारतीत स्वागतकक्षात दाढे साहेबांचा पुतळा ठेवला. त्याजवळ दीपप्रज्वलन केलं आणि तो परिसर प्रकाशमान झाला. याच इमारतीला नाव दिलं, 'निवेदिता भवन.'

या 'निवेदिता भवनाची' अनेक वैशिष्ट्ये आहेत. बँकेच्या मुख्यालयाला आवश्यक असणाऱ्या सर्व अंतर्गत रचना तर आहेतच पण अशी नवी बांधकामं अनेकदा पर्यावरणातली उष्णता वाढवतात. त्याला हानी पोचवतात. तो धोका टाळण्यासाठी प्रयत्न केला गेला. इमारतीतल्या फरशा, भिंतींचे रंग, दिवे हे सर्व घटक पर्यावरणस्नेही वापरले. पुढे ह्या सर्वांची सफाई करण्यासाठी वापरली जाणारी द्रव्यं नेहमीच केमिकलविरहित वापरली जातात. तसेच इथे वॉटर हार्वेस्टिंग केलं जातं. इथे गच्चीवर सोलर पॅनेल बसवले असून ते एम.एस.ई.बी.च्या मुख्य ग्रिडशी जोडलेले आहे. म्हणजेच त्या इमारतीतून काही प्रमाणात वीजनिर्मिती होते. याबद्दल एम.एस.ई.बी. तर्फे त्यांच्या बिल आकारणीत काही सवलतही दिली जाते. अशा एकूण पर्यावरणस्नेही दृष्टिकोनामुळे या इमारतीला 'ग्रीन बिल्डिंग'साठीचं ३ स्टार रेटिंगही

सहकार संस्कार

देशातील सहकारी चळवळीत महाराष्ट्र राज्य आघाडीवर आहे. देशातील एका भागात असलेली सहकारी चळवळसुद्धा संपूर्ण राष्ट्राचे स्वरूप बदलवून टाकते.
– डॉ. धनंजय गाडगीळ

पुढे मिळालेलं आहे. या सर्व सायासामुळे, बँक व्यवसाय करत असतांनाच आपण पर्यावरणरक्षण केलं याचा सार्थ अभिमान बँकेच्या सर्व संचालिकांना आहे.

असं सर्वाथानं आदर्श 'निवेदिता भवन' उभं राहणं हा बँकेच्या इतिहासातला मैलाचा दगड ठरल्यास आश्चर्य नाही. आज बँकेला मिळालेले सर्व पुरस्कार, सन्मानचिन्हं इथे दिमाखानं ठेवली आहेत. वातानुकूलित कॉन्फरन्स हॉल आहे. देखणा परिसर आहे. इमारतीवरची बँकेच्या नावाची पाटी दूरवरून दिसते.

❖❖❖

ग्रीन बिल्डिंग ३ स्टार मानांकन

बँकेची कार्यसंस्कृती

कोणत्याही बँकेला बँकिंग क्षेत्रात अग्रेसर ठरायचं असेल तर तीन आघाड्या व्यवस्थित सांभाळाव्या लागतात. यातली पहिली आघाडी असते ती बँकेवर नियमन ठेवणाऱ्या शीर्षसंस्थेची. दुसरी आघाडी असते ती या नियामक संस्थेच्या नियमानुसार आपल्या बँकेचं दैनंदिन कामकाज चालविणाऱ्या आपल्या संचालक सहकारी कर्मचारी वर्गाची आणि तिसरी आघाडी असते ती ज्यांच्या सोयीसुविधांसाठी बँक सुरू केली त्या ग्राहकांची, जनता जनार्दनाची. या तीन आघाड्या बँक कशा प्रकारे सांभाळू शकली? हे बघणंही या अर्धशतकी टप्प्यावर महत्त्वाचं आहे. कारण यापैकी एकाही बाजूने थोडीही डोळेझाक झाली असती तरी यशाची आजची कडी गाठता आली नसती.

कोणत्याही बँकेच्या एकूण आर्थिक व्यवहारांवर, उलाढालींवर खरा आणि अंतिम अंकुश असतो तो सहकार खात्याचा व रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा. हे दोन्ही नियामक जनसामान्यांचं हित जपण्याच्या उद्देशाने बँक व्यवहारावर लक्ष देऊन असतात. शेवटी सर्वसाधारण भारतीय नागरिक हा कठोर परिश्रमांनी पैसा मिळवत असतो व वाचवत असतो. बँकेत पैसे ठेवून आपल्या वर्तमानाची किंवा भविष्याची तरतूद करत असतो. देशभरातल्या छोट्यामोठ्या बँकांनी जनतेच्या ह्या पैशांचा कणानेही दुरुपयोग करू नये, उलट, याचा विश्वस्त म्हणून काम पाहावं यावर आरबीआय बारकाईने लक्ष ठेवते. त्यादृष्टीने वेळोवेळी मार्गदर्शक तत्त्व सांगते, परिपत्रक काढते, प्रत्येक बँकेचा गरजेनुसार साप्ताहिक -मासिक -वार्षिक अहवाल तपासत असते. त्यामध्ये कधी काही त्रुटी आढळल्यास 'कारणे द्या' च्या नोटीसा देते व इन्स्पेक्शनही करते. थोडक्यात म्हणजे जनसामान्यांच्या आर्थिक

हिताचं रक्षण करायला ती बांधिल असते.

रिझर्व्ह बँकेने २०१९ सालामध्ये नव्याने लागू केलेल्या व्यवस्थापन मंडळाची (Board Of Management) स्थापना बँकेने तत्परतेने केलेली आहे. व्यवस्थापन मंडळात तज्ज्ञ महिलांना सहभागी करून घेतल्यामुळे बँकेच्या संचालकमंडळाला फायदाच होतो आहे. बँकेच्या संचालिका, स्वीकृत संचालिका, व्यवस्थापन मंडळातल्या सदस्या यांपैकी कोणीही बँकेच्या दैनंदिन कामकाजात, व्यवस्थापनात हस्तक्षेप करू नये, कोणताही निर्णय लादू नये, हे धोरण बँकेच्या स्थापनेपासून जोपासलेले आहे.

ग्राहक हित रक्षण हे भगिनी निवेदिता सहकारी बँक आपलं आद्य कर्तव्य मानत असल्याने नियामकांनी लागू केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे नेहमीच पालन करते. त्यासाठी बँकेची स्वत:ची अलिखित आचारसंहिता तयार केली आहे. त्यामुळेच!

✻ कोणाही खातेदाराला सन्मानानेच वागवणं,

✻ कोणतेही कर्ज मंजूर करतांना योग्य पात्रतानिकष लावणे

✻ बुडित खाती कमीत कमी राखणे

✻ भागधारकांना, सहकार खात्याच्या मर्यादेत पण जास्तीत जास्त लाभांश देणे.

✻ कर्जविषयक निर्णय घेतांना संचालक मंडळाकडून बहुमताने किंवा सार्वमताने मंजुरी घेणं.

या तत्त्वांशी बँकेनी कधीही कसलीही तडजोड केलेली नाही. त्यामुळेच ही बँक ग्राहकांना नेहमीच पारदर्शी व्यवहाराची हमी देते.

भारतातल्या नागरी सहकारी बँकांचे भौगोलिक विभाजन पाहिले तर महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक, गुजरात व तामिळनाडू ही राज्य आघाडीवर दिसतात. त्यातही महाराष्ट्राचा सहकारी तत्त्वावर, सहकारी संस्था चालवण्यावर विशेष भर दिसतो. सहकारी संस्थांची संख्या, सदस्यत्व, भांडवल उभारणी, सभासद सेवा, कर्मचारी वर्ग, कार्यपद्धती, सहकारसंस्कृती ह्यासारख्या अनेक गोष्टींमध्ये महाराष्ट्र देशात अग्रेसर आहे. नागरी सहकारी बँकांचे जाळे आणि प्रभाव ह्यात महाराष्ट्राने विशेष स्थान पटकावलेलं आहे. उत्तम सहकारी तत्त्वांवर चालणाऱ्या बँका ह्या एकूण सहकार क्षेत्राचेच भूषण ठरणाऱ्या आहेत. अशा प्रगत विचाराच्या महाराष्ट्राचे भूषण ठरलेली भगिनी निवेदिता सहकारी बँक स्थापनेपासून आजवर महिलांनाच नोकरीवर ठेवण्याचा आग्रह धरून आहे. बँकेच्या सर्व शाखांमधल्या एकूण कर्मचाऱ्यांपैकी ९५ टक्के महिला कर्मचारी आहेत. अगदी कर्जवसुलीसारख्या आव्हानात्मक कामालाही महिलाच जातात. महिला कर्मचारी असल्यामुळे बँकेचे एखादे काम फार रेंगाळलेले, किंवा झालेच नाही, असं सहसा होत नाही. प्रसंगानुरूप मोठ्या जबाबदारीची, धाडसाची कामे पार पाडण्यात या बँकेचा सेवक वर्ग कधी कमी

पडत नाही. काम करण्याची संधी मिळाली, जरूर ते प्रशिक्षण मिळाले, कामाला पोषक वातावरण मिळाले आणि विश्वास दाखवला गेला तर महिला कोणताही कार्यभार समर्थपणे सांभाळू शकतात, असा आश्वासक दिलासा मिळण्याचे अनेक प्रसंग वेळोवेळी घडलेले आहेत.

एवढ्या शाखांमधून आणि मुख्यालय धरून सुमारे ३०० कर्मचारी आजमितीला बँकेच्या सेवेत आहेत. दिवसेंदिवस वाढतं तंत्रज्ञान, त्यानं मिळणारं अचूक आणि वेगवान काम यामुळे अनेक आस्थापनांमध्ये पूर्वीच्या मानानं अत्यल्प प्रमाणात नव्या कर्मचाऱ्यांची भरती करावी लागते. याला भगिनी निवेदिता बँक तरी अपवाद कशी असेल? आपल्याकडल्या कर्मचाऱ्यांना उत्साहवर्धक वातावरण मिळावं, बदलत्या काळानुसार काही वाढीव सोयी-सुविधा त्यांना लाभाव्यात, याबाबत बँक दक्ष असते. सध्याची रस्त्यावरची वाढती गर्दी - वाहतूक समस्या बघून शिरवळ-चाकण-पिरंगुट अशा लांबच्या शाखांमध्ये कामावर जाणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी बँकेने वाहनसेवा उपलब्ध करून दिली आहे. अशा कर्मचाऱ्यांची ने-आण वाहनामधून केली जाते. या व्यतिरिक्तच्या वेळात वसुलीच्या कामासाठी हेच वाहन उपयोगी पडते. ज्यांची वास्तव्यं आपल्या नित्य कामाच्या शाखेपासून विशिष्ट कि.मी. अंतराच्या पल्याड आहेत, त्यांना आता कामावर हजर राहण्याबद्दल काही भत्ता दिला जातो. त्यामुळे त्यांचा मासिक पगार हा कामावर जाण्या-येण्यात खर्च होत नाही. अशा प्रयत्नांमधून सेवाशर्तींबाबत काळाबरोबर राहाणं बँकेला शक्य होतं.

वास्तविक पाहाता बँकेच्या नित्य

महाराष्ट्र शासनातर्फे दिला जाणारा 'सहकारनिष्ठ' पुरस्कार - सन २०१२

कामाकाजात शारीरिक कष्टांचा फारसा भाग नाही. अन्य कौशल्यांची, बारकाव्याची, चिकाटीची गरज आहे. यातली कौशल्ये महिला शिकू शकतात. बारकावा-चिकाटी अनेकींमध्ये असते किंवा अंगी बाणवता येते.

सगळा आर्थिक व्यवहार महिला सांभाळणार?

मग पैशांबाबत महिला सावधतेच्या जरा जास्त आहारी जातील का?

महिलांवरच्या घरगुती जबाबदाऱ्यांमुळे नोकरीत जास्त सवलती किंवा रजा मागण्याकडे त्यांचा कल राहील का?

बायका मोठ्या आर्थिक आव्हानांना किंवा सामाजिक उद्रेकांना तोंड देऊ शकतील का?

वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेतील का?

थोडक्यात म्हणजे, केवळ महिला कर्मचारी नेमण्यामुळे बँकेच्या एकूण कार्यक्षमतेला काही मर्यादा तर येणार नाहीत? येत नसतील? तरीही ह्या धोरणावर बँक ठाम का राहते?

या किंवा अशासारख्या कोणत्याही शंकांमुळे बँकेचे व्यवस्थापन विचलित होत नाही. बँकेचा अर्धशतकी अनुभव असे ठामपणे सांगतो की, महिला कर्मचाऱ्यांमुळे बँकेच्या कामकाजावर कोणतीही मर्यादा येत नाही. कारण मुळामध्ये, पुरुष कर्मचाऱ्यांपेक्षा महिला 'वेगळ्या' आहेत, पण कोणत्याही अर्थाने 'कमी' नाहीत. महिलांना कौटुंबिक व्यवधाने असतात, पण त्यामुळेच त्या सहजपणे परस्परांची सोय-गैरसोय समजून घेतात, गौरी गणपती, सणवारांसाठी नटून थटून कामावर रुजू झालेल्या महिला बँकेत सणाची प्रसन्नता घेऊन येतात. बँकेच्या शाखाशाखांमध्ये उत्सवी वातावरण निर्माण करतात. कौटुंबिक अडचणींमध्ये सगळ्या एकमेकींना सांभाळून घेतात. कारण मुळात बँकच ह्या सर्वांना सदैव सांभाळून घेत असते. एखाद्या कर्मचारी महिलेकडून कामात काही चूक झाली, क्वचित प्रसंगी आर्थिक नुकसान झाले तरी त्या शाखेमध्ये कार्यरत असणाऱ्या सगळ्या महिला, स्वेच्छेने, तेवढ्या नुकसान भरपाईत हातभार लावतात. एखाद्या वेळेला

सहकार संस्कार

सहकार हा आमचा धर्म...महाराष्ट्र जाणतो त्याचे मर्म...
त्याच तन्मयतेने करतो आम्ही कर्म!
– सहकारमहर्षी
पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखेपाटील

काही कामासाठी रात्री उशिरापर्यंत बँकेत थांबावे लागले तरी सगळ्या बिनतक्रार थांबून आपापले योगदान देतात. इथे नोकरीवर रुजू होईपर्यंत अनोळखी असणाऱ्या बायका हळुहळू घट्ट स्नेहरज्जूंमध्ये बांधल्या जातात. एकमेकींची आजारपणे, कौटुंबिक कसोटीचे क्षण, काही आनंदवेळा, हे सर्वच परस्पर सहकार्याने निभावत असल्याने सगळ्या एखाद्या कुटुंबाच्या सदस्यांसारख्या एकजीव होऊ लागतात.

आपल्या कर्मचाऱ्यांमध्ये ह्या प्रकारचा भगिनीभाव किंवा अशी एका कुटुंबाची धारणा निर्माण करता येण्यामध्ये अर्थातच बँकेच्या व्यवस्थापनाच्या समबुद्धीचा मोठा वाटा आहे. कुटुंबप्रमुख कुटुंबातल्या सर्वांना सन्मानाची आणि समान वागणूक देत असेल तरच कुटुंबातले सदस्य एकजीव होतात, हे नेहमी दिसणारे आहे. कोणालाही पक्षपाताचा, डावे-उजवे करण्याचा अनुभव आला, नव्हे, तसा नुसता संशयही आला, तरी, कुटुंबांतली खेळीमेळी नाहीशी होते. इथे भगिनी निवेदिता सहकारी बँकेचे व्यवस्थापन बाजी मारते. एकदा कर्मचाऱ्याला सेवेत घेतले की त्याला/तिला सर्वतोपरी सामावून घेणे, तिच्या क्षमतांचा जास्तीत जास्त वापर करून घेणे, तिच्यातल्या उणिवा उघड्या न पाडता त्यांची सामंजस्याने भरपाई करणे पूर्वीपासून केले जाते. महिलांना कौटुंबिक व्यापामुळे जास्तवेळा रजा घ्याव्या लागू शकतील हे गृहीत धरून इथे रजांच्या पूर्वनियोजनावर भर दिला जातो. निवडप्रकिया पूर्ण करून रुजू होणाऱ्या सर्वांना किमान एक आठवड्याचं ट्रेनिंग दिलं जाते, टप्प्याटप्प्याने वेगवेगळ्या खात्यांमधला प्रत्यक्ष कार्यानुभव दिला जातो. त्यामधून तिला सर्व कामे समजतात, करता येतात.

शेवटी, महिलांना आपल्या उद्दिष्टापर्यंत जायला प्रेरित करणे, त्यांच्यात कोणतेही गंड असल्यास ते घालवून त्यांचा आत्मविश्वास वाढवणे आणि व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेपेक्षाही सामूहिक महत्त्वाकांक्षा जोपासायला उद्युक्त करणे हे बँकेचे धोरण आहे. ती आर्थिक व्यवहार करणारी असली तरी त्यातला 'सहकारी' हा शब्द, त्यामागचे सहकारतत्त्व कधीच मागे सारत नाही. छोटीछोटी पावले टाकत मोठे उद्दिष्ट गाठण्यासाठी येथे महिलांचे संगठन झालेय. हे कायमचे स्मरणात असल्याने इथल्या महिला कर्मचारी समाधानी आहेत, तसंच त्यांच्या कामाबाबत बँकही नि:शंक आहे. मुळातच स्त्री पुरुष कोणीही, कधीही, कोणत्याही बँकेत काम करायचे ठरवले तरी, प्रत्येकालाच काऊंटरसमोर येणाऱ्या प्रत्येक ग्राहकाशी संवाद साधावा लागतो. त्यापैकी कोणाच्या नजरा किंवा भले-बुरे वाग्बाण झेलावे लागले तरी त्याच्या कामकाजाची पूर्तता करावी लागते. मोठा रोखीतला भरणा जमा करून घ्यावा लागतो. कर्जप्रस्ताव स्वीकारावे लागतात आणि त्यांना मान्य किंवा अमान्य करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी लागते.

मोठ्या आस्थापनांची पगारखाती बँकेत असतील तर त्यांना वेळेवर वेतन मिळण्याची व्यवस्था करावी लागते. ग्राहकांच्या चौकश्या, तक्रारी, मागण्या, उणिवा, मर्यादा ह्या साऱ्यांना सामोरे जावे लागते.

हे सर्व योग्य प्रकारे पार पाडण्यासाठी प्रशिक्षित सेवक वर्ग असणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी बँक गरजेनुसार वेगवेगळे प्रशिक्षण कार्यक्रम घेते. सेमिनार्स, रिफ्रेशर कोर्सेस वगैरेंना बँकेचे सेवक हजर राहतात. त्यासाठी जरूर तेव्हा कामातून सवलती देण्यात येतात. यामुळे ग्राहकांनाच अद्ययावत सेवा मिळते आणि आदर्श ग्राहकसेवा ही तर भगिनी निवेदिता सहकारी बँकेची ख्यातीच आहे.

अशाप्रकारे बँक आपल्या कर्मचाऱ्यांना जपते, सांभाळते म्हणून हे कर्मचारी आपल्या ग्राहकवर्गाला जपतात, सांभाळतात, काऊंटरवरच उडवाउडवीची उत्तरे मिळाली, उगाचच चार खेटे मारायला लावले, काऊंटरवर चुकीची माहिती दिली, यासारख्या तक्रारी इथे येणाऱ्या ग्राहकांना सहसा कराव्या लागत नाहीत, अनेक ग्राहकांना, अगदी छोट्यातल्या छोट्या खातेदारांनाही, नावासह ओळखणे, मागील संदर्भ आठवून योग्य सल्ला देणे हे इथे नेहमी अनुभवता येते.

महिला सेवकांपुढील आव्हाने :

बँकेचे काम, बँकेतली नोकरी ही जरी बंदिस्त जागेतली आणि चाकोरीबद्ध असली तरी तिच्यात सतत रोख पैश्यांना हाताळावे लागते. आलेल्या, गुंतवल्या गेलेल्या प्रत्येक पैशाची कागदोपत्री अचूक नोंद करावी लागते. त्याचप्रमाणे प्रत्यक्ष देवघेवही करावी लागते. रोखीच्या व्यवहारात धोकेही संभवतात. फसवणूक होते, दमदाटी होऊ शकते, शारीरिक इजा करून पैसे लांबवण्यापर्यंत मजल जाऊ शकते. कर्जाची मान्यता सहज मिळून गेली, तर प्रश्न नसतो पण अवैध मार्गानं, अपुरी कागदपत्रे असतांनाही कर्जमंजुरी करू पाहणारे आक्रमक होऊ शकतात. एका बाजूनं भेटवस्तूंची, आर्थिक लाभाची आमिषं दाखविणं आणि दुसऱ्या बाजूने कर्ज नाकारल्याची किंमत मोजावी लागणे ह्या दोन्ही टोकांपर्यंत माणसं जाऊ शकतात. काऊंटरवर येणाऱ्या ग्राहकांच्या नाना परी असतात. सहज आणि प्रांजळ संवाद करणारे असतात, तसेच अवास्तव मागण्या करणारे, अपमानास्पद बोलणारे, गर्दीमध्ये आपलं कामच सर्वात अगोदर व्हावे म्हणून आग्रही असणारे, चुका काढणार, दोष देणारे, नाहक तक्रार करणारे, असे सगळे प्रकार समोर येऊ शकतात. त्यातही, समोर केवळ महिला कर्मचारी आहेत, हे बघून, चेवात येणारेही महाभाग निघतात. महिलांना अज्ञानी ठरवणं, उगाचच घरगुती संदर्भ जागवणं, धमक्या देणं, दहशत माजवणं, राजकीय-पॉलिसी धागेदोरे सांगणं, नाहक पेट्रनायझिंग करणं म्हणजे पंखाखाली घ्यायला बघणं, ह्या प्रवृत्ती समाजात सर्व

काळात आहेत. भगिनी निवेदिता बँकेतल्या कर्मचारी महिलांना कधी ना कधी अशा गैर प्रवृत्तींशी सामना करावा लागतो.

काही लोक इथल्या महिलांना घाबरवण्याचा प्रयत्न करतात. पूर्वी एका शाखेमध्ये काही दिवस दररोज पत्रावळीवर भाताची मूद, तिच्यावर गुलाल-बुक्का, बाजूला पणती-दिवा वगैरे ठेवून ते 'अशुभचिन्ह' बँकेच्या दारासमोर ठेवलं जाई. बँकेचे सफाई कर्मचारी ते इतर कचऱ्यासमवेत उचलून टाकत. वसुलीसाठी घरी जाणाऱ्यांना धमकावणारे, अनिष्ट परिणामांची भीती दाखवणारे अधूनमधून निघतात. शिवाय एखाद्या व्यक्तीचा इरादा संशयास्पद वाटला तर बँकही आपल्या कर्मचाऱ्यांना संपूर्ण संरक्षण देते. निर्भयपणे काम करता येईल असं वातावरण द्यायला बँक सदैव तत्पर, सज्ज असते.

✻ आपल्या वारसांची नावं सारखी बदलत राहणारा एखादा ज्येष्ठ नागरिक सभासद, 'तुम्हीच चुकीचं नाव लिहिलयं. बायकांना यातलं काय कळणार?' वगैरे शेरेबाजी करतो.

✻ काऊंटरची वेळ अगदी संपत आल्यावर मोठा रोखीचा भरणा करायला येऊन मुद्दाम त्रास देणारा एखादा किरकोळ व्यापारी असतो.

✻ नकली नोटा भरायला येऊन त्या स्वीकारण्याबाबत दमदाटी करणारा एखादा ग्राहक असू शकतो.

✻ कर्जदार जे काही तारण ठेवेल त्याच्या किंमतीच्या विशिष्ट टक्क्यांपर्यंत कर्जमंजुरीचं बँकेचं धोरण असतांना आपण ठेवलेल्या तारणाचं मूल्य वाढवण्यासाठी भरीला घालणारे निघतात.

नवनवी तंत्रज्ञानं येतात, प्रणाली येतात, तेव्हा महिलांना त्याबद्दल कितपत माहिती असेल? अशी शंका घेणारे लोक सर्वकाळात असतात. बँक व्यवहाराचं संगणकीकरण झालं तेव्हा खरं तर बायकाचं काय पुरुषही त्याबद्दल चुकत-माकत-शिकत जाणारेच होते. तरीही काऊंटरमागच्या महिलेने जराही वेळ लावला की, 'आणा इकडे. मी दाखवतो पटकन करून.' असं

सहकार संस्कार

भारताच्या संस्कृती आणि इथल्या मातीशी जुळलेला सहकार आहे. या चळवळीसाठी ध्येयनिष्ठ कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम करून ही चळवळ समृद्ध केली आहे. सहकारातील अनेक आव्हाने आपल्याला मजबूत करण्यास मदतच करतात. – भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी

म्हणून शेखी मिरवणारे, महिलांना अपमानित करणारे महाभाग निघतातच. अशा काहीशा दूषित समाजमानसामुळे नाईलाजानं कर्मचारी महिलांना वारंवार स्वत:ला सिद्ध करण्याची वेळ येते. नवंनवं संगणकीकरण झालं तेव्हा काही कर्मचारी महिला बिचकल्या होत्याही. आपण हे तंत्र चांगल्यात चांगल्या प्रकारे वापरू शकू की नाही याबद्दल साशंक झाल्या होत्या. पण व्यवस्थापनाने त्यांना धीर दिला, विश्वासात घेतलं. जुन्यांचा अनुभव आणि नव्यांचं तंत्रज्ञानकौशल्य एकत्र येईल तेव्हाच कामं खरोखर अचूक आणि जलद होतील हे ओळखण्यात बँकेचं यश सामावलं होतं म्हणून तर ‘मॅन्युअल’ पासून ‘कॉम्प्युटरायझेशन’ पर्यंतचा बँकेचा प्रवास अगदीच सुरळीत पार पडला.

कोणत्याही बँकेसाठी कर्जवसुली करणं ही मोठी जबाबदारी असते. नियमित हप्ते भरून ऋणमुक्त होणारे ऋणको असतात तसेच कर्ज भरण्याची चालढकल करणारे, हेतुत: दिरंगाई करणारे, नादारीचं सोंग पांघरणारे किंवा कर्जफेड टाळण्यासाठी धाकदपटशापासून गुंडगिरीपर्यंत जाणारे महाभागही असतात. वसुलीसाठी कर्जदाराच्या घरी माणसं पाठवणं, जप्ती आणणं, त्यांच्या जंगम मालमत्तेचा लिलाव करणं असे मार्ग अशावेळी नाइलाजाने बँकांना चोखाळावे लागतात. साहजिकच वसुलीचं काम हे कोणाही व्यक्तीला अप्रिय आणि तणावाच वाटू शकतं.

भगिनी निवेदिता सहकारी बँक साहजिक हे कामही आपल्या महिला कर्मचाऱ्यांवर सोपवते. पण त्यांना संपूर्ण सुरक्षेची हमीही देते. अंतरानुसार त्यांची वाहनाची व्यवस्था केलेली असते. त्यांच्यापाशी मोबाईल फोन देण्याची व्यवस्थाही, मोबाईल फोन प्रचलित झाल्या झाल्या करण्यात आली. कारण वसुली कामासाठी ते कुठे गेले आहेत, कसे आहेत याचा माग ठेवणं ही बँकेचीच जबाबदारी असते. मोबाईल फोन नसण्याच्या काळामध्ये त्यांना बँकेची जागा सोडल्यापासून चार तासांनी जमेल तिथून फोनवरून संपर्क साधायला सांगितलं जाई. आता मोबाईलमुळे लवकर किंवा वारंवार संपर्क करणं शक्य होतं. ह्या फोनचा खर्च

सहकार संस्कार

आर्थिक सक्षमता येण्यासाठी सहकार चळवळ अत्यंत उपयुक्त असून यासाठी नागरी सहकारी बँकांची मोठ्या प्रमाणावर उभारणी करण्याची गरज आहे. आर्थिक सहकारी संस्था सक्षमीकरणासाठी मोलाचे कार्य करू शकतात.

– स्व. माधवराव तथा अण्णासाहेब गोडबोले

तर बँक करतेच पण वसुलीवर जाण्याच्या कामासाठी वेगळा भत्ताही मिळतो.

वसुलीसाठी अनोळखी ठिकाणी तर जावं लागतंच, पण अनेकदा त्या जागा असुरक्षितही असतात. समोरून कोणती प्रतिक्रिया येईल? याचा काहीही अंदाज नसतो. दुर्लक्ष करणं, रडारड करणं, शिवीगाळ करणं, अंगावर धावून येणं, धमक्या देणं यापैकी काहीही समोर येऊ शकतं. क्वचित कोणी आत्महत्येची धमकी देऊन भलताच ताण निर्माण करतं. पण अशा सगळ्या उद्रेकांना शांतपणे तोंड देऊन बँकेची बाजू मांडत राहावं लागतं. याबाबतीत काळानुसार झालेले बदलही लक्षात घ्यावे लागतात. वसुलीसाठी बँकेची माणसं घरी येणं म्हणजे आपल्या प्रतिष्ठेवर मोठा घाला पडणं, असं मानणारे ग्राहक काल-परवापर्यंत होते. आज अनेकांमध्ये याबाबतीत तितकीशी संवेदनशीलता राहिलेली नाहीये. प्रगती साधायची असेल तर कर्ज काढावीच लागणार. कर्जफेड थोडीफार मागे-पुढे होतच राहणार. कर्ज मिळण्याचे ‘सोपे वाटणारे’ इतर पर्याय लोकांना उपलब्ध आहेत. या पर्यायी संस्था ‘कागदपत्रांशिवाय कर्ज’, ‘तत्काळ कर्ज’, ‘वसुलीसाठी घरी येणार नसल्याची हमी ह्यासारखी अमिषं दाखवताहेत. उलट, जनतेच्या बाजूने, एकाचवेळी, तीनचार पुरवठादारांकडून कर्ज उचलणं, एकाचं कर्ज दुसऱ्या पुरवठादाराकडून परस्पर फेडून घेणं व आपण निवांत राहाणं, कर्जफेड टाळण्यासाठी थेट देशांतर करणं किंवा नादारी जाहीर करणं इथवर मजल मारण्याची प्रवृत्ती वाढत आहे. अशा सगळ्या बदलत्या चित्रामध्ये, छोटीछोटी कर्ज देणं आणि त्यासाठी बरंच व्यवस्थापकीय काम वाढवणं, ओढवून घेणं अनेक बँकांना कठीण वाटतंय म्हणून मोठी कर्ज घेणाऱ्यांकडे जास्त लक्ष द्यावं व छोटे कर्जदार थोडे दुर्लक्षित राहावेत, असं काही ठिकाणी घडू शकतं. पण भगिनी निवेदिता सहकारी बँक या भूमिकेने कधीच काम करत नाही. लहानात लहान कर्जदाराशीही तेवढ्याच आपुलकीनं वागणं आणि त्याच्या आर्थिक समस्या मिटवणं ही नैतिक जबाबदारी मानते. या समावेशक धोरणामुळे लहानात लहान कर्ज मागू इच्छिणारी माणसंही बँकेत जाणं पुढे ढकलावं, टाळावं असं वाटण्याऐवजी आपुलकीने विश्वासानं बँकेला भेट देतात आणि बँकेशी कायमचे जोडले जातात. या बँकेची कार्यसंस्कृती आवडते असे उद्गार काढतात. थकबाकीदारांना थेट गुन्हेगार ठरवण्यापेक्षा त्यांच्या समस्या समजून घेऊन त्यांच्याशी सल्लामसलत करून, हप्ते देण्याच्या शक्यता आजमावल्या जातात. अशी सामोपचाराची बोलणी इथल्या महिला फार चातुर्याने करतात. थकबाकीदारांच्या अडचणी खुबीने समजून घेतात. या बँकेचे गेली अनेक वर्षे शून्य टक्के असणारे नक्त अनुत्पादित कर्जाचे प्रमाण हे याचेच द्योतक आहे.

'टीम भगिनी'ने केली संकटांवर मात

वैयक्तिक पातळीवर येणारे विविध अनुभव तर असतातच पण गेल्या काही वर्षांत असे काही प्रसंग आले, जेव्हा सेवकांच्या आणि व्यवस्थापनाच्या टीम स्पिरीटचा कस लागला. त्यातील काही न विसरता येण्यासारखे प्रसंग :

नोटाबंदी :

काळाच्या ओघात अशी आव्हानं येतच असतात. जेव्हा अवचितपणे नोटबंदी जाहीर झाली तेव्हा सगळ्याच बँकांसमोर तणावाची परिस्थिती उभी राहिली. लोक रांगा लावूनलावून जुन्या नोटा जमा करू लागले. नव्याने पैसे काढू लागले. प्रत्येकाला विलक्षण घाई असे. याउलट किती पैसे एका ग्राहकानं एकावेळी जमा करायचे किंवा त्याला बँकेने किती द्यायचे याबाबत रिझर्व्ह बँकेचे आदेश होते. त्यातले काही आदेश ज्या ग्राहकांना खटकायचे, ते वाद घालत बसायचे, आपली उगाचच काही अडवणूक केली जात्येय असं त्यांना वाटायचं. परंतु ही परिस्थिती देखील बँकेने यशस्वीपणे हाताळली.

कोरोना काळ :

कोरोना काळानेही बँक कर्मचाऱ्यांसमोर मोठी आव्हानं ठेवली. बँकसेवेची गरज तर सर्वांना होतीच. पण बँक कर्मचाऱ्यांनाही स्वत:चे जीव प्यारे होते. माणुसकी टिकवायची होती पण कोणी कितीही जीवनमरणाच्या संकटात असला तरी त्याच्यासाठी आपला जीव धोक्यात घालणं, कदाचित संसर्ग ओढवून घेणं, अशक्य नव्हतं. अशा परिस्थितीत बँकेनं रोज फक्त ५०% स्टाफनं बँकेत उपस्थित राहून कामकाज सुरू ठेवावं असा आदेश काढला. ही ५० टक्क्यांची उपस्थिती सर्व महिला कर्मचाऱ्यांनी परस्परसोयीने नोंदवली. प्रसंगी संसर्ग होण्याचा धोका पत्करूनही ग्राहकसेवेत कोणतीही त्रुटी ठेवली नाही. कर्जांचे हप्ते भरणं ज्यांना कठीण वाटलं त्यांच्याशी चर्चा करून, त्यांच्या हप्त्यांची फेररचना-री-शेड्यूलिंग करून दिलं.

कोरोनाच्या त्या काळात अनेकदा बंदिवासाला कंटाळलेली माणसं उगाचच बँकेत गर्दी करत. पण नव्यानं कर्ज घेण्याच्या मन:स्थितीत कोणीच नसे. कर्जांना उठाव नाही, कोणतीही शाखा व्यावसायिक उद्दिष्ट गाठू शकत नाही, अशा परिस्थितीत संपूर्ण

बँक व्यवहारावर मंदीचं सावट होतं. बाहेरही सर्वदूर कोरोनाप्रणीत मंदी होती, अशा अतंर्बाह्य ताणाच्या परिस्थितीतही भगिनी निवेदिता बँकेने आपल्या 'अत्यावश्यक सेवे'मधल्या जबाबदाऱ्या तर पेलल्याच. पण त्याव्यतिरिक्त, विपरीत परिस्थितीतही आपल्या काही ग्राहकांमध्ये नवे, छोटे उद्योग सुरू करण्याच्या कल्पना रुजवल्या. थोडे लोकतरी संकटाला संधी समजून पुढे सरसावले ते बँकेतल्या काही कर्मचाऱ्यांच्या सल्ला मार्गदर्शन यावर आणि मुख्यत्वे बँकेच्या भरवशाच्या पाठबळावर. असाच आणखीन एक कसोटीचा प्रसंग ओढवला २०१९ च्या पावसाळ्यात.

सहकारनगर पूरस्थिती :

२५ सप्टेंबर २०१९ च्या रात्री १०-११ वाजता मुसळधार पावसात कात्रज येथील कालव्याची भिंत कोसळली आणि कालव्याच्या आजूबाजूस असलेल्या सातारा रोड, अरण्येश्वर, सहकारनगर या भागात पाण्याचे लोट वाहायला लागले. तळमजल्यावर असणाऱ्या हौसिंग सोसायट्यांच्या पार्किंगमध्ये पाणी जमा होऊन वाहने पाण्याखाली गेली. त्याचवेळी कम्पाऊंडची भिंत तोडून बँकेच्या सहकारनगर शाखेत पाण्याचा

पूरस्थितीने उभी केलेली आव्हाने!

लोंढा घुसला. ड्यूटीवर असलेल्या वर्करने शाखेच्या मॅनेजर रेवती मुळे यांना फोन करून आल्या प्रसंगाची कल्पना दिली. त्यावेळी सदर वर्कर कमरेपर्यंत पाण्यात उभा होता, रेवती मुळे यांनी जनरल मॅनेजर मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शाखेच्या अन्य कर्मचारी यांना कळवले. दोघेही मॅनेजर व स्टाफ त्वरित शाखेकडे धावले. परंतु, शाखेच्या आजूबाजूचा अर्धा किलोमीटरचा परिसर पूर्ण पाण्याखाली गेलेला होता. शाखेपर्यंत पोहोचणे शक्य नव्हते. पहाटे शाखेतील सिक्युरिटी अलार्म वाजायला लागल्याने ३ वाजता सर्वजण परत बँकेत जमा झाले. त्यावेळपर्यंत काहीसे पाणी ओसरल्याने बँकेत प्रवेश केला असता, जवळजवळ ४/५ इंचांचा चिखलाचा थर जमा झाला होता. २ ते २।। फूट पाणी आल्याचे पाण्याच्या ओलाव्यावरून समजून येत होते. सर्व सीपीयू, यूपीएस बॅटरीज पाण्याखाली गेले होते. इलेक्ट्रिक व डेटा केबल पाण्यात होते. शाखेतील फ्रीज जागेवरून उचलला जाऊन आडवा झाला होता. शाखेसमोरच्या रस्त्यावर जवळच्या गवळी वाड्यातील गुरे मरून पडली होती. अत्यंत भयावह मनाला खचवणारे चित्र होते. उद्या शाखा कशी सुरू करणार हे मोठे प्रश्नचिन्ह होते.

भल्या सकाळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रत्यक्ष येऊन सर्वांना धीर दिला आणि यातून पुन्हा कसे उभे रहायचे याचे मार्गदर्शन केले. टीम भगिनी जोमाने कामाला लागली. कोणी गाळ काढत होते, कोणी डेस्कटॉप हलवत होते, कोणी भिजलेल्या रेकॉर्डची काळजी घेत होते. आयटी विभागाने कॉम्प्युटर ताब्यात घेतले. बँकेचे व्हेंडॉर हजर होऊन इलेक्ट्रीकचे काम सुरू केले तर स्टाफने आपापल्या घरून इस्त्री, हेअर ड्रायर, हॅलोजन लॅम्प आणून कागदपत्रे वाळवण्याचे काम सुरू केले. झालेल्या नुकसानीचे स्वरूप खूपच भयानक होते. त्यामुळे मुख्य कचेरी व इतर शाखातील सर्व सेवक वर्ग मदतीला सरसावला. एवढेच नव्हे तर बँकेचे खातेदार, माजी सेवकवर्ग आपापली वाहने घेऊन मदतीला सरसावले. रेकॉर्ड वाळवण्यासाठी इतर शाखांमध्ये नेण्यास मोलाची मदत केली. बँक या सर्वांची ऋणी आहे. तत्कालिन

सहकार संस्कार

राष्ट्राच्या पुनर्निर्माणाची लढाई मोठी आहे. एकीकडे भांडवलशाही आणि दुसरीकडे साम्यवाद आहे. हे दोन्ही अयशस्वी झाले आहेत. भारताची यशस्वीता फक्त सहकार चळवळीतच आहे. सहकाराचा पाया मजबूत करण्यासाठी सुसंस्कारांची आवश्यकता आहे. - दत्तोपंत ठेंगडी

अध्यक्षा, उपाध्यक्षा आणि संचालक मंडळाने सर्व सेवकांना धीर दिला.

सुदैवाने दुसरा दिवस रविवारचा होता. सोमवारी बँकेत व्यवहार कसा होणार या काळजीत ग्राहकवर्ग होता. पण त्वरित आवश्यक किमान उभारणी करून शाखा पुन्हा दिमाखात कामाला लागली. साधनसामग्री कमी होती पण इतर शाखांनी मदत करून ही कमी भरून काढली. इतर शाखांनी खातेदारांव्यतिरिक्तची इतर अंतर्गत कामे करून आयटी विभागाने अर्ध वर्ष अखेरीची कामे करून हातभार लावला. सहकारातील सहकार्य दाखवून दिले. या कठीण प्रसंगातही बँकेने खातेदारांचे कोणत्याही प्रकारे नुकसान अथवा खोळंबा होणार नाही याची पूर्ण काळजी घेतली.

अजूनही अनेकदा सहकारनगर परिसरात या घटनेची चर्चा होत असते. बँकेतल्या एकजुटीचं सर्वत्र कौतुक होत असते.

सारांश म्हणजे नोटबंदीसारखं व्यवस्थापकीय आव्हान असो, कोरोनासारखं वैश्विक संकट असो किंवा पूरसदृश स्थिती असो भगिनी निवेदिता सहकारी बँकेच्या महिला कर्मचारी त्यांना तोंड द्यायला सदैव सिद्ध असतात. अशी संकट आल्यावर हातपाय न गाळता, अशा संकटाने हतबल होणाऱ्या सर्वसाधारण ग्राहकांना बळ देण्याचं काम त्या करतात. 'तुम्ही होतात म्हणून आम्ही तो काळ निभावू शकलो' असे अभिप्राय येतात ते त्यातूनच.

प्रत्येक आस्थापनेची एकेक संस्कृती काळाच्या ओघामध्ये आकार घेत असते. 'भगिनी निवेदिता बँकेची संस्कृती' हा तर अनेकदा गौरवला गेलेला विषय आहे. इतर बँकांनी त्या संस्कृतीचं अनुकरण करावं इतकं तिचं मोल मानलं गेलंय. हे ऐकतांना साहजिकच प्रश्न पडतो, भगिनी निवेदिता बँकेची अशी खास संस्कृती आहे तरी कोणती? काही छोट्या छोट्या गोष्टी इथे केल्या जातात. जसे -

१) भगिनी निवेदिता बँकेत ग्राहकांचे अर्ज, फॉर्म्स वगैरे भरणं गरजेनुसार काऊण्टरवरचे लोक करून देतात. एवढी ग्राहकसेवा द्यायला हवीच असं मानतात.

२) एखाद्या मोठ्या व्यवहाराचा प्रस्ताव आला आणि काऊंटरवरच्या भगिनीच्या कक्षेच्या बाहेरचं ते काम असलं तरी त्या कामाला काऊंटरवरून नाकारलं जात नाही. 'होणार नाही', 'जमणार नाही', 'शक्य नाही' या प्रकारच्या नकारघंटा वाजवल्या जात नाहीत. त्यांनी फक्त योग्य त्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे त्या ग्राहकाला नेणं अपेक्षित असतं.

३) वरच्या मजल्यावर बँकेची शाखा असते तेव्हा ज्येष्ठ नागरिक खातेदारांसाठी बँकेच्या सेविका खाली येऊन जरूर तो व्यवहार करून देतात. त्यांना पायऱ्या चढायला भाग पाडलं जात नाही.

४) एखादा ग्राहक वार्धक्यामुळे, व्याधींमुळे घराबाहेर पडू शकत नसेल तेव्हा बँक कर्मचारी त्यांच्या सोयीने त्यांच्या घरी

जाऊन त्याचं बँकेसंबंधी कामं पूर्ण करतात. यासाठी वेगळं शुल्कही घेत नसतात.

५) नवशिक्या खातेदाराला रिकरिंग खातं काढणं, फिक्स्ड डिपॉझिट ठेवणं, यांसारखे हितकारी सल्ले या बँकेत आपुलकीने दिले जातात.

या सर्व सूत्रांमधील प्रधान सूत्र आहे, ते चोख ग्राहकसेवेचं. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी उद्योजकाच्या किंवा उद्योगाच्या संदर्भात ग्राहकाचं महत्त्व अधोरेखित करतांना नमूद केलेली तत्त्वं पाळून बँक अशाच पद्धतीने सदैव काम करण्याचा प्रयत्न करते.

ग्राहक आपल्यावर अवलंबून नसतात. आपण त्यांच्यावर अवलंबून असतो.

ग्राहक आपल्या कामातला अडथळा नसतात. ते आपल्या कामाचं कारण असतात.

ग्राहक आपल्या व्यवसायाला परके, तिऱ्हाईत नसतात. उलट ते व्यवसायाचा महत्त्वाचा घटक असतात.

त्यांची सेवा करून आपण त्यांच्यावर उपकार करत नसतो. सेवेची संधी देऊन ते आपल्याला उपकृत करतात.

बँकेने आतापर्यंत आपला चोख ग्राहक सेवेचा दावा स्वत:च पडताळून पाहिला आहे. तिऱ्हाईताच्या चिकित्सक नजरेमध्ये आपण कोणत्या गुणवत्तेचे ठरतो हे पाहणं अनेकदा आत्मशोधाला चालना देतं. या दृष्टीने आतापर्यंत दोन वेळा बाहेरच्या परीक्षणमंडळाकडून बँकेने आपल्या ग्राहकसेवेचं मूल्यमापन करून घेतले आहे. ही संस्था, पूर्वकल्पना न देता, काही ग्राहकांशी संपर्क साधते. बँकेच्या सेवांविषयींची त्यांची मते आजमावते. बँकेच्या कर्मचाऱ्यांकडून प्रतिसाद घेते आणि आपला अहवाल सादर करते. अशा दोन्ही प्रयत्नांमध्ये बँकेच्या सेवांबाबतचं ग्राहकांचं समाधान या परीक्षण मंडळाने नोंदवलेलं आहे. सेवेच्या गुणवत्तेबाबत बँक 'कमी पडते' असे यांना आढळलेलं नाही. अर्थातच या अभिप्रायाने आनंद वाटला असला, तरी आत्मसंतुष्ट राहाणं, बँकेच्या संचालिकांना पसंत नाही. आपण अधिक चांगलं काम कसं करू शकू? आपल्या सेवांमध्ये अधिक सुधारणा, नेमकेपणा कसा आणता येईल?

सहकार संस्कार

किती सहकारी संस्था नोंदवल्या, यापेक्षा किती संस्थांनी नैतिक काम केले या गोष्टीला अनन्यसाधारण महत्व आहे.

– महात्मा गांधी

यावर संचालक मंडळ आणि व्यवस्थापन सतत विचारमंथन करत असतात. यातून काही वेळा कामाचे नवनवे पायंडे पडतात. याव्यतिरिक्त बँकेने राबविलेल्या अनेक अनुकरणीय पद्धतींची ('प्रोफेशनल प्रॅक्टिसेस') माहिती अनेकदा बाहेरच्या संस्था आवर्जून मागतात. त्यांच्यावर चर्चा करतात. अनेक शोधनिबंधांमध्ये, चर्चासत्रांमध्ये बँकेच्या कार्यपद्धतीचा आवर्जून उल्लेख केला जातो. अशा काही चर्चासत्रांमध्ये बँकेच्या संचालिकांना मानाने बोलावले जाते. अलीकडचा एखादा आंतरराष्ट्रीय चर्चासत्रातील सहभाग सांगायचा तर...

रिझर्व्ह बँकेच्या कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चरल बँकिंग तर्फे डिसेंबर २०२१ मध्ये झालेल्या Strengthening Primary (Urban) Co-Operative Banks through a Differentiated Business Model या विषयावरील आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात तत्कालिन उपाध्यक्षा सीए डॉ. रेवती पैठणकर यांनी भगिनी निवेदिता बँकेच्या व्यवसायाचे मॉडेल 'Basics First' नावाने सादर केले. त्याला पुढे त्या संस्थेच्या मासिकातही प्रसिद्धी देण्यात आली. या चर्चासत्राला भारत, युरोप आणि आशिया मधील अनेक देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता देशपांडे यांनी डिसेंबर २०२१ मध्ये असाच एका चर्चासत्रावर प्रभाव पाडला होता. वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्थांतर्फे Interaction with senior officers of Ministry of Co-operation, Govt, of India राष्ट्रव्यापी चर्चासत्र घेतलं

सभासद / खातेदारांसाठी सायबर सिक्युरिटी संदर्भातील प्रशिक्षण

होतं. त्यामध्ये Role of Women in Bank Management and challenges before UCBs या विषयांवर स्मिता देशपांडे यांनी सादरीकरण केले. त्यांच्यासोबत अनेक नामवंत बँकांच्या प्रतिनिधींचा सहभाग होता.

मार्च २०२२ मध्ये National Council For Co-operative Training (NCCT) या संस्थेने राष्ट्रीय पातळीवर एक 'वेबिनार' आयोजित केला होता. त्यात भगिनी निवेदिता बँकेच्या तत्कालिन अध्यक्षा जयश्री कुरूंदवाडकर यांनी Building Capacities of Women Co-operatives to address sustainability या विषयावर मतप्रदर्शन केलं.

बँकेच्या कार्याची दखल :

महिलांनी सर्वांसाठी चालवलेली बँक म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या भगिनी निवेदिता बँकेची सतत होणारी प्रगती बघून अनेकांनी या बँकेच्या कार्यपद्धतीचा आतापर्यंत अभ्यास केला आहे. या बँकेच्या संचालिकाही विविध व्यासपीठावरून बँकेची कार्यपद्धती आणि भूमिका यांची माहिती देत असतात.

त्यापैकी काहींचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

बँकेवरील संशोधनास पी.एच.डी. :

'सहकारी बँकांचा महिला आर्थिक सक्षमीकरणातील सहभाग' - विशेष संदर्भ 'भगिनी निवेदिता सहकारी बँक मर्यादित पुणे'या विषयावरील बँकेच्या संचालिका सीए रेवती पैठणकर यांनी सावित्री बाई फुले पुणे विद्यापीठाला सादर केलेल्या प्रबंधाला विद्यापीठाकडून सन २०२१ मध्ये पी.एच.डी प्रदान करण्यात आली. यासाठी बँकेच्या एकूण ५००च्या वर महिला सभासद आणि खातेदारांकडून प्रत्यक्ष भेटून प्रश्नावली च्या माध्यमातून माहिती गोळा करण्यात आली, तसेच इतर सहकारी बँकांच्या अहवालांचा व संकेत स्थळांवरील माहितीचा अभ्यास करण्यात आला. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होण्यासाठी त्यांचा कौटुंबिक, सामाजिक आणि व्यावसायिक पातळीवर निर्णय प्रक्रियेतील सहभाग आवश्यक आहे. सहकारी बँका समावेशक (inclusive) बँकिंग आणि अर्थसाक्षरता प्रसार या माध्यमातून महिला आर्थिक सक्षमीकरणास हातभार लावतात का यासंबंधी हा अभ्यास करण्यात आला.

सभासद / खातेदारांसाठी आयकर संदर्भातील प्रशिक्षण

भगिनी निवेदिता बँकेच्या महिला खातेदारांनी दिलेल्या माहितीनुसार बँकेसंबंधी पुढील निरीक्षणे नोंदविण्यात आली.

भगिनी निवेदिता बँक समावेशक किंवा inclusive बँकिंग करते म्हणजेच फक्त जास्तीत जास्त महिलांना बँकेत खाते काढायला उद्युक्त करते असे नाही तर त्या खात्यांवर खातेदाराने स्वतः नियमित व्यवहार करण्याचे महत्त्व त्यांना समजावून सांगते. महिला खातेदारांना त्यांच्या सोयीच्या, त्यांच्या गरजा पूर्ण करणाऱ्या, किफायतशीर व्याज दरातील बचत योजना तसेच कर्जाच्या विविध योजनांची योग्य माहिती देणे, या योजनांची गरजेप्रमाणे निवड करायला मदत करणे, त्याबरोबर खात्यावरील रकमा खातेदारांच्या आवश्यकतेनुसार कमीत कमी वेळेत इतरत्र पाठविण्याची सोय उपलब्ध करून देणे आणि विमा विषयक जागरूकता निर्माण करणे हे सर्व करीत असते.

बँकेच्या ग्राहकांनी अर्थसाक्षर व्हावे यासाठी सजगपणे आणि जागरूकपणे बँक व्यवहार कसे करायला हवेत याविषयी भगिनी निवेदिता सहकारी बँक वेळोवेळी आपल्या खातेदारांना माहिती देत असते. कर्जाच्या आणि बचत खात्यांच्या कागदपत्रांवर नुसत्या सह्या करणे म्हणजे समावेशक बँकिंग करणे किंवा अर्थ साक्षर करणे असे नसून योग्य दराच्या कर्ज आणि बचतीच्या योजनांची निवड, त्यांचा स्वतःच्या गरजेप्रमाणे/ इच्छेनुसार योग्य वापर ह्याचे महत्त्व आपल्या खातेदारांना समजावून सांगते. त्यामुळेच बचतीच्या माध्यमातून पैसे साठवून किंवा गरजेनुसार कर्ज घेऊन घरबांधणी/दुरुस्ती, मुलांचे शिक्षण, त्यांची लग्न, थोडी फार हौस मौज, तसेच आजारपणासाठी किंवा भविष्याची तरतूद करण्यासाठी या बँकेच्या खातेदार आपले निर्णय स्वतः प्रत्यक्षात आणू शकतात ज्यामुळे त्यांच्या निर्णय क्षमतेत, आत्मविश्वासात आणि सामाजिक दर्जात वाढ होते. एकूणात महिला आर्थिक सक्षमीकरणास भगिनी निवेदिता व सर्व सहकारी बँका योगदान देतात.

कोलंबिया विद्यापीठाने आपल्या School of International and Public Affairs = 'SIPA' च्या विद्यमाने Inclusive Banking by Women for all ह्या विषयाचा परामर्श घेतांना भगिनी निवेदिता बँकेच्या कामकाजाचा विशेष अभ्यास केला. त्यामध्ये त्यांनी बँकेच्या भूमिकेचा विशेष गौरव केला.

'जनतेच्या पैशाचे आपण मालक नसून केवळ विश्वस्त आहोत' असे मानण्याबाबत, वागण्याबाबत गांधीजी आग्रही होते. तीच विचारधारा या बँकेने उचलून धरली आहे. तसेच मोठ्या उद्योगांप्रमाणे 'कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी' म्हणजेच 'व्यावसायिक-सामाजिक जबाबदारी' बँकेने घेतली असा अभिप्राय दिला.

आपल्या नावातले 'भगिनी' आणि 'सहकारी' हे दोन शब्द बँकेने नेहमी शिरोधार्य मानले आहेत. भगिनी म्हणजे बहीण, वयाने लहान असो अगर मोठी, नित्य सहवासातली असो अगर क्वचित भेटणारी, समांतर परिस्थितीतली असो किंवा विपरीत अवस्थेतली, तिच्याविषयी एक वेगळाच जिव्हाळा, आत्मीयता मनात असते. तिच्याशी आपली सुखदु:खं वाटून घेतली जातात. सल्ला किंवा मदत हक्काने मागितली जाते आणि दिली जाते. सगळं जगही काही कारणाने विरोधात गेलं तरी आपली बहीण आपला हात सोडणार नाही, असा विश्वास असतो. नेमक्या याच भावना, जिव्हाळा, आत्मीयता, हक्क, विश्वास आपल्या ग्राहकांच्या मनात निर्माण करण्याची बँकेची संस्कृती आहे. अशा शब्दांनी मंडित घोषवाक्यं बँकेनं निर्माण केलेली नाहीत. पण प्रवास त्याच दिशेने सुरू आहे. ग्राहकांचे सर्व आर्थिक प्रश्न, शंका, विकल्प इथे आल्यावर मिटावेत आणि भविष्याविषयी आशा जागृत व्हाव्यात हीच भूमिका आहे. हे झालं भगिनीभावाविषयी. तसंच सहकाराचं सूत्रही आहे. सहकारामध्ये लोकशाही तत्त्व आहे, ऐच्छिक सहभागाचं स्वातंत्र्य आहे, परस्परांचे हितसंबंध जपणे आहे, उद्धाराची आकांक्षा आहे आणि समूहाचं हितही साधायचं आहे. केवळ एखाद्या व्यक्तीचा किंवा समूहाचा विकास होऊन इतरांची कुचंबणा होणं तिथे मान्य नसतं. त्याचप्रमाणं कोणत्या किंमती मोजून कुठंवर विकास साधायचा याचं तारतम्यही बाळगलेलं असतं. ग्राहकभगिनी असोत किंवा बंधू, त्यांना आर्थिक बळ देऊन विकासाकडं नेणं हे बँकेचं उद्दिष्ट होतं, आहे आणि राहील. काळाच्या ओघात नियम बदलतात, परिस्थिती बदलते पण उद्दिष्ट हे सार्वकालिक असतं. ध्रुवासारखं ते अढळपणे डोळ्यासमोर धरलं की मग परिस्थितीतून मार्ग काढता येतो. हेच बँकेची अर्धशतकी वाटचाल सांगत आलेली आहे.

दाढे दांम्पत्याच्या नावाचा सर्वतोपरी आदर बाळगून असं म्हणता येईल की, ''भगिनी निवेदिता सहकारी बँक ही त्यांच्या प्रेरणेतून, भक्कम पायावर उभी आहे. पण त्यांनी प्रमाण मानलेली तत्त्वं, बाणवलेली मूल्यं उणीपुरी पाच दशकं तेवढ्याच निष्ठेने पाळणाऱ्या, शिरोधार्य मानणाऱ्या तळमळीच्या सेवाभावी महिला कार्यकर्त्यांची बँक, ही तिची आजची खरी ओळख ठरेल.''

❖❖❖

वेध भविष्याचा

तेव्हा आणि आता :

बघता बघता बँकेचं ५० वं वर्ष आलंही!

५० वर्षं हा कालावधी व्यक्तीच्या जीवनात जेवढा मोठा असतो तेवढा संस्थेच्या जीवनात नक्कीच नसतो. तरीही अर्धशतकी वाटचाल हा टप्पा, सिंहावलोकन करण्याचं उत्तम निमित्त ठरू शकतो. यशाने हुरळून गेलं नाही तरी त्याचा आनंद साजरा करण्याचं आणि अपयशाने खचून गेलं नाही तरी आत्मचिंतन करण्याचं बळ देऊ शकतो. त्यातूनच एकेक 'मैलाचे दगड' स्मरणसाखळीसोबत खुणावू लागतात. जसे की,

- ✼ स्थापनेनंतर अवघ्या ३ वर्षांच्या कालावधीत लाभांश वाटण्याच्या स्थितीपर्यंत बँक आली. म्हणूनच १९७८-७९ या वर्षी पहिला लाभांश ९% दराने जाहीर केला.
- ✼ डिसेंबर १९९७ मध्ये बँकेने रु. १०० कोटी रुपयांचं ठेवींचं उद्दिष्ट पूर्ण केलं.
- ✼ २०११-१२ मध्ये ठेवींचा रु. ५०० कोटींचा टप्पा आणि २०२१-२०२२ मध्ये ठेवींचा रु. ९०० कोटींचा टप्पा बँकेने ओलांडला. २०२२-२३ या वर्षामध्ये रु. १ हजार कोटींच्या ठेवी दृष्टीपथात आहेत.

आजवरच्या कामगिरीमध्ये बँकेस फेडरेशन, असोसिएशन, NAFCUB इत्यादी संस्थांकडून अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. परंतु, महाराष्ट्र शासनाने केलेले तीन गौरव बँकेला आवर्जून सांगावेसे वाटतात. कारण ते राज्यशासनाने दिले आहेत आणि नाना निकषांवर तावूनसुलाखून काढल्यावरच मिळालेले आहेत.

हे पुरस्कार म्हणजे, आंतरराष्ट्रीय सहकार शताब्दीनिमित्त सुरू झालेले पुरस्कार.

- ✼ २०१२ साली सुरू करण्यात आलेला पहिला 'सहकारनिष्ठ' पुरस्कार
- ✼ २०१४ ला 'सहकारभूषण' पुरस्कार
- ✼ २०१८ ला दुसऱ्यांदा 'सहकारनिष्ठ' पुरस्कार

हे पुरस्कार देतांना शासन बँकांची अनेक निकषांवर पाहणी करत असते. उदा. बँकेचे आर्थिक व्यवहार, नेटवर्थ, सी.डी.रेशो, ढोबळ अनुत्पादित कर्जे, ॲव्हरेज कॉस्ट ऑफ फंडस् इ. आर्थिक निकषांची पूर्तता नियमानुसार होते, हे बघते. कर्ज समिती, गुंतवणूक समिती, ऑडिट समिती, संचालक मंडळाच्या सभा यांच्या कामकाजाची माहिती घेतली जाते. CBS, ATMs, RTGS, NEFT, IFSC, SMS Alerts, DR site, Data Center यांसारख्या सुविधा अद्ययावत् व परिपूर्ण असल्याची खातरजमा केली जाते. बँकेतल्या नेमणुका नियमानुसार होतात ना? हे बघितले जाते. बँकेतलं समाजाभिमुख कामकाज कसं-कुठवर होतंय, एकूण बँकेमुळे सहकारी चळवळीला कसा हातभार लागतोय हेही तपासले जाते. सभासद प्रशिक्षण, जनहितकारी योजना, विविध सामाजिक प्रयोजनांसाठी निधी उभारणं या बाबतीतही बँकेचं समाधानकारक योगदान असल्याची खात्री करून घेतली जाते.

- Net NPA कमीत कमी राखण्याबद्दल किंवा ०% एवढा ठेवण्याबद्दल बँकेला अनेकदा गौरवलं गेलं. एकूणच कमीत कमी NPA ठेवण्याची परंपरा बँकेने जोपासली आहे.

बँकेच्या संचालिका :

- गेली अनेक वर्षं विविध क्षेत्रातील अनुभवी व तज्ज्ञ संचालिका इथे आहेत.
- महिला उद्योजिकांच्या अनेक राष्ट्रीय परिषदांमध्ये भगिनी निवेदिता बँकेच्या प्रतिनिधींना मार्गदर्शन करण्यासाठी बोलावले जाते आणि उद्योजिकांना सक्रीय सहकार्य केल्याबद्दल गौरवले जाते.
- सहकार चळवळीच्या अनेक महत्त्वाच्या टप्प्यांवर भगिनी निवेदिता बँकेच्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख होतो.
- बँकेच्या अनेक माजी-आजी संचालिकांचा विविध व्यासपीठांवर विविध निमित्ताने गौरव झालेला आहे, होत असतो.

महाराष्ट्र शासनाचा 'सहकार भूषण' पुरस्कार - सन २०१४

यामध्ये प्रामुख्याने २००९ मध्ये सहकार क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशन लिमिटेड मुंबईतर्फे पहिला श्रीमती सुशिलादेवी देशमुख स्मृती महिला पुरस्कार कै. मीनाक्षी दाढे यांना मिळाला.

२०१४ मध्ये सहकार क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशन लिमिटेड मुंबईतर्फे श्रीमती सुशिलादेवी देशमुख स्मृती महिला पुरस्कार सुमित्रा गोवईकर यांना मिळाला.

पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लिमिटेड पुणे तर्फे जीवन गौरव पुरस्कार कै. शीला काळे यांना सन २०१८-१९ मध्ये मिळाला.

तसेच पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशन व महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक फेडरेशन तसेच नॅफकब या संस्थांमध्ये बँकेच्या संचालिकांनी प्रतिनिधित्व केले आहे.

अशा प्रकारे चहू अंगांनी चिकित्सक पाहणी केल्यानंतर मिळालेले हे पुरस्कार बँकेला मौलिक वाटावेत यात आश्चर्य नाही.

बँकेचा समाधानी ग्राहक वर्ग :

बँकेने आणि बँकेच्या संचालिकांनी आजवर अनेक पुरस्कार मिळविले असले तरी कोणत्या बँकेचा खरा पुरस्कार असतो तो तिचे समाधानी आणि वाढत्या संख्येचे ग्राहक, हाच.

बँकेबरोबर वर्षानुवर्ष आर्थिक व्यवहार करणाऱ्या आणि वेगवेगळ्या क्षेत्रातील कार्यरत असणाऱ्या काही प्रातिनिधिक खातेदारांचा उल्लेख इथे उचित ठरेल. बँकेवर विश्वास टाकणं आणि बँकेला व्यवसाय देणं हे त्यांचं योगदान आहे, बँकेनेही त्यांना वेळोवेळी उत्कृष्ठ बँकिंग सेवा देऊन सर्वतोपरी साहाय्य केलेलं आहे.

दुसऱ्यांदा मिळालेला महाराष्ट्र शासनाचा 'सहकारनिष्ठ' पुरस्कार - सन २०१८

कल्पना ड्रेसेस :

कल्पना ड्रेसेसचे मालक कै. आर. डी. कुलकर्णी यांनी बँकेच्या स्थापनेच्या पहिल्या दिवसापासून बँकेत पहिले व्यवसायाचे चालू खाते उघडले. त्यांची तिसरी पिढी आज बँकेबरोबर व्यवसाय करीत आहे. जुन्या नव्या पिढीबरोबर काम करताना, बँकेची ग्राहक सेवा ही पन्नास वर्षांपासून अतिशय चांगली असल्याचे श्री. शशांक कुलकर्णी आवर्जून सांगतात. बँकेच्या पन्नास वर्षाच्या वाटचालीत त्यांचा मोलाचा वाटा आहे.

डेली प्रभात व पूना डेली न्युज लि :

गांधी कुटुंबियांच्या दैनिक प्रभात समूहाचे बँकेत २००१ पासून व्यवसायाचे खाते आहे, तसेच कुटुंबातील सदस्यपण बँकेचे खातेदार आहेत. दैनिक प्रभात वाचक विश्वासाची परंपरा व निष्पक्ष पत्रकारितेच्या शतकी वाटचालीचा प्रवास करत आहे. बँकेने दैनिक प्रभात समुहाच्या वाटचालीत वेळोवेळी गरजेनुसार आर्थिक पाठबळ उभे करून दिले. त्यामुळे दैनिक प्रभातच्या शतकी वाटचालीत बँकेचा मोठा वाटा आहे. हे दैनिक प्रभातचे व्यवस्थापकिय संचालक आनंद गांधी आवर्जुन सांगतात. तसेच हे पाठबळ उभे करून देताना बँकेने आमचे व्यवहार व कामगिरीवर दाखविलेला विश्वास, हा आमचा आत्मविश्वास वाढविणारा होता असेही ते सांगतात. हा ऋणानुबंध यापुढेही असाच सुरु राहील, अशी आशा आहे.

बालोद्यान प्रेस :

पुरुषोत्तम सच्चिदानंद सहस्रबुद्धे बँकेचे ३४ वर्षांपासूनचे खातेदार आहेत. श्री सहस्रबुध्दे यांचा मॉडर्न प्रिंटिंग सर्व्हिसेस, बालोद्यान प्रेस या नावाने व्यवसाय आहे.

सहकार संस्कार



आपल्या देशात समाजरचना स्थापन करणे, हे आपले सुस्पष्ट आणि अंतिम ध्येय.....आणि हे ध्येय गाठण्यासाठी सहकार चळवळीला फार महत्त्वाची कामगिरी बजावावयची आहे. – लालबहादूर शास्त्री

बँकेच्या अर्थसहाय्यानं श्री. सहस्रबुद्धे यांनी व्यवसायासाठी लागणाऱ्या प्रिंटिंगच्या व इतर अनेक अद्ययावत मशिनरी खरेदी केल्या आहेत आणि व्यवसायात उत्तम प्रगती साधली आहे. तसेच त्यांची पुढची पिढीसुद्धा बँकेबरोबर व्यवहार करीत आहे. बँकेच्या वाटचालीत त्यांचा मोलाचा वाटा आहे.

वसंत सिनेमा :

गेल्या २५ वर्षांपासून वसंत सिनेमा या नावाने व्यवसायाचे खाते आहे. पार्टनर विलास टापरे व कै. मोहन टापरे यांनी बँकेने वेळोवेळी केलेल्या अर्थसहाय्यामुळे त्यांच्या व्यवसायात अपेक्षित वृद्धी करता आली, असे ते आवर्जून सांगतात.

सनी ट्रॅव्हल्स :

श्री. प्रदिप रामचंद्र चोरगे गेल्या २७ वर्षांपासून बँकेचे खातेदार आहेत. श्री चोरगे यांचा ट्रॅव्हल्सचा व्यवसाय आहे. श्री. चोरगे यांनी १९९६ साली बँकेकडून वाहनखरेदीसाठी पहिलं कर्ज घेतलं होतं. त्यानंतर त्यांनी बँकेच्या सहकार्यानं अनेक गाड्या खरेदी केल्या. एका गाडीपासून आता ५० पेक्षा जास्त गाड्यांसह त्यांचा व्यवसाय वृद्धिंगत झाला आहे. श्री. चोरगे यांचे बँकेबरोबर अतिशय सहकार्याचे व सलोख्याचे संबंध आहेत.

मेहेंदळे समूह :

१९९४ साली कै. मनोहर मेहेंदळे यांनी मेहेंदळे ट्रान्स्पोर्ट प्रा. लि. तसेच ॲग्रो कमर्शिअल ॲंड इंडस्ट्रियल सर्व्हिसेस प्रा. लि. या नावाने बँकेत खाती उघडून बँकेबरोबर आर्थिक संबंध प्रस्थापित केले.

२००० साली बँकेकडून व्यवसायासाठी कर्ज घेऊन ट्रान्सपोर्ट व्यवसायात जम बसविला. नळस्टॉप, एरंडवणा येथे मेहेंदळे गॅरेज नावाने असलेल्या ट्रान्सपोर्ट व्यवसायाने थोडेच दिवसात चांगली प्रसिद्धी मिळविली.

त्यांचेनंतर त्यांचे चिरंजीव नित्यानंद मेहेंदळे व श्याम मेहेंदळे यांनी व्यवसायात

केलेल्या प्रगतीतही बँकेचा मोलाचा वाटा आहे. तसेच बँकेच्या साथीने ट्रान्सपोर्ट व्यवसायाबरोबर मनोहर मंगल कार्यालयाची स्थापना करून मेहेंदळे कुटुंबीयांनी व्यवसायामध्ये वृद्धी केली आहे.

आता बँक मेहेंदळ्यांच्या तिसऱ्या पिढीला व्यवसायात मदत करीत आहे. त्यांनी बँकेच्या सहकार्यातून केशवबाग लॉन्स व ऱ्हांडा हॉटेल हे व्यवसाय कमी दिवसांत, कमी वेळात सुरू करून नावारूपाला आणले आहे. अशा प्रकारे मेहेंदळे समूहाचे तीन पिढ्यांचे विविध व्यवसाय बँकेच्या आर्थिक पाठिंब्यावर उत्तम प्रकारे सुरू आहेत.

साने डेअरी :

साने डेअरीचे संस्थापक कै. अनंत विष्णू साने यांनी सन. १९८६ साली बँकेत चालू खाते उघडून डेअरीचा आर्थिक व्यवहार सुरु केला. व्यवसायातील उत्पन्नामधून हळुहळू बँकेत ठेवी जमा केल्या. बँकेकडून कर्ज घेऊन व्यवसायवाढ केली. कै. अनंत साने यांना बँकेबाबत खूप आत्मीयता होती. त्यांचे बँकेबरोबर जिव्हाळ्याचे संबंध होते. सन २०२० साली कै. अनंत साने यांच्या मृत्यूनंतर व्यवसायाची धुरा त्यांची पुढील पिढी सांभाळत आहेत. ह्या पिढीने त्यांची परंपरा पुढे नेत बँकेबरोबर असलेले दृढ संबंध चालू ठेवले आहेत.

इनोरा बायोटेक प्रा.लि. :

मंजुश्री तडवळकर यांनी त्यांच्या सहकाऱ्यांबरोबर सन २००० मध्ये इनोरा बायोटेक प्रा. लि. या कंपनीची स्थापना केली. इनोरा बायोटेक ही कंपनी जैविक खते, गांडूळखत, कीटकनाशके निर्मिती व विक्री तसेच सेंद्रिय शेती विषयक सल्ला व सेवा, गार्डनविषयक विविध उत्पादने व सेवा या क्षेत्रामध्ये काम करते. २००८ पासून ही संस्था बँकेशी जोडलेली असून वेळोवेळी कर्ज देऊन बँकेने त्यांच्या व्यवसाय वाढीसाठी हातभार लावला आहे.

कंपनीशी संलग्न असलेल्या 'नो हाऊ फौंडेशन' या ट्रस्टला देखील बँकेने अर्थसहाय्य दिले. 'नो हाऊ फौंडेशन' कचरा निर्मूलन आणि सेंद्रिय शेती या विषयी जनजागृती आणि प्रशिक्षण देण्यासाठी कार्यरत आहे.

इलेक्ट्रॉनिका प्लॅस्टिक मशीन्स् लिमिटेड :

इलेक्ट्रॉनिका ग्रुपचे गेल्या अनेक वर्षांपासून बँकेबरोबर संबंध आहेत. इलेक्ट्रॉनिक प्लॅस्टीक मशीन्स् लिमिटेड हा इलेक्ट्रॉनिका ग्रुपच्या पुढच्या पिढीने केलेला व्यवसाय विस्तार आहे. कंपनीचा आणि बँकेचा हा ऋणानुबंध प्रगतीच्या वाटेवर असाच पुढे जात राहील.

सुशिला फिश मर्चंट :

१९८५ मध्ये मुलांच्या लग्नासाठी सुशीलाताई परदेशी यांनी बँकेकडून छोट्या रकमेचे कर्ज घेतले. तेव्हापासून घरखरेदी, वाडाखरेदी, मंगल कार्यालय बांधणं, टेम्पो खरेदी, कोल्ड स्टोअरेज बांधणं, व्यवसायासाठी जागा खरेदी, अशा सर्व निमित्तांनी वेळोवेळी बँकेच्या साथीनं त्यांनी व्यवसायाचा पसारा वाढविला.

एका छोट्याश्या टोपलीतून सुरू केलेल्या मासे विक्रीच्या व्यवसायाचे आज संपूर्ण शहरात जाळं पसरलं आहे. त्यासाठी त्यांनी बँकेकडून छोट्या रकमेचं कर्ज घेऊन सुरुवात केली आणि आज एक मोठी व्यावसायिक वाटचाल सुरू आहे. त्यांचा हा व्यवसाय जसा त्यांच्यासाठी अभिमानास्पद आहे. तसेच त्या आमच्या खातेदार आहेत हे बँकेसाठी अभिमानास्पद आहे. बँकेचा आर्थिक पाठिंबा होता त्यामुळे हे शक्य झालं असं सुशीलाबाई आवर्जून सांगतात. त्यांच्या पुढच्या पिढीनेही बँकेबरोबर आपले आर्थिक व्यवहार सुरू ठेवले आहेत.

सेवाधाम ट्रस्ट :

कै. डॉ. श्रीनिवास गोरे यांच्या पुढाकाराने सेवाधाम ट्रस्ट सन १९७८ साली स्थापन झाला. सध्या त्याचे मुख्य ट्रस्टी डॉ. कृष्णकांत वाढोकर, डॉ. सत्यजित वाढोकर आहेत. ट्रस्टतर्फे अनेक समाजोपयोगी उपक्रम मावळ तालुक्याबरोबर खेड, आंबेगाव, जुन्नर, येथे राबविले जातात.

सेवाधाम ट्रस्ट सन २००७ पासून बँकेचा खातेदार आहे. बँकेच्या अर्थसहाय्याने बांधलेले ट्रस्टचे सेवाधाम हॉस्पिटल तळेगाव स्टेशन येथे १३५०० चौ. फूट जागेत असून सर्व सोयीसुविधांनी युक्त आहे. सर्व रुग्णांना वैद्यकीय सेवा सवलतीच्या दरात पुरविल्या

जातात.

हॉस्पिटलचे सन २००७ पासून बँकेत खाते असून यापूर्वी हॉस्पिटलच्या बांधकामासाठी, इक्विपमेंट खरेदीसाठी, नर्सिंग स्कूलच्या बसखरेदीसाठी कर्जसुविधा घेतली असून त्यामधून संस्थेची सर्वांगीण प्रगती झाली.

ओमप्रसाद कास्टिंग्ज प्रा. लि. :

सन १९९६ पासून श्री. संजय भंडारी व सचिता भंडारी यांच्या व्यवसायाची सर्व खाती बँकेत आहेत. मशिनरी खरेदी, व्यवसायवाढ, खेळते भांडवल इ. कारणाकरिता वेळोवेळी त्यांनी बँकेकडून अर्थसहाय्य घेतले असून बँकेची दरवेळी बहुमूल्य साथ मिळाल्याचे श्री. भंडारी आवर्जून नमूद करतात. श्री. भंडारी टेक्निकल नॉलेज, कठोर परिश्रम यांचे जोरावर सर्व व्यवसाय उत्तमरीत्या सांभाळत असून त्यांचे व्यवसायाची भरभराट झाली आहे. पिंपरी चिंचवडमधील नामवंत उद्योजकांत त्यांची गणना होते. श्री. भंडारी यांची पुढची पिढी आता आर्थिक व्यवहार भगिनी निवेदिता बँकेबरोबर करीत आहे.

डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स :

डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्सचे जागेत बँकेच्या निगडी विस्तारित कक्षाचे कामकाज १९९९ साली सुरू करण्यात आले. शाखेचा वाढता ग्राहकवर्ग, व्यवसायाचे वाढते स्वरूप लक्षात घेऊन बँकेने डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स कडून जागा विकत घेऊन २००५ साली स्वतःच्या जागेत निगडी आकुर्डी येथे शाखा सुरू केली. संस्थेची खाती, संस्थेतील कर्मचाऱ्यांचे पगार बँकेत जमा होतात व शाळेसाठी बँक विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क गोळा करते.

फैज चिकन सेंटर :

फैज चिकन सेंटर प्रोप्रा. सुलेमान कादर खाटीक हे बँकेचे जुने खातेदार, सभासद व कर्जदार आहेत. तळेगाव मावळ येथे त्यांचा चिकन खरेदी / विक्रीचा व्यवसाय आहे. बँकेकडून त्यांनी वेळोवेळी राहत्या घरासाठी, व्यवसायासाठी माल खरेदी विक्रीसाठी लागणाऱ्या टेम्पोसाठी आर्थिक सहाय्य घेऊन व्यवसायात वृद्धी केली आहे. व्यवसायात झालेल्या प्रगतीबद्दल ते बँकेचे आभार मानतात.

खत्री आईस्क्रीम :

कै. रमेश दीनानाथ खत्री यांनी १९८९ साली घरी पेढे आणि पॉट आईस्क्रीम तयार करून रोज संध्याकाळी विठ्ठल मंदिर कर्वेनगर येथे विकावयास सुरुवात केली. खत्री बंधू आईस्क्रीमच्या आज विठ्ठल मंदिराजवळील मूळ शाखेसह २० फ्रेंचाइझी आहेत. आज या व्यवसायाचा कारभार श्री. गिरीश रमेश खत्री व श्री. गोरक्षनाथ रमेश खत्री समर्थपणे सांभाळत आहेत. पहिल्या १०,०००/- रुपयांच्या कर्जापासून पुढे लाखो रुपयांच्या कर्जापर्यंतची वाटचाल बँकेच्या आर्थिक पाठबळाच्या आधारे झाली आहे.

सन १९८८ पासून बँकेकडून आर्थिक सहाय्य घेऊन त्यांनी आपला व्यवसाय उत्तरोत्तर वाढवत नेला आहे. पुढच्या पिढीचेही बँकेबरोबर नाते दृढ झाले आहे. एकूणच भगिनी निवेदिता बँकेचा पैसा आपल्याला लाभतो. इथली 'लक्ष्मी लाभदायक आहे' असा खत्री मंडळींचा विश्वास आहे. बँकेच्या पाठबळामुळे आज या छोट्या रोपट्याचे रूपांतर वटवृक्षात झाले आहे.

धांडे पॅथलॅब डायग्नोस्टीक्स प्रा.लि. :

बँकेचे सभासद व ठेवीदार डॉ.नितिन लिलाधर धांडे यांची धांडे पॅथलॅब डायग्नोस्टीक्स प्रा.लि.ही प्रख्यात लॅब असून सन २००१ पासून बँकेच्या कर्वेनगर शाखेत त्यांचे व्यवहार आहेत. धांडे पॅथलॅबला आज ३५ वर्षे पूर्ण झाली आहेत. लॅबच्या आज रोजी मुख्य शाखेसह १७ शाखा असून ६ शाखा स्वमालकीच्या जागेत आहेत. ज्यामध्ये बँकेच्या अर्थसहाय्याचा मोलाचा वाटा आहे. धांडे यांच्या घरातील सर्वजण बँकेचे ठेवीदार आहेत. तसेच आता त्यांची दुसरी पिढीसुद्धा भगिनी निवेदिता बँकेबरोबर आर्थिक व्यवहार करीत आहे.

महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था ;

भगिनी निवेदिता सहकारी बँक व महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था यांचे गेल्या ३१ वर्षांपासून दृढ नाते / ऋणानुबंध आहेत. भगिनी निवेदिता सहकारी बँक ही महिलांनी सर्वांसाठी चालविलेली बँक आणि महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था ही महर्षी कर्वे यांनी शिक्षणाद्वारे महिलांचे सबलीकरण करण्यासाठी स्थापन केलेली संस्था.

कमिन्स कॉलेजच्या बांधकामासाठी बँकेने केलेल्या अर्थसहाय्यामुळे आणि संस्थेच्या आवारामध्ये असणाऱ्या बँकेच्या शाखेमुळे दोन्ही संस्थांचे संबंध दृढ झाले आहेत. भविष्यातही दोन्ही संस्थांचे हे ऋणानुबंध असेच टिकून राहतील.

वर्षानुवर्ष बँकेबरोबर जोडले गेलेले असे असंख्य ग्राहक हे बँकेसाठी भूषणास्पद आहेत. जागेअभावी प्रत्येकाची माहिती देणे अशक्य आहे म्हणून वर फक्त काही

प्रातिनिधिक खातेदारांचीच माहिती देता आली आहे. खातेदारांच्या नवीन पिढ्या सहकारी बँकांबरोबर व्यवहार करत नाहीत हा समज अद्याप पर्यंत बँकेने चुकीचा असल्याचे सिद्ध केले आहे. बँकेची ग्राहकाभिमुख धोरणे आणि अत्याधुनिक तरीही विनम्र आणि वैयक्तिक सेवा इथू पुढेही ग्राहकांच्या नवनवी पिढ्यांना आपल्याबरोबर जोडून घेण्यात यशस्वी होईल.

बँकेचे असंख्य समाधानी खातेदार वेळोवेळी उत्स्फूर्तपणे बँकेच्या सेवेला दाद देत असतात, त्यातील काहींचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

खातेदारांनी दिलेली दाद

ॲम्फेनॉल इंटरकनेक्ट इंडिया प्रा. लि. :

ॲम्फेनॉल इंटरकनेक्ट इंडिया प्रा. लि. या कंपनीतील कर्मचाऱ्यांना बँकेमार्फत कर्ज सुविधा देण्यात आली आहे. कंपनीतील कर्मचाऱ्यांना बँक देत असलेल्या उत्तम ग्राहक सेवेबद्दल कंपनीने बँकेची प्रशंसा केली आहे व बँकेला कौतुकाची पावती म्हणून सन्मानचिन्ह प्रदान केले आहे. सदर सन्मानचिन्ह कंपनीचे डायरेक्टर व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रॉबर्ट जॉन व एच.आर. मॅनेजर श्री. स्वप्निल बेंजामिन यांनी स्वतः बँकेच्या सांगवी शाखेमध्ये येऊन ब्रँच मॅनेजर सविता थत्ते यांना सुपूर्त केले आहे.

राजपथ इन्फ्राकॉन प्रा. लि. :

राजपथ इन्फ्राकॉन प्रा.लि. यांनी सातारा जिल्ह्यातील पुसेगाव ते म्हासूर्णे या ३९.३९१ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम २४ तासात पूर्ण करण्याचा विक्रम केला. या विश्वविक्रमाची नोंद लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये घेण्यात आली. याबाबत कंपनीने बँकेच्या केलेल्या अर्थसहाय्याबद्दल मनापासून आभार मानले.

भगिनी निवेदिता सहकारी बँकेची सामाजिक बांधिलकी :

सहकार तत्त्वावर कार्यरत असलेल्या भगिनी निवेदिता बँकेने 'सबका साथ: सबका विकास' हे धोरण अवलंबवावं, सदैव सामाजिक बांधिलकी जपावी, ह्यात आश्चर्य नाही. पण सामाजिक बांधिलकीचं स्वरूपही त्या त्या काळातल्या समाजाच्या गरजांप्रमाणे बदलत जातं. यादृष्टीने बँकेने वेळोवेळी

आपल्या कर्मचाऱ्यांच्या, सभासदांच्या आणि ग्राहकांच्याही हिताचे काही प्रकल्प, काही योजना राबवलेल्या आहेत.

सर्वसाधारण माणसाच्या जीवनात, मुलांच्या शिक्षणातल्या दहावी-बारावी इयत्ता, परदेशवारीच्या चाहुली हे विकासाचे टप्पे येतात. त्याचप्रमाणे गंभीर आजार, अपघात, मोठ्या आजारांच्या साथी यांसारखे आर्थिक ताणाचे, मानसिक आपत्तींचे प्रसंगही ओढवतात. निमित्त सुखकारक असो की क्लेशकारक, आर्थिक तरतूद तर करावीच लागते. यांसारख्या प्रसंगांमध्ये भगिनी निवेदिता बँक आपला 'खारीचा वाटा' नेहमीच उचलत आलेली आहे. दरवर्षी बँकेच्या सभासदांचे जे पाल्य दहावी, बारावीच्या परीक्षा गुणवत्तेसह उत्तीर्ण होतात त्यांना बँकेतर्फे पारितोषिके दिली जातात.

सभासद कल्याण निधी व सेवक कल्याण निधी अशा उपक्रमांद्वारे सभासद आणि त्यांचे नातलग यांच्यापैकी कोणालाही हॉस्पिटलमध्ये भरती होऊन उपचार घ्यावे लागले तर त्यांना वर्षातून एकदा वैद्यकीय मदत दिली जाते. मार्च १९९८ ते मार्च २०२२ अखेर सभासद व त्यांच्या नातलगांपैकी ६१२४ जणांना सुमारे रुपये २.२५ कोटी मदत करण्यात आली. तसेच सेवक व त्यांचे नातेवाईक यापैकी १३३० जणांना सुमारे रूपये १.३५ कोटी इतकी मदत देण्यात आली.

कोविड -१९ च्या महासाथीने जगभरापुढे नवी आव्हानं उभी केली. त्यात आर्थिक संकटांचा मोठाच भाग होता. कोण कधी कोविड पॉझिटिव्ह निघेल आणि कोणावर कधी हॉस्पिटलमध्ये राहून महागडे उपचार घेण्याची वेळ येईल हे सांगणं कठीण झालं. अशा वेळी ज्या सभासदांना किंवा त्यांच्या नातेवाईकांना कोविडवरच्या उपचारांसाठी ॲडमिट व्हावे लागले, त्यांना कमाल रू. ५०,०००/- पर्यंत वैद्यकीय मदत बँकेने केली. या योजनेद्वारा सप्टेंबर २०२० ते सप्टेंबर २०२१ या कालावधीत बँकेने सुमारे रू. १० लाखापर्यंतचे वाटप केले. कोविडची पहिली लाट ओसरेपर्यंत पुनश्च फेब्रुवारी २०२१ मध्ये दुसरी लाट उसळली. नोकऱ्या जाणं, अंशत: पगार मिळणं, व्यवसाय ठप्पं होणं या समस्यांनी माणसं ग्रासली. या काळात बँकेचे जे सभासद कोविड पॉझिटिव्ह झाले त्यांना स्वत:च्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी प्रत्येकी रू. ५०००/- ची मदत बँकेने दिली. अशा एकूण ४७३ सभासदांना सुमारे रू. २४ लाखांची रक्कम दिली गेली.

वस्तुत: या काळात बँकांचा एकूण व्यवहारही मंदावला होताच. तरीही भगिनी निवेदिता सहकारी बँकेने लोकांचे हित जपण्यावर भर दिला.

कोविडसारखी संकटं ही व्यक्तींवर आलेली असतात. तेवढीच राज्यावर, देशावरही आलेली असतात. अशावेळी राज्याचे मुख्यमंत्री व देशाचे पंतप्रधान हे त्या त्या स्तरावर मदतनिधी उभा करतात. कोविड काळात या दोन्ही मदतनिधींना

(पी.एम.रिलीफ फंड व सी.एम. रिलीफ फंड) बँकेने भरघोस मदत केली. याच काळात डॉक्टरांनी व परिचारिकांनी अक्षरश: जिवाची बाजी लावून रुग्णसेवा देऊ केली. या कार्याला दाद देण्यासाठी पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनने उभारलेल्या निधीला बँकेने सक्रिय हातभार लावला. याचप्रमाणे यापूर्वीही प्रत्येक राष्ट्रीय आपत्तीच्यावेळी बँकेने पी.एम.रिलीफ फंड व सी.एम.रिलीफ फंडला भरघोस मदत केली आहे.

याव्यतिरिक्त जे लोक/संस्था आपल्या कडूनच कर्ज घेऊन आत्मनिर्भर होऊ बघतात, धंदा व्यवसायात प्रगती करू बघतात, त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी बँक, आपल्या कर्जाची योग्य परतफेड करून उत्कृष्ट व्यवसाय करणाऱ्या दोन महिला उद्योजिकांना दरवर्षी 'निवेदिता पुरस्कार' देऊन गौरवते. त्यांच्या कामाला सलाम करणं हा हेतू त्यामागे असतोच. तसंच त्यांचं उदाहरण अन्य कर्जदार उद्योजिकांपुढे रहावं, इतर उद्यमी महिलांनी त्यांच्यापासून स्फूर्ती घ्यावी, जरूर तर त्यांचा सल्ला घ्यावा, हा उद्देशही असतो. योग्य तेवढंच कर्ज घेणं, ते योग्य कारणासाठी योग्य वेळी वापरणं आणि शिस्तीने परत करणं याचा वस्तुपाठच जणू काही यातून ग्राहकांसमोर येतो.

बँकेच्या कर्जदारांप्रमाणेच बँकेच्या सर्व ग्राहकांना अर्थसाक्षर करणं ही बँक स्वत:ची जबाबदारी मानते. कोणतं खातं केव्हा काढावं? कसं वापरावं? येथपासून अनेक, क्षुल्लक वाटणाऱ्या गोष्टीही, काही टप्प्यांवर काही लोकांना सांगाव्या लागतात. अन्य क्षेत्रात चांगली कर्तबगारी दाखवणारी व्यक्तीही बँकिंगबाबत अनभिज्ञ असू शकते अशा लोकांची बँक व्यवहाराशी ओळख व्हावी म्हणून बँक वेळोवेळी काही उपक्रम, कार्यक्रम राबवत असते. त्यामध्ये स्लाईड शोज, व्याख्यानं किंवा परिसंवाद यांचा समावेश असतो. बचतीचं महत्त्व, विविध बचत योजनांची तपशीलवार माहिती, खोट्या नोटा कशा ओळखाव्यात? बचत योजना निवडण्याचे निकष, वारसदार नेमण्याचं महत्त्व, सायबर सिक्युरिटी, डिजिटल बँकिंग सेवा वापरण्यातले फायदे आणि धोके यांसारख्या विषयांचा ऊहापोह अशा उपक्रमातून होतो. अगोदर या उपक्रमांबाबत निरुत्साही असणारी अनेक मंडळी यामधून आपले 'डोळे उघडले', 'दृष्टिकोन बदलला' अशा प्रतिक्रिया देतात तेव्हा बँकेला धन्यता वाटते.

ज्यांना अशा उपक्रमांना प्रत्यक्ष हजर राहाणं शक्य नसेल त्यांच्यासाठी बँकेच्या संचालिका, अध्यक्षा डॉ. रेवती पैठणकर यांनी बँकेचे व्यवहार समजावून सांगणाऱ्या दोन पुस्तिका लिहिल्या आहेत. 'उद्योजक आणि हिशेब', 'अर्थसाक्षर व्हा, स्वप्नं अर्थपूर्ण करा', या दोन पुस्तिका बँकतर्फे ग्राहकांना विनामूल्य देण्यात येतात. या दोन पुस्तिकांतून बँकेच्या खातेदारांना व्यवस्थित हिशेब ठेवण्याचे तसेच डोळसपणे अर्थव्यवहार

करण्याचे महत्त्व समजावून सांगितले आहे.

आधुनिक तंत्रज्ञान आधारित ग्राहक सेवा :

'ग्राहकांना बँकिंग' समजावणं, त्यांच्या अंगवळणी पाडणं. दुसऱ्या बाजूने ग्राहकांची बदलती जीवनसरणी, त्यामुळे बदललेल्या अपेक्षा बँकेलाही समजावून घ्याव्या लागतातच. १९९२च्या खाजगीकरण -उदारीकरण - जागतिकीकरण यांपासून अनेक पातळ्यांवर जग बदललं, उद्योगविश्व बदललं. बँकिंगक्षेत्र याला अपवाद कसं असणार? परकीय बँका, वित्तसंस्था भारतात येऊ लागल्या. त्यांच्याशी स्थानिक बँकांना स्पर्धा करावी लागली. बँकांमधली आजवरची 'मॅन्युअल' कामं करणाऱ्या हातांना पर्याय म्हणून नवनवे तंत्रज्ञान येऊ लागले. कामं कमीतकमी वेळात व जास्तीत जास्त अचूक कशी होतील, ह्यावर भर दिला गेला. २००० साली बँकांमध्ये कॉम्प्युटरायझेशन (संगणकीकरण) आलं. तिथपासून पुढे एटीएम, यूपीआय वगैरेंपर्यंतचा प्रवास बँकेने कसा केला तेही पाहाण्यासारखे ठरेल. उदा. सुमारे २००० सालानंतर लोकांचे घराबाहेर राहाणं, प्रवास करणं वाढू लागलं. अशा प्रत्येक वेळेला सोबत रोख रक्कम नेण्यातली असुरक्षितता जाणवत असल्याने जाऊ त्या गावात ऐनवेळी रोख रक्कम मिळेल, बँकेच्या सुट्टीच्या दिवशी पैसे हवेसे वाटले तरी ते मिळतील असा विश्वास लोकांना गरजेचा वाटला. आपल्या बँक खात्याचं एटीएम कार्ड खिशात ठेवून घराबाहेर पडावं आणि जरूर तेव्हा, जरूर तिथे एटीएम मशीनमधून रोख पैसे काढावेत, याची लोकांना सवय झाली. भारतात सुमारे २००० सालापासून एटीएमला चालना मिळाली. या पार्श्वभूमीवर २८ जुलै २०१० या दिवशी भगिनी निवेदिता बँकेने आपल्या हिंगणे वारजे शाखेमध्ये आपलं पाहिलं, एटीएम सुरू केलं. सोबतच आपल्या इच्छुक खातेदारांना आपल्या बँकेची प्रोप्रायटरी एटीम कार्ड द्यायला सुरूवात केली. पुढच्या दोन वर्षांमध्ये अजून ६ शाखांमध्ये एटीएम केंद्रं सुरू झाली. त्यापूर्वी २००९ मध्ये बँकेच्या कोणत्याही शाखेतून व्यवहार करता येण्याबाबत मागणी वाढली. तेव्हा खातेदारांना कोणत्याही शाखेच्या खातेदाराला कोणत्याही सोयीच्या शाखेतून आपले व्यवहार विनासायास करता यावे म्हणून core banking सुरू करण्याचा निर्णय घेतला गेला. त्यानुसार मार्च २०१४ मध्ये सर्व शाखा व मुख्य कचेरी येथे core banking चे काम पूर्ण झाले. core banking बरोबरच खातेदारांना आपल्या बँकेचे RuPay Debit Card इतर कोणत्याही बँकांच्या एटीएम मध्ये वापरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

पुढे यासंदर्भात, कोअर बँकिंग अंतर्गत, खातेदारांचा आणि बँकेचा सर्व सेंट्रलाईज्ड डेटा सुरक्षित राहावा या हेतूने बँकेने स्वत:चे 'डेटा सेंटर' उभारण्याचा निर्णय घेतला. वास्तविक डेटा सेंटर भाडेतत्त्वावर घेण्याचा पर्यायही होता. पण डेटा वापरणे

अधिक सोपं आणि सुरक्षित व्हावं, यादृष्टीने स्वत:चे स्वतंत्र डेटा सेंटर असणं हेच खात्रीचं साधन होतं. यादृष्टीने २०१३-१४ मध्ये बँकेने आपल्या कर्वेनगर शाखेमध्ये आपलं अद्ययावत डेटा सेंटर सुरू केले.

काळानुरूप बदल :

२०१९ पासून यूपीआय म्हणजे युनिफाईड पेमेंट इंटरफेसची सुविधा बँकेने मिळवून दिली. बँकेचे 'मोबाईल ॲप' ही त्याच सुमारास विकसित केलं ज्याला ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

स्थापनेपासून २०१५ सालापर्यंत बँकेचा लोगो (बोधचिन्ह) एकच होता. कालसुसंगत राहाण्याच्या हेतूने २०१६ साली बँकेने आपला नवा लोगो (बोधचिन्ह) आणि नवी टॅगलाईन (बोधवाक्य) तयार केली. बँक सुरू झाली तेव्हा, म्हणजे १९७० च्या दशकात गृहिणींचं घरातलं, जीवनातलं महत्त्व अधोरेखित करणं ही काळाची गरज होती. त्यादृष्टीने 'गृहिणी गृहमुच्यते' हे बोधवाक्य आणि कलश- आम्रपत्र - श्रीफळ हे पारंपरिक शुभसूचक बोधचिन्ह तेव्हाच्या संचालक मंडळाला वापरावंसं वाटलं. ते सार्थच होतं. बँकेचा प्रचार, प्रसार झाल्यामुळे गृहिणींच्या जीवनातलं विकासाचे शुभपर्व सुरू व्हावं हा भाव त्यामागे होता. पण काळाच्या ओघात महिलांच्या जीवनाचे आयाम वाढले, विस्तारले. स्त्रीचं भावविश्व केवळ आणि केवळ कुटुंबाशी जखडलेले राहिले नाही. शिक्षण- अर्थार्जन- नोकरीउद्योग यातून वेगवेगळ्या विकासाच्या शक्यता आणि संधी महिलांना खुणावू लागल्या. महिलांची झेप वाढली, समाजाचा प्रतिसादही काही प्रमाणात बदलला, उत्साहवर्धक होऊ लागला. यादृष्टीने नवं बोधचिन्ह आणि बोधवाक्य बनवणं गरजेचं होतं आणि तज्ज्ञांच्या सल्ल्यानी बनवलेलं नव रंगीत बोधचिन्ह अस आहे.

बँकेच्या नावामधली इंग्रजी B आणि N ही आद्याक्षरे यामध्ये एकमेकांत गुंफलेली दाखवली आहेत. बँक आणि बँकेचे

नवीन बोधचिन्हाचे अनावरण

ग्राहक परस्परांशी घट्ट नात्याने जोडले गेले आहेत, हे यातून सुचवलं गेलं. ही दोन अक्षरं एकमेकांच्या आधारे उभी राहिलेली दाखवण्यातून एकमेकांना आधार देणारे हात सुचवले. प्रगतीच्या वाटचालीला यातूनच शक्ती मिळावी, जनमानसाला या बँकेकडून सुरक्षिततेची हमी मिळावी हा विचार यामागे केला होता. विश्वासार्हता आणि सुरक्षितता हा कोणत्याही आर्थिक व्यवहाराचा पाया असतोच. या अक्षरांमधून एक बाण ऊर्ध्व दिशेला गेलेला दाखवला. यातून बाणाची ऊर्जा, कार्यपद्धतीमधली चैतन्यशीलता आणि सदैव भरारी घेण्याची वृत्ती अधोरेखित झाली. या बोधचिन्हासाठी केशरी रंगाचा वापर केला. केशरी रंग हा नेहमी ऊर्जेचं, प्रखरतेचं, मांगल्याचं प्रतीक मानला जातो. समृद्धीचं सूचन करतो. या गोष्टींचा पाठपुरावा बँक करत आहे, करणार आहे हे यातून प्रतीत होत होतं.

या बोधचिन्हासोबत 'स्वप्न अर्थपूर्ण करणारी बँक' हे बोधवाक्यही नव्याने प्रचलित केलं. शेवटी स्वप्न बघणं नुसतं पुरेसं नसतंच. त्याला आर्थिक पाठिंबाही मिळाला पाहिजे. बदलत्या जीवनातली बदलती स्वप्नं साकारायला ही बँक मदत करेल, या बँकेमुळे सर्वांच्या स्वप्नांची अर्थपूर्ती होईल असा विश्वास हे बोधवाक्य देतं. महिलांनी सर्वांसाठी चालवलेली बँक सर्वांच्या विकासाला हातभार लावेल ही ग्वाही देणारे हे बोधवाक्य लवकरच सर्वतोमुखी झालं.

बँक फक्त बोध चिन्ह आणि बोध वाक्य असे बाह्याकारी दिसणारेच बदल करते असे नाही तर वेळोवेळी विविध आव्हानांना प्रतिसाद देण्यासाठी आपल्या धोरणांमध्ये योग्य ते बदल करत असते. उदा. पर्यावरणरक्षणाला चालना मिळण्यासाठी बँकेने त्या क्षेत्रात काम करणाऱ्या कर्जदारांसाठी व्याजदरांमध्ये सवलत देऊ केली आहे. करोना काळात अडचणीत सापडलेल्या व्यावसायिकांसाठी बँकेने सवलतीच्या दरातील कर्ज योजना जाहीर केल्या होत्या. नव्या पिढीच्या आशा आकांक्षाना पूरक अशा start up कर्ज योजना बँकेने तयार केल्या आहेत.

भविष्याचा वेध :

स्त्रिया या स्वभावत: सतर्क असतात. चिकित्सक असतात. उगाचच एखाद्या लाटेवर आरूढ होऊन भलता धोका पत्करायला जात नसतात. त्यामुळे एखादं सनसनाटी यश एकवेळ त्यांना मिळणार नाही, पण त्यामुळेच त्यांच्यावर आत्मघाताची वेळही येत नाही. अशाच प्रकारच्या सुरक्षित सावध रस्त्यावर तूर्तास भगिनी निवेदिता सहकारी बँकेची वाटचाल सुरू आहे. आपण आखून घेतलेल्या मर्यादेत राहणं हे धोरण पक्कं आहे. एखादी नेत्रदीपक सिक्सर, एकच निर्णायक षटकार ठोकण्यापेक्षा वेगाने पळून धावसंख्या वाढवणं हा पर्याय स्वीकारलेला आहे. त्यामुळेच बँकेचा स्कोअरबोर्ड सतत हलता राहिलेला आहे.

व्यक्तीच्या जीवनात अर्धशतक हा कालावधी मोठा असला तरी एखाद्या

संस्थेच्या दृष्टीने ही तर सुरुवात आहे.

भविष्यात अधिक चमकदार कामगिरी करायला बँक उत्सुक आहे!

अशा एकूण अनुकूल परिस्थितीत बँक नवनव्या क्षितीजांचा शोध घेत आहे. याविषयी विद्यमान अध्यक्षा डॉ. रेवती पैठणकर म्हणतात,

गेल्या ५० वर्षांतल्या बँकेच्या वाटचालीत बँकेने अनेक टप्पे पार केले. सर्वसामान्य माणसांना बँकिंगचे महत्त्व पटवून देण्यापासून सुरुवात करून काळानुरूप स्वतःमध्ये बदल घडवत, आजमितीला खातेदारांना ज्या आधुनिक सुविधा लागतात त्या सर्व सुविधा बँक पुरवीत आहे.

बँकिंग क्षेत्रात फार झपाट्याने बदल होत आहेत. वाढत्या स्पर्धेत टिकायचे असेल तर सतत होणाऱ्या बदलांना सामोरे जाऊनच पुढे जायचं आहे. प्रामुख्याने तंत्रज्ञानाचा वापर करून बँकिंग सुविधा पुरविण्याच्या क्षेत्रात बदल होत आहेत. कितीही मोठी गुंतवणूक करून घेतलेले अद्ययावत संगणक आणि संगणक प्रणाली तीन ते चार वर्षांत जुनी ठरते. संगणक व प्रणालीमधील गुंतवणूक, त्यात सतत होणारे बदल, सायबर सुरक्षा, या सर्वांसाठी आवश्यक आहे भक्कम आर्थिक स्थिती. गेल्या ५० वर्षांत बँकेची आर्थिक स्थिती उत्तम असल्याने आजमितीला हे सर्व खर्च सहज उचलणे बँकेला शक्य आहे. भविष्यातही अशीच भक्कम आर्थिक स्थिती कायम राहील या दृष्टीने बँकेचे संचालक मंडळ सजग आहे आणि कालानुरूप आपली ध्येय -धोरणे आखत आहे.

भविष्याचा वेध घेताना नजीकचा म्हणजे यापुढील एक ते तीन वर्षे आणि दूरचा म्हणजे तीन वर्षांच्या पलीकडले, अशा दोन भविष्य काळाविषयी विचार करून बँकेतर्फे निर्णय घेतले जातात.

नजीकच्या भविष्यकाळाविषयी बोलायचे झाल्यास बँकेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष पूर्ण होण्याच्या आत बँकेला scheduled बँकेचा दर्जा प्राप्त व्हावा यासाठी रिझर्व बँकेकडे अर्ज दाखल करण्यात आला आहे महाराष्ट्र राज्य हे बँकेचे कार्यक्षेत्र आहे आणि बँक प्रामुख्याने पुणे जिल्ह्यात कार्यरत आहे सध्या बँकेची एक शाखा /सातारा जिल्ह्यात आहे. बँकेने नगर जिल्ह्यात शाखा उघडण्यासाठी रिझर्व बँकेकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. ग्राहकांच्या मागणीनुसार योग्य वेळी महाराष्ट्रात इतरत्रही शाखा उघडण्यात येतील. इंटरनेट बँकिंग सुविधा देण्यासाठी आवश्यक असणारे सर्व निकष बँकेने यापूर्वीच पूर्ण केले आहेत. आजपर्यंत ग्राहकांच्या मागणीचा विचार करून आणि बँकेच्या मोबाईल app ला तसेच UPI सेवांना मिळालेली ग्राहकांची पसंती आणि वाढता प्रतिसाद लक्षात घेऊन बँकेने इंटरनेट बँकिंग सेवा देऊ केली नव्हती. मात्र आता व्यावसायिक खातेदारांची वाढती मागणी लक्षात घेऊन बँकेने इंटरनेट बँकिंग सेवा सुरू करण्यासाठी रिझर्व बँकेकडे परवानगी मागितली आहे. बँकेची उत्तम आर्थिक स्थिती आणि नियामकांच्या आदेशांचे यथायोग्य पालन करण्याची कार्य संस्कृती लक्षात घेता, या सर्व परवानग्या रिझर्व बँकेकडून लवकरच मिळतील, अशी बँकेला खात्री आहे. नजीकच्या काळात business correspondentsच्या माध्यमातून सेवाक्षेत्र वाढवण्याचा बँकेचा प्रयत्न असेल. बँक आपल्या ग्राहकांना त्यांच्या गरजेनुसार घरी जाऊन सेवा देतच असते.

साधारण तीन वर्षांनंतरच्या म्हणजेच दूरच्या भविष्याबाबत बँकेने आपले धोरण प्रामुख्याने वाढती स्पर्धा, ग्राहकांच्या वेगाने बदलणाऱ्या अपेक्षा आणि डिजिटल बँकिंगचे वाढते प्रमाण यांचा विचार करून ठरवले आहे. आपल्या पंतप्रधानांनी fintech द्वारा डिजिटल आर्थिक क्रांतीचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यामध्ये अर्थ साक्षरता, समावेशक बँकिंग, डिजिटल करन्सी डिजिटल बँकिंग व्यवहार यांचा सहभाग असेल. आपली बँक सुरूवातीपासूनच अर्थ साक्षरता आणि समावेशक बँकिंगच्या योजना राबवीत आहे. भविष्यातही त्या अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येतील. नियामकांकडून डिजिटल बँकिंग आणि डिजिटल करन्सी संबंधी आवश्यक त्या परवानग्या मिळताच आपली बँक योग्य त्या तंत्रज्ञानाचा अवलंब करून डिजिटल अर्थ क्रांतीत सक्रिय सहभागी होईल. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे जास्तीत जास्त ग्राहकांपर्यंत पोचण्याचा बँकेचा प्रयत्न असेल. UPI द्वारे बँकिंग व्यवहार वाढत आहेत. त्याला Business analytics, Artificial Intelligence, machine learning सारख्या नव्या युगातल्या तंत्रांची जोड देऊन ग्राहकांच्या गरजा आणि त्यांची पत ओळखून आपल्या ग्राहकांचे व्यवहार अधिक सुखकर करण्यावर बँकेचा भर असेल. भविष्यात ही बँक गरजेनुसार इतर बँका, फिनटेक कंपन्या यांच्या सहयोगाने आपल्या सेवांचा विस्तार करण्याचा विचार करेल. बँक नेहमीच शाखा विस्तारापेक्षा जास्त महत्व अत्यंत वाजवी आणि परवडणाऱ्या दरातील सेवाविस्ताराला देत असते. आवश्यक त्या परवानग्या मिळताच नव्या युगातल्या वरील सर्व सेवा आपल्या ग्राहकांना लवकरात लवकर, परवडणाऱ्या दरात, उपलब्ध करून देण्यास बँक उत्सुक आहे.

कितीही अत्याधुनिक तंत्रज्ञान बँकेने वापरले तरीही तंत्रज्ञान आणि मानवी सेवाभाव यांचा योग्य ताळमेळ राखून सुलभ आणि उत्तम ग्राहक सेवा देऊन, ग्राहकांना बँकेशी जोडून घेण्याचेच बँकेचे धोरण भविष्यातही असेल.

५० वर्षांच्या आपल्या वाटचालीतून प्राप्त झालेल्या अनुभवांच्या आणि आर्थिक स्थैर्याच्या पाठबळावर आपली बँक नवनवीन क्षितीजांचा शोध घेत हिरक महोत्सवाकडे यशस्वी वाटचाल करेल, याबाबत आम्हाला खात्री आहे.

शुभं भवतु!

❖❖❖

सुवर्णभरारीतले सोनेरी क्षण

मान्यवरांच्या भेटी

सुवर्णभरारीतले सोनेरी क्षण

मान्यवरांच्या भेटी

सुवर्णभरारीतले सोनेरी क्षण

मान्यवरांच्या भेटी

सुवर्णभरारीतले सोनेरी क्षण

निवेदिता भवन उद्घाटन

वार्षिक सर्वसाधारण सभा

तेव्हा

आता

सुवर्णभरारीतले सोनेरी क्षण

वेबसाईट व ए.टी.एम. उद्घाटन

अभिमानास्पद कामगिरी

सुवर्णभरारीतले मोलाचे साथीदार

अशा अनेकांना बँकेने पाठबळ दिले...

सुवर्णभरारीतले मोलाचे साथीदार

अशा अनेकांना बँकेने पाठबळ दिले...

सुवर्णभरारीतले मोलाचे साथीदार

अशा अनेकांना बँकेने पाठबळ दिले...

सुवर्णभरारीतले अर्थसाक्षरतेचे प्रयत्न

भगिनी निवेदिता सहकारी बँक मर्यादित, पुणे

(आकडे लाखात)

	वर्ष	सभासद संख्या	वसूल भागभांडवल	नि धी	ठेवी	कर्ज	एकूण व्यवसाय	गुंतवणूक	नफा / तोटा	निव्वळ अनुत्पादित कर्ज प्रमाण	लाभांश	ऑडिट वर्ग
१	२४ मार्च – जून १९७४	२२७६	२.७०	०.०६	२.२५	४.४५	६.७०	०.००५	–०.२१	–	–	–
२	१९७४–७५	३२०१	३.५७	०.०९	१२.३१	११.१५	२३.४६	०.०१	–०.१८	–	–	ब
३	१९७५–७६	३७७८	४.०२	०.१३	१९.१०	१७.४४	३६.५४	०.११	०.६९	–	–	ब
४	१९७६–७७	३८५०	४.४६	०.६४	२१.३५	१८.९८	४०.३३	०.११	०.४२	–	–	–
५	१९७७–७८	४४८२	४.७२	१.१५	३३.४१	२७.८१	६१.२२	०.११	०.५५	–	९.००%	अ
६	१९७८–७९	४७१३	४.९७	१.४२	५१.५३	४३.३५	९४.८८	०.११	०.९५	–	९.००%	अ
७	१९७९–८०	५४३९	६.४५	२.१६	८९.५१	६८.१६	१५७.६७	१.०३	१.११	–	–	अ
८	१९८०–८१	५७८५	९.२९	३.३०	१४५.७३	१०९.१२	२५४.८५	१.४७	१.०३	–	९.००%	अ
९	१९८१–८२	६१३६	११.४५	४.११	२०७.६६	१३६.२०	३४३.८६	२.११	१.०९	–	–	अ
१०	१९८२–८३	६६४०	१५.०६	५.६१	२४५.४६	१७६.९१	४२२.३७	६६.०६	१.९९	–	९.००%	अ
११	१९८३–८४	७४५२	१७.८७	६.६६	३०७.३५	२२०.००	५२७.३५	७६.७६	१.२८	–	९.००%	अ
१२	१९८४–८५	८५५४	२१.००	७.५९	३७९.६२	२७५.९६	६५५.५८	१०२.१६	२.३०	–	९.००%	अ
१३	१९८५–८६	१०६८४	२८.२७	१२.३२	५१९.८३	३८४.११	९०३.९४	१२९.५०	४.०१	–	१०.००%	अ
१४	१९८६–८७	१२९८५	३७.५४	१६.६३	६७९.१७	५११.५५	११९०.७२	१७३.००	५.१२	–	१०.००%	अ
१५	१९८७–८८	१५०८०	४९.५९	२०.३२	९१०.९१	६८२.५३	१५९३.४४	२३७.५५	९.६८	–	११.००%	अ
१६	१९८८–८९	१७३२५	६५.६१	२७.४६	१२३४.५८	९४३.०५	२१७७.६३	३०५.००	१३.६१	–	६.००%	अ
१७	१९८९–९०	१९२३५	८१.३४	४६.९९	१६११.०८	१२०८.०७	२८१९.१५	४०५.००	१८.४९	–	७.००%	अ
१८	१९९०–९१	२१२५७	९९.०७	७३.६४	२०४९.४४	१४७०.९१	३५२०.३५	६०४.७०	२०.८३	–	६.००%	अ
१९	१९९१–९२	२२४८०	१११.०९	९८.३१	२२८५.६२	१६४९.८२	३९३५.४४	६९१.८३	३१.८२	–	९.००%	अ
२०	१९९२–९३	२३२५२	१२३.४७	१४५.७७	२७७१.९४	१८०८.२८	४५८०.२२	१०३०.०६	२१.०३	–	१०.००%	अ
२१	१९९३–९४	२२७८०	१३१.५९	१७४.३३	३४८१.८६	१९७१.५९	५४५३.४५	१६७५.६५	२२.५३	–	१०.००%	अ
२२	१९९४–९५	२२५१६	१४४.४९	१८९.६०	४३६१.४१	३१७५.६६	७५३७.०७	१२९६.३५	६१.१४	–	१२.००%	अ
२३	१९९५–९६	२२२३४	१५८.०३	२४६.२४	५७७८.०३	३८९७.३४	९६७५.३७	२०८७.७३	१११.६४	–	१३.००%	अ
२४	१९९६–९७	२१८९९	१७३.६७	३४६.९८	७५३२.५१	५०२५.४९	१२५५८.००	२८४३.७३	१५५.४१	–	१५.००%	अ
२५	१९९७–९८	२१६४४	१८७.००	४८५.२०	११६८३.३७	७२९६.०८	१८९७९.४५	४७०९.८५	२२९.५०	–	२५.००%	अ
२६	१९९८–९९	२१८०८	२०५.३६	६६०.७९	१६५०२.४९	९७३२.६६	२६२३५.१५	७१६५.८०	२५३.२४	–	१५.००%	अ
२७	१९९९–००	२२३९२	२४६.२९	९१६.४७	२१६१२.३४	१३१२५.८५	३४७३८.१९	८७४४.६५	३७७.१६	–	१५.००%	अ
२८	२०००–०१	२२८३३	२८९.२४	१३८२.१३	२७८३१.१९	१५११३.८७	४२९४५.०६	११९०४.०२	५०३.९१	–	१५.००%	अ
२९	२००१–०२	२३५३२	३५४.४९	२०१६.५४	२७८०८.३४	१६३३९.९९	४४१४८.३३	१३०६१.०८	६२९.४९	५.६९%	१५.००%	अ
३०	२००२–०३	२३६९९	३७६.९२	२८९३.०५	२७९५२.७७	१४२४९.६२	४२२०२.३९	१६२२९.३०	५१३.६१	१.८७%	१५.००%	अ
३१	२००३–०४	२५८३९	३९९.७९	३७२१.४३	२५६८०.०८	१२३२१.०४	३८००१.१२	१६८०४.०६	५११.२१	०.००%	१५.००%	अ
३२	२००४–०५	२७०२८	४०१.७७	४१९९.६१	२४५८५.८५	११९०८.९६	३६४९४.८१	१६८२०.१४	६२९.४०	०.००%	१५.००%	अ
३३	२००५–०६	२७०८०	४१२.८०	४८१३.८५	२५११४.७२	१४७८१.५८	४०६९६.३०	१५६६१.५३	६२७.०१	०.००%	१५.००%	अ
३४	२००६–०७	२८१६६	४४०.९५	५५४६.३९	२७५९७.६८	१७६४१.३९	४५२३९.०७	१४९५३.४५	३५८.९४	०.००%	१५.००%	अ
३५	२००७–०८	२८९८७	४६४.९७	५९७७.२७	३२७८९.२७	२०३९३.७७	५३१८३.०४	१८०५८.५३	३८४.७९	०.००%	१५.००%	अ
३६	२००८–०९	२९५८८	४८८.६०	६४०९.९६	३६३४०.०८	२२१३८.६२	५८४७८.७०	२००१०.७६	६०२.७३	०.००%	१५.००%	अ
३७	२००९–१०	३००८८	५०७.५८	७१०१.१७	३९११९.११	२३०४०.५६	६२१९९.६७	२२५४५.८२	६३१.७	०.००%	१५.००%	अ
३८	२०१०–११	३२०४१	५४३.४९	७८४४.०८	४२३६९.३८	२५३४८.५७	६७७१७.९५	२३६९१.५५	८५२.७६	०.००%	१५.००%	अ
३९	२०११–१२	३४९७६	५६२.७५	८८०२.४८	४५११३.३४	२८२०२.९३	७३३१६.२७	२४१४०.७६	१०२६.१९	०.००%	१५.००%	अ
४०	२०१२–१३	३९१२५	५८५.९७	९८७३.९१	५२८९९.२३	३३०४७.०९	८५९४६.३२	२८५७५.५२	१०८५.७५	०.००%	१५.००%	अ
४१	२०१३–१४	४३४४९	६००.८१	११०००.५९	५८४०३.१६	३६५२३.७२	९४९२६.८८	३०२७७.९२	१२४२.१८	०.००%	१५.००%	अ
४२	२०१४–१५	४७,१३४	६१७.१७	१२,३२३.०७	६६०६१.६७	४१,०३४.३८	१०७०९६.०५	३३६७७.२१	१,३२२.९७	०.००%	१५.००%	अ
४३	२०१५–१६	४९,२६५	६२१.९५	१३,५९०.२९	७३५०१.३५	४४,७३०.११	११८२३१.४६	३७६६५.५०	१,४२३.०३	०.००%	१५.००%	अ
४४	२०१६–१७	५१,०११	६१९.२२	१४,९५२.६६	८३२१७.२१	४४,५५५.९४	१२७७७३.१५	४८१२५.७०	१,५३८.२७	०.००%	१५.००%	अ
४५	२०१७–१८	५२,५८१	६१७.७२	१६,५७८.४१	८४१९४.४१	४६,२५०.५६	१३०४४४.९७	४८६७७.६०	१,७४०.७८	०.००%	१५.००%	अ
४६	२०१८–१९	५४,२३९	६१६.२९	१८,२६०.११	८५८९४.७४	४७,१९२.६९	१३३०८७.४३	५०९३८.२१	१,५९६.४४	०.००%	१५.००%	अ
४७	२०१९–२०	५५,४८१	६१४.३०	१९,५९०.५०	८८२७३.५५	४४,९००.६८	१३३१७४.२३	५७४३१.३९	१,५४४.११	०.००%	१५.००%	अ
४८	२०२०–२१	५६,४७३	६११.६९	२१,३५२.७१	९१४५७.८४	४३,०८१.७१	१३४५३९.५५	६४१४१.२६	१,४४६.६३	०.००%	रिझर्व बँक परिपत्रक ०%	अ
४९	२०२१–२२	५८,१९५	६०९.३०	२२,९३७.९०	९१८३७.८२	५१,४४५.४७	१४३२८३.२९	५७३५५.१४	१,७४३.१८	०.००%	१५.००%	अ

बँकेचा वाढता व्यवसाय



बँकेची भक्कम आर्थिक स्थिती



Gross NPA and Net NPA %



आजपर्यंतचे अध्यक्ष व उपाध्यक्ष

अ.क्र.	कार्यकाळ	अध्यक्ष	उपाध्यक्ष
१	१९७४ - १९७५	सरोजीनी बाबर	मीनाक्षी दाढे
२	१९७७ - १९७९	मीनाक्षी दाढे	मालिनी बोडस
३	१९७९ - १९८०	मीनाक्षी दाढे	विमल वाडेकर
४	१९८० - १९८३	मीनाक्षी दाढे	शीला काळे
५	१९८३ - १९८५	मीरा देशपांडे	मीनाक्षी दाढे
६	१९८५ - १९८७	शीला काळे	प्रमिला गरुड
७	१९८७ - १९८८	प्रमिला गरुड	सरला रेगे
८	१९८८ - १९८९	सरला रेगे	सुमित्रा गोवईकर
९	१९८९ - १९९०	सुमित्रा गोवईकर	सुलोचना पुरंदरे
१०	१९९० - १९९१	सुमित्रा गोवईकर	मंगला आदमणे
११	१९९१ - १९९४	शीला काळे	मीरा देशपांडे
१२	१९९४ - १९९५	शीला काळे	नीला वासवानी
१३	१९९५ - १९९७	सुमित्रा गोवईकर	श्रद्धा मांडके
१४	१९९७ - १९९९	प्रमिला गरुड	सरला रेगे
१५	१९९९ - २००१	मीरा देशपांडे	सुनंदा करमरकर
१६	२००१ - २००२	मीरा देशपांडे	सुमित्रा गोवईकर
१७	२००२ - २००३	सुमित्रा गोवईकर	सरला रेगे
१८	२००३ - २००४	शीला काळे	सुनंदा करमरकर
१९	२००४ - २००६	सुनंदा करमरकर	विद्या रानडे
२०	२००६ - २००७	विद्या रानडे	जयश्री काळे
२१	२००७ - २०१५	जयश्री काळे	जयश्री कुरुंदवाडकर
२२	२०१५ - २०२२	जयश्री कुरुंदवाडकर	रेवती पैठणकर
२३	२०२२ पासून	रेवती पैठणकर	दीपा दाढे

आजपर्यंतचे संचालकपदी काम केलेले सदस्य

अ.क्र.	संचालक	कार्यकाळ
१	सरोजिनी बाबर	१९७४ - १९७५
२	मीनाक्षी दाढे	१९७४ - २०१५
३	सुनीति देऊळगावकर	१९७४ - १९७५
४	कुमुदिनी पवार	१९७४ - १९७५
५	मालिनी बोडस	१९७४ - १९७८
६	शीला जोशी	१९७४ - १९७५
७	सुलोचना बापट	१९७४ - १९८०
८	माणिक फुले	१९७४ - १९७५
९	शीला असरानी	१९७४ - १९७५
१०	पुष्पा डांगे	१९७४ - १९७५
११	मीनाक्षी घोरपडे	१९७४ - १९७५
१२	शारदा सातपुते	१९७४ - १९७५
१३	विवेक दाढे	१९७४ - १९८९
१४	शेख मोहियुद्दीन अहमद	१९७४ - १९७५
१५	कृष्णराव बाबर	१९७४ - १९७४
१६	रामचंद्र सुकापुरे	१९७४ - १९७५
१७	शीला काळे	१९७७ - २०२०
१८	सुमित्रा गोवईकर	१९७७ - २०१५
१९	विमल वाडेकर	१९७७ - १९८३
२०	सुलोचना पुरंदरे	१९७७ - २००३
२१	नीला वासवानी	१९७७ - १९८३ , १९९३ - २००३
२२	मीरा देशपांडे	१९७७ - २०१९
२३	निर्मला चांदोरकर	१९७७ - १९८३
२४	सरला रेगे	१९७७ - २०१५
२५	प्रमिला गरुड	१९७७ - २००९
२६	शुभदा वाबळे	१९७७ - १९८०

आजपर्यंतचे संचालकपदी काम केलेले सदस्य

अ.क्र.	संचालक	कार्यकाळ
२७	नलिनी आदमणे	१९७७ – १९९१
२८	मंगला आदमणे	१९७७ – २००४
२९	इंदुबाई सकट	१९८० – २०२२
३०	टी.टी. नायडू	१९८१ - १९८४
३१	रा.ब. मोटे	१९८१ - १९९३
३२	के.ग. भागवत	१९८५ - १९९३
३३	छबुबाई कड	१९८९ - १९९३
३४	श्रद्धा मांडके	१९९४ - १९९९
३५	सुनंदा करमरकर	१९९४ पासून
३६	अरुंधती महाजन	१९९४ - २००९
३७	कमल भावे	१९९४ - २००९
३८	विद्या रानडे	२००१ - २०२३
३९	जयश्री काळे	२००३ पासून
४०	जयश्री कुरुंदवाडकर	२००४ पासून
४१	रेवती पैठणकर	२००४ - २००९ , २०१५ पासून
४२	जयश्री लष्करे	२००४ पासून
४३	सुमन नडे	२००४ - २०१४
४४	शोभा कडूसकर	२००९ - २०१५
४५	राजश्री करे	२०१५ - २०२२
४६	दीपा दाढे	२०१५ पासून
४७	सुनीता रानडे	२०१५ पासून
४८	सुरेखा रुईकर	२०१५ - २०२१
४९	नेत्रा आपटे	२०२२ पासून
५०	मीना गायकवाड	२०२२ पासून
५१	सुप्रिया जोशी	२०२२ पासून
५२	स्वाती काळे	२०२२ पासून
५३	जयश्री रावळ	२०२२ पासून

आजपर्यंतचे व्यवस्थापन मंडळ सदस्य

अ.क्र.	सदस्य	कार्यकाळ
१	रेवती पैठणकर	जून २०२१ पासून
२	जयश्री कुरुंदवाडकर	जून २०२१ पासून
३	जयश्री काळे	जून २०२१ - जुलै २०२२
४	दीपा दाढे	ऑगस्ट २०२२ पासून
५	मंगल कुलकर्णी	जून २०२१ पासून
६	सोनाली धर्मा धिकारी	जून २०२१ पासून
७	आदिती दिक्षीत	जून २०२१ - जुलै २०२२
८	राजश्री करे	ऑगस्ट २०२२ पासून

आजपर्यंतच्या स्वीकृत संचालिका

अ.क्र.	संचालक पदी काम केलेले सदस्य	कार्यकाळ
१	नीला वासवानी	१९८९ - १९९३
२	प्रमिला गरुड	२००९ - २०१५
३	श्रद्धा मांडके	१९८९ - १९९३
४	विद्या रानडे	१९९९ - २०००
५	पद्मा गोखले	१९९४ - १९९६
६	जयश्री काळे	२००० - २००३
७	जयश्री कुरुंदवाडकर	२००२ - २००४
८	रेवती पैठणकर	२००३ - २००४ , २००९ - २०१५
९	वर्षा भिडे	२००६ - २००८
१०	रंजना वैद्य	२००६ - २००८
११	नेत्रा आपटे	२०१७ - २०२२
१२	स्मिता भिडे	२०१७ - २०२२
१३	स्नेहा फडके	डिसेंबर २०२२ पासून

आजपर्यंतचे मुख्य कार्यकारी अधिकारी

अ.क्र.	सदस्य	कार्यकाळ
१	वसंतलाल गुंदेचा	१९७४ - १९७५
२	नंदिनी बेडेकर	१९७७ - १९८१
३	एम. जी. सोमण	१९८१ - १९८३
४	अ. रा. हुल्याळ	१९८३ - १९८४
४	रेखा भट	१९८४ - २००८
५	स्मिता देशपांडे	२००८ पासून

आजपर्यंतचे जनरल मॅनेजर

अ.क्र.	सदस्य	कार्यकाळ
१	शुभदा नातू	१९८४ - २००४
२	शैला जोशी	२००४ - २०१८
३	स्मिता देशपांडे	२००४ - २००८
४	जयश्री चित्रे	२००८ पासून
५	वर्षा बुधकर	२०१८ पासून

असिस्टंट जनरल मॅनेजर

अ.क्र.	सदस्य	कार्यकाळ
१	वंदना राजेशिर्के	२०२२ पासून
२	पल्लवी तेंडूलकर	२०२२ पासून

❖❖❖

बँकेची अर्धशतकी वाटचाल शब्दबद्ध करताना
वस्तुनिष्ठता व माहितीचा चोखपणा सांभाळण्याचा
आटोकाट प्रयत्न केला आहे.
तरीही, अनावधानाने संदर्भाअभावी कोठे काही
तपशील राहून गेला असेल, चुकला असेल तर
संबंधितांनी चूक लक्षात आणून दिल्यास पुढील
आवृत्तीमध्ये ती दुरुस्त केली जाईल. याबाबतचा
अंतिम निर्णय संचालक मंडळाचा असेल.

❖❖❖

धन्यवाद

सुवर्ण महोत्सवी वर्ष

2023-24

सुस्थिर • सुरक्षित • समावेशक

भगिनी निवेदिता
सहकारी बँक मर्यादित, पुणे

स्वप्न अर्थपूर्ण करणारी बँक

‘महिलांनी सर्वांसाठी चालविलेली अग्रेसर बँक’
हे बिरुद लावणारी
‘भगिनी निवेदिता सहकारी बँक मर्यादित, पुणे’
२२ मार्च २०२३ रोजी
सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये पदार्पण करीत आहे.

एका टप्प्यावर सर्वसाधारण महिलांनी, गृहिणींनी सुरू केलेली ही बँक
आजवर लाखो लोकांना, घरांना, व्यवसायांना
घरगुती जिव्हाळ्याने आर्थिक पाठबळ देत आलेली आहे.

अनेकांच्या विश्वासाला पात्र ठरत
त्यांच्या विकासाची साथीदार आणि साक्षीदार होण्याचा
बँकेचा हा प्रवास,
अर्थजगताची, निसर्गाची, काळाची आव्हानं पेलत कसा होत गेला?
आणि पुढची वाटचाल कशी असणार आहे?
याचा हा साद्यंत वृत्तांत...

उद्‌बोधक, प्रेरक, आश्वासक!

बँकेची ही ‘सुवर्णभरारी’ सर्वांनी अनुभवायलाच हवी!

भगिनी निवेदिता
सहकारी बँक मर्यादित, पुणे
स्वप्न अर्थपूर्ण करणारी बँक